
स्वास्थ्यसंवाद

डॉ. सुहास पेठे



।। श्री ।।

स्वास्थ्यसंवाद

(मन:स्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

स्वास्थ्यसंवाद

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : ऑक्टोबर २०१९
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

आपल्या मनाच्या संकुचिततेमुळं, आग्रहांमुळं,
मोकळेपणाच्या अभावामुळं,
मनोव्यापाराच्या गुंतागुंतीची कल्पना नसल्यामुळं –
ज्या अनेक प्रकारच्या अस्वास्थ्याला
अनेकांना वर्षानुवर्षं सामोरं जावं लागतं,
ते थोडंतरी हलकं व्हावं म्हणून
ही छोटीशी वैचारिक मदत

विशेषतः अशा अवस्थेतून जाणाऱ्या सर्व व्यक्तींना
आणि
इतर सर्व जिज्ञासू वाचकांना प्रेमादरपूर्वक अर्पण

– सुहास पेठे

संवादक्रम

• स्वास्थ्यसंवादाचा शुभारंभ ...६

१. परीक्षेनंतरचा अभ्यास.. ! ...८

२. समजून घेऊया - 'बदल' ! ...१२

३. आनंदासाठी जगूया - आजचं आज ! ...१७

४. बिनगरजेची ओझी ! ...२२

५. कुवत ! ...२७

६. अंतर... ...३२

७. 'आपलं' जग...! ...३६

८. खरी सोबत ! ...४१

९. तक्रार ! ...४६

१०. बरोबर आणि चूकही..! ...५१

११. एक मिनिट..! ...५५

१२.आपण आहोत तिथंच असतो का..? ...५९

१३. धूसर रेषा..! ...६३

१४. पर्याय संपले..? ...६७

१५. हवं-नकोच्या पलीकडं.. ...७१

१६. हातचा..! ...७५

१७. वेगळेपणाचा चकवा ! ...८०

१८. अनिश्चितता ! ...८४

१९. वाळूतल्या रेघोट्या ...८८

२०. गृहीत धरून जगताना..! ...९२

२१. रेंगाळणारे प्रवासी..! ...९६

२२. अनुकूल-प्रतिकूल ! ...१००

२३. स्वतंत्र अस्तित्व..? ...१०५

२४. उपाय आणि अपाय ...१०९

२५. तेवढंही अवघड नाही..! ...११३

२६. तळमळीला आशीर्वाद...यशाचा ! ...११८

***

स्वास्थ्यसंवादाचा शुभारंभ

सामान्यच काय असामान्यांच्याही जीवनाला व्यापून उरणारी विलक्षण गोष्ट म्हणजे हे मन. ज्यावर आजपर्यंत अनेक प्रकारांनी लिहिलं गेलं, आज लिहिलं जातं आहे आणि पुढंही लिहिलं जाईल, अशी माणसाच्या आयुष्यातली विलक्षण गोष्ट म्हणजे हे मन. एकाच वेळी अत्यंत सरळ, सहज, निरागस, निष्कपट, प्रेमळ, निर्व्याज आणि त्याचक्षणी दुसऱ्या बाजूला बरोबर तितकंच उलट गुंतागुंतीचं, असहज, निष्प्रेम, कोरडं आणि असं बरंच काही असलेलं. उदार झालं तर जीवसुद्धा वाहील अणि कृपण झालं तर एक छदामसुद्धा देणार नाही, ते हेच मन.

मोकळं होणारच असेल तर, स्वतःचा तळही दाखवील आणि गुंगारा द्यायचा ठरवला तर वाऱ्यालाही मागे टाकील. स्वतःविषयी सांगेल किंवा हे सांगितलेलं वाचील, तेही मनच आणि स्वतःचा थांगपत्ता लागू देणार नाही, मी हे काही वाचणार नाही म्हणेल, तेही मनच. एकाच वेळी सरळ आणि गुंतागुंतीच्या गोष्टींची आवड बाळगू शकतं आणि माणसाला तशा कृती करायला लावतं तेही हेच मन. मनुष्याचा पशु काय किंवा देव काय, काहीही करणं त्याच्या हातात आहे ! हे लक्षात घेऊन, अस्वास्थ्य टाळण्यासाठी

आणि स्वास्थ्य निर्माण करण्यासाठी मनाचे मार्ग उलगडणारे, हे काही स्वास्थ्यसंवाद !

यातलं बरंचसं लेखन महाराष्ट्रातल्या अग्रगण्य 'लोकसत्ता' या वृत्तपत्रातून सदररूपानं प्रसिद्ध झालं. ते व्हावं म्हणून प्रयत्न करणाऱ्यांचा मी कृतज्ञ आहे. हे पुस्तक प्रसिद्ध करताना, त्यातलं काही लेखन वगळलं आहे तर, काही नव्या लेखनाचा समावेश केला आहे. 'स्वास्थ्यसंवाद' पुस्तकरूपानं आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

यांतल्या एखाद्या संवादानं जरी कुणाच्या मनःस्वास्थ्यात भर पडली तरी, यांतले अनुभव आणि चिंतन यांची प्रेरणा देणाऱ्या भगवंताची ती कृपा समजतो आणि स्वास्थ्यसंवादाचा शुभारंभ करतो !

संतनगरी, सातारा. *- सुहास पेठे*

१. परीक्षेनंतरचा अभ्यास..!

एखादी परीक्षा संपली की, तिचा अभ्यास करून थकलेला विद्यार्थी स्वाभाविकपणे जरा निश्चिंत होतो. त्यानं परीक्षेसाठी ताण घेतला असेल, तर तो कमी व्हावा म्हणून साधी राहिलेली झोप घेण्यापासून ते विश्रांतीसाठी गावी जाण्यापर्यंत अनेक विचार तो करीत असतो. त्यात्या परीक्षेच्या वातावरणामुळं घरात कंटाळलेली, अवघडलेली मंडळीसुद्धा सुटकेचा निःश्वास टाकतात. अशा वेळी एक थोडा अनपेक्षित प्रश्न विचारण्यासारखा असतो किंवा स्वतः विचार करण्यासारखा असतो. तो कदाचित थोडा विचित्रही वाटेल. तो प्रश्न विचारणं, सामान्यतः रूढ नसलं तरी हिताचं आहे, गरजेचं आहे, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.

म्हणजे असं की,परीक्षा देऊन आलेल्या अशा अगदी पहिलीपासून उच्च पदवी किंवा स्पर्धा परीक्षेपर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला एक प्रश्न विचारला जाऊ शकतो. तो म्हणजे,'काय परीक्षा संपली ना आता? मग उद्यापासून अभ्यास सुरू का?' असं विचारलं तर त्याला प्रथम काय विचारलं, हे एकदम लक्षात येण्याची शक्यता कमी आहे. त्याचबरोबर त्यामुळं तो आपल्याकडं बघत राहाण्याची शक्यताही जास्त आहे. कारण आपल्यावर इतक्या लहानपणापासूनचा एक संस्कार आहे की, जो म्हणून काही अभ्यास करायचा तो परीक्षेपूर्वी करायचा असतो. हे अर्थात सार्वत्रिक सत्य आहे. अभ्यास किती झाला, कसा झाला हे बघण्यासाठी तर परीक्षा आहे. त्या अभ्यासात मिळणाऱ्या गुणांवर पुढच्या वर्गातला प्रवेश किंवा एरवीच्या क्षेत्रांत पुढची प्रगती अवलंबून असते. त्यामुळं परीक्षेपूर्वी जेवढा जास्तीत जास्त अभ्यास होईल, त्यावर पुढचं यश अवलंबून असतं. हे जर आपण मनानं, जबाबदारीनं, वेळी इतरांच्या सक्तीनं म्हणून - लहानपणापासून करीत आलेले आहोत आणि त्याच अपेक्षा आपण त्यात्या वेळी इतरांकडूनही करतो.

यात विचार करण्यासारखं काही नाही, असं वाटण्याची दाट शक्यता

आहे. पण आपलाच काय, इतरांचाही अनुभव आपण तपासून पाहावा. साधा पाचवीतला किंवा आठवीतला गणिताचा पेपर देऊन आपण बाहेर येतो. हळूहळू आपल्या बरोबरचे मित्रमैत्रिणीही बाहेर येतात. गेटवर किंवा इतर ठिकाणी घोळके एकत्र होतात. आलेल्या प्रश्नांची आणि दिलेल्या उत्तरांची चर्चा होते. लक्षात येतं की, हे चुकलं, ते चुकलं. हे आपण नंतर सोडवू असं ठरवलं, ते राहिलंच. यात आपल्याला शंका होती, ती आपण कुणाला तरी विचारायची ठरवली होती, ती राहिली. एखाद्या उपप्रश्नाचं उत्तर आपण द्यायचं गडबडीत विसरलो. हे सारं तिथं होतं खरं. पण सगळ्या मित्रमंडळींचं एकदा कॉफीपान झालं की, तो विषय विसरतो. कारण, जवळजवळ प्रत्येकाच्या बाबतीतच असं काहीतरी झालेलं असतं. त्यात पुन्हा घरी काही सांगता येण्यासारखं नसल्यामुळं, मनही ते सोयिस्करपणे विसरून जातं.

पण आपण विचार करावा, की परीक्षा जसं आपला कोणता अभ्यास झाला, हे दाखवून देते, तसा कोणता अभ्यास झाला नाही, हेही दाखवीत असते. पुढं परीक्षेतल्या मार्कांनी ते कळणारच असतं. पण त्यात त्या परीक्षेपुरता तरी बदल करता येण्यासारखा नसतो. तरीही परीक्षेत कच्चं आहे, राहिलं आहे, अभ्यासलं गेलं नाही असं जे दाखवलेलं असतं, ते कधीच सोडून देण्यासारखं नसतं. खरं तर किमान गुण मिळाले की, यंत्रणा विद्यार्थ्याला पास करते, पुढच्या वर्गात घालते. कुणाला पन्नास टक्के गुण मिळून सुटल्याचं, तर कुणाला साठ टक्के मिळून पहिला वर्ग मिळाल्याचं, तर कुणाला सत्तर-पंचाहत्तर गुण मिळून विशेष गुणवत्ता मिळाल्याचं कौतुक वाटतं. यांतली प्रत्येक गोष्ट कौतुकास्पद आहे, यात शंकाच नाही.

पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे की परीक्षेचा, पास होण्याचा, वरच्या वर्गात जाण्याचा प्रश्न तर सुटला, पण मिळालेले पन्नास गुण, जसं त्या परीक्षेपुरता तरी, तो विषय पन्नास टक्के कळल्याचं दर्शवतात, तसंच तो विषय आपल्याला पन्नास टक्के येत नसल्याचंही दर्शवतात. तीच गोष्ट साठ किंवा पंचाहत्तर मिळवलेल्यांना क्रमानं चाळीस किंवा पंचवीस टक्के विषय न येत असल्याचंही दर्शवतात. याकडं फार कमी लोकांचं लक्ष जातं. तेही एक वेळ चाललं असतं. पण पुढं काही प्रश्न असं लक्ष न गेल्यानं निर्माण होतात.

या वर्षीच्या गणितातला पन्नास टक्के भाग कळलेला नसेल, तर त्यावर आधारलेला पुढच्या वर्षीच्या अभ्यासक्रमातला भाग समजून घेताना, ही पन्नास

टक्क्यांची अडचण उभी राहाते, नव्हे ती दरवर्षी वाढत जाते. गुण दरवर्षी कमी होत जातात. विषय नावडता होतो. अभ्यास टाळायचा प्रयत्न होतो. आपलं गणित कच्चं आहे, पाया पक्का नाही, आता ते जुळवून घेणं शक्य नाही - अशी वस्तुस्थिती पुढच्या महत्त्वाच्या टप्प्यांत येत जाते. त्यावर उपाय नसल्यानं, मुलंच काय पालकांनाही नैराश्य येतं. काहींच्या बाबतीत त्यामुळं काही महत्त्वाच्या क्षेत्रांतल्या चांगल्या चांगल्या संधीही हुकतात.

मग या परीक्षेनंतरच्या अभ्यासाचं महत्त्व का असतं, ते कळतं. पहिल्याच वर्षी परीक्षेनंतर किंवा गुण कळल्यानंतर येत नसलेला पन्नास टक्के भाग सुट्टीत समजून घेतला, अभ्यासला, तर एकवेळ झालेल्या परीक्षेतलं नुकसान टाळता येणार नाही, पण पुढच्या वर्षांचं नक्की टाळता येतं. हा विषय अर्थातच केवळ शाळा, अभ्यास, परीक्षा, प्रवेशपरीक्षा - एवढ्या क्षेत्रांपुरता मर्यादित नाही, असं आपल्या लक्षात येईल.

परीक्षेपूर्वी अभ्यास करावा, हा आदर्श दृष्टिकोन आहे, याबद्दल दुमतच नाही. पण 'परीक्षेनंतरचा अभ्यास' हा नुसता विचार नाही, तर आपल्याला आयुष्यात अनेक ठिकाणी उपयोगी पडणारा एक 'परिपक्व दृष्टिकोन' आहे ! कारण काम कोणतंही असो, ते अधिकाधिक परिपूर्ण असावं, आदर्श असावं, चांगलं असावं हा दृष्टिकोन सर्वत्र विधायक आहे. इतर अनेक क्षेत्रांत आपल्याला याचा प्रत्यय येईल.

आपल्याकडं एखादं लग्नकार्य, समारंभ निघतो. त्याची सर्व बाजूंनी आठवणीनं तयारी होते. सर्व आमंत्रित, नातेवाईक, स्नेहीमंडळी येतात. कार्यक्रम आनंदात पार पडतो. सर्व मंडळी गेल्यानंतर हे सर्व आयोजित करणाऱ्या घरच्या मंडळींच्या अनौपचारिक गप्पा सुरू होतात. त्यात कुणाला तरी आठवण होते की, आपल्या जवळच्या अमुक माणसाचं आमंत्रण राहिलं. एकदा ते आठवल्यावर इतरांनाही अशा अगदी जिव्हाळ्याच्या चार माणसांना आमंत्रण राहिल्याची आठवण होते. आता आधी पाहिलं तसं, हा विषय तसाच सोडून देण्याचा नसतो. परीक्षेनंतरच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनाचा परिचय आणि महत्त्व असेल तर, आपल्या आमंत्रणाच्या यादीत अशी राहिलेली महत्त्वाची नावं आत्ताच लिहून ठेवणं, हा असा परीक्षेनंतरचा अभ्यास आहे. यावेळचा कार्यक्रम होऊन गेला असला, त्यात झालेल्या संबंधांचं काही नुकसान भरून काढता येण्यासारखं नसलं, तरी अशा मंडळींना नंतर 'क्षमस्व' म्हणून, पुन्हा आम्ही

जरूर लक्षात ठेवू, असंही करता येणं शक्य असतं !

अनेकदा आपल्यापरीनं सारा स्वयंपाक पूर्ण होतो. माणसं जेवून, उठून जातातही, पण आलेल्या माणसांच्या आवडीचा एखादा पदार्थ करायचा ठरवलेला असूनही, आयत्या वेळी स्वयंपाकाच्या नादात, तो विषय विसरतो. अनेक बाबतीत अशी परीक्षा संपलेली असते, पण अभ्यास करता येण्यासारखा असतो ! पुढच्या वेळी ते आठवणीत कसं राहील, त्याचा अभ्यास करीत असावं. अभ्यासानं उणिवा कमी होतील. अधिक यशस्वी होणारी माणसं, परीक्षेनंतरचा असा अभ्यास करीत आलेली आहेत. हेही स्पष्ट आहे, की अशा तऱ्हेचा अभ्यास करणाऱ्यांच्या नंतरच्या अभ्यासाच्या गरजा कमी होऊन, मूळ कामच अधिक पूर्णत्वाकडं जातं!

ऑफिसचं काम असो, एखादी कौटुंबिक, सामाजिक कामाची जबाबदारी असो, यात्रा, सहलीत जास्तीत जास्त प्रेक्षणीय स्थळं बघणं असो, व्याख्यानात मांडायचा एखादा विषय असो, एकमेकांना सांगायचे काही निरोप असोत - अशा असंख्य प्रसंगांत परीक्षेचा अभ्यास तर उपयोगी पडेलच, पण असा नंतरचा अभ्यासही भावी नुकसान टाळेल. स्वतःला एक चांगली सवय नकळत लावून जाईल.

त्यामुळं आनंदाचा असा एक दिवससुद्धा उजाडेल की, ज्या दिवशी आयुष्यातल्या परीक्षेपूर्वीच्या अभ्यासाच्या पत्राला नंतरच्या अभ्यासाचा ताजा कलम नसेल, प्रत्येक कर्माचं पत्रच पूर्ण असेल !

**

२. समजून घेऊया - 'बदल' !

बदल ! वाचला तरी अगदी सोपा शब्द. बालवाडीच्या पुस्तकात बबन, छगन, मगन - अशा सोप्या शिकण्याच्या शब्दांत घातला तरी खपून जाईल असा. ना कुठली जोडाक्षरं, ना आकार, ना उकार. हा शब्द माहीत नाही असा माणूस विरळाच. त्यात काही विचार करण्यासारखं असावं असाही हा शब्द नाही. आपल्या संबंधातलं सरळ, एकमार्गी, सांगितलं ते ऐकणारं असं एखादं माणूस असावं, तसं हा शब्द वाचला की वाटतं. अशा एखाद्या माणसाला किंवा वस्तूला आपण निरुपद्रवी म्हणतो. तो निरुपद्रवी आहे असं म्हटलं तरी, तो कसा निरुपद्रवी आहे हे सांगण्यातसुद्धा उपसर्ग, जोडाक्षर असा काही 'उपद्रव' आहे. पण मूळ शब्दात मात्र तोसुद्धा नाही !

पण अनेकदा अगदी साध्याशा शब्दात बऱ्याच मोठमोठ्या गोष्टी सामावलेल्या असतात, महत्त्वाच्याही असतात. इतकंच नव्हे तर, आपल्याच काय इतरांच्या आयुष्यातही सुखदुःख, स्वास्थ्यापर्यंत पोचणाऱ्या असतात. थोडा विचार करूया. नर्सरी किंवा बालवाडीला जाणाऱ्या लहान मुलांना आपण ड्रेस किंवा गणवेश शिवून देतो. वर्षभर त्याचा विचारही आपल्या डोक्यात येत नाही. वर्ष संपताना मूल पास झाल्याच्या आनंदात पालकांच्या सभेत शाळेकडून सूचना मिळते की, पुढच्या वर्षीपासून शाळेच्या गणवेशात 'बदल' झालेला आहे. आता तसा याला काही पर्याय नसतो. गणवेशाचे सेट तसे चांगले असतात. अजून एखादं वर्ष त्यावर सहज जाण्यासारखं असतं. पण शाळेनं ठरवलेल्या नवीन 'बदला'प्रमाणं, नवीन दुकानदाराकडं जाऊन आपल्याला ती वार्षिक खरेदी करावीच लागते. हा बदल करण्याची शाळेची कारणं काहीही असोत, मध्यमवर्गीय माणसाला मात्र त्याचा दोन-तीन हजारांचा भुर्दंड पडलेला असतो. मुलं शाळेत जायची तशीच जाणार असतात, शिकायचं तेच शिकणार असतात, आपल्याला काही अभ्यास घ्यायचा तर तो तसाच घ्यायचा असतो. पण मध्येच निर्माण झालेला हा 'बदल' अटळ असतो. एखाद्या गरीब कुटुंबाला तो जाणवणारा असतो. मध्यमवर्गीयाला त्या प्रमाणात कमी जाणवतो. सधन

पालकांना पैशाच्या दृष्टीनं तो बदल सोडता येतो, विसरता येतो. पण 'बदल' सर्वांनाच अटळ असतो, हे मात्र खरं ना?

एवढा छोटासा बदल नुसता खर्च, त्रासच नव्हे, तर अनेक प्रश्न निर्माण करतो. जुना गणवेशाचा ड्रेस मुलं घरात घालायला तयार होत नाहीत. टाकावासा वाटत नाही. ठेवणं अडचण होते. असे बदल शिक्षण संपेपर्यंत वेगवेगळ्या कारणांसाठी सुरूच असतात. माध्यमात बदल, शिक्षणसंस्थेत बदल, साईडमध्ये बदल, कुणाला साध्या सॅकमध्येसुद्धा बदल हवा असतो. त्यांवरून मतभेद, त्रास, चिडचिड होते. तेव्हा हे बदलाचं प्रकरण इतकं सरळ आणि निरुपद्रवी नाही, हे लक्षात यायला सुरुवात होते. पुढं राहाण्याच्या घरात बदल, मित्रमंडळीत बदल, खाण्यापिण्यात बदल, चाळ - अपार्टमेंट - बंगला असे बदल, मग इंटीरियरमध्ये बदल - असे असंख्य 'बदल' आपल्याला सर्वत्र आणि बहुतेक सर्वांच्या बाबतीत घडताना दिसतात.

बदलाचं गणित असं औरच आहे. एखाद्या गोष्टीचं मार्केटिंग झालं म्हणून असो किंवा इतर अनेक लोकांनी तसे 'बदल' केले म्हणून असो, असे बदल आपल्याकडून नकळत होतात. हे साध्या मिक्सरपासून कारपर्यंत कशाच्याही बाबतीत होत असतं. ते अकारण आहेत हे लक्षात आल्यानंतर, आधीची वस्तू अधिक चांगली होती असं वाटतं. कधी ईएमआयचं दुःख होतं. बदलातसुद्धा सावधता लागते. नाहीतर त्यासाठी किंमत मोजावी लागते!

आपल्या लक्षात येईल की, असं अनेक बाबतीत चालू असतं.'बदला'वर विचार केला तर अनेक गोष्टी लक्षात येतील. 'बदल' अखंड सुरू असतात. ते आवश्यक, अनावश्यक, सुखाचे, दुःखाचे, लादलेले, ओढवून घेतलेले, सोडून देण्यासारखे - असे कितीतरी प्रकारचे असतात. त्या प्रत्येक बदलाचा आपल्या सुखदुःखाशी, आनंदाशी संबंध येत असतो. बदलाचं तत्त्व कळलं आणि त्याला पूरक अशा आपल्या समजुतीतही 'बदल' करता आला, तर असा कुठलाही बदल सहसा आपलं स्वास्थ्य बिघडवू शकत नाही. त्यासाठी अशा अनेक प्रकारच्या बदलांचा थोडा परिचय मात्र वेळीच करून घेणं आवश्यक आहे.

पहिले बदल म्हणजे, नैसर्गिक बदल. प्रत्येक दिवसागणिक आपल्या शरीरातल्या अनेक यंत्रणांत 'बदल' घडत असतात. बालपणी वाढ, तरुणपणी स्थैर्य, प्रौढपणी देहाच्या परतीची वाटचाल - असे बदल होतच राहातात.

माणसात, जीवमात्रांत, वृक्षवल्लीत असे बदल अविरत सुरू असतात. मात्र त्यात एक सुसूत्रता आहे, समानता आहे. उत्पत्ती, विकास, विनाश - असा गरजेचा क्रम आहे. असे नैसर्गिक बदल अपरिहार्य असले तरी, हिताचे आहेत. मात्र हे लक्षात येतंच असं नाही.

ते लक्षात नाही आलं तर, आपण मोठे झालो तरी, आपण लहानच राहावं असं माणसाला वाटतं. इतकंच नव्हे, लोकांनीसुद्धा त्याला लहान समजावं, अशी त्याची अगदी कळकळीची अपेक्षा असते. कुठल्या वहिनींना मला काकू म्हणू नका, असं सांगावं वाटतं, तर कुठल्या काकूंना मला आजी म्हणू नका असं म्हणावसं वाटतं. आता तसं खरं नसल्यामुळं ते इतर जग म्हणेलच असं नसतं. मग दुःखाचा प्रश्न उद्‌भवतो.

खरंतर असे हितावह असलेले, निसर्गानं केलेले बदल नाकारण्यात दुःख आहे, अस्वास्थ्य आहे, तर स्वीकारण्यात स्वास्थ्य आहे, निश्चिंतता आहे, आनंद आहे. काळ्या केसांचे रुपेरी झालेले केस हा बदल नैसर्गिक आहे. तो टाळण्याचे प्रयत्न अनैसर्गिक असतात. बदलाचा अस्वीकार असतो. त्यानं मनावर एक सूक्ष्म ताण राहातो. खरंतर हा बदलसुद्धा आपल्यातली रुपेरी परिपक्वता दर्शवतो. आपल्या जगण्यात अनुभवांची, मतांची, निर्णयक्षमतेची, मागितल्यास वेळी सल्ला देण्याची परिपक्वताच निसर्गानं केलेले असे 'बदल' सुचवतात. मूळ बदल नाकारण्यापेक्षा अशा तऱ्हेनं सुसंगत बदल आपल्यात घडवले, तर मनुष्य स्वतः आनंदित होतोच, पण इतरांच्या आनंदातही भर घालतो. निसर्गाकडून घडत चाललेल्या अशा बदलांना सामोरा जात, या अवस्थेला आलेला वृद्ध माणूस हासुद्धा सर्वांना हवासा वाटतो, या शेवटच्या सोनेरी टप्प्यातही ! या बदलांना आपल्या आयुष्यात निसर्गाच्या बाजूनं जे एक स्थान आहे, ते खरंतर निकोप आहे. आनंदाचं आहे. त्याचं पर्यवसान शेवटी सफल जीवनात होतं.

पण याला इतरही अनेक बाजू आहेत. निसर्ग जसा बाह्य किंवा दृश्य स्वरूपाचे बदल घडवतो, तसे आतल्या विश्वातही अनेक बदल घडत असतात. मूल लहान असलं तरी त्याला आतलं जग असतं. त्यात त्याच्या आईवडिलांचं, मित्रमंडळींचं, शाळेचं, खेळाचं - सगळ्याचं आपापलं स्थान असतं. वयाबरोबर आणि पुढंपुढं जाणाऱ्या काळाबरोबर आतल्या जगातही खूप बदल घडत असतात. बाह्य बदलापेक्षा हे बदल सूक्ष्म असतात. ते बदल पण समजून घेणं

आवश्यक असतं. नाहीतर ते कळत नाहीत, त्रासाचे होतात. आपणसुद्धा आतून तसेच बदलक्षम असू तर आपल्याकडं धावत येणारं लहान मूल मोठं झाल्यावर तर असं धावत येत नाहीच, पण आपल्या बरोबर बाहेर फिरायला जाण्याचा हट्ट करणारं मूल आता तरुणपणी फिरायला जाताना आईवडिलांची संगत टाळायचा प्रयत्न का करतं, तो बदल त्याच्यात का झाला - हे समजून घेता येतं. नाहीतर उगाचच लहानपणाच्या त्याच्या वागण्याशी तुलना होऊन चिडचिड होते. मोठ्यांची एकमेकांच्यात नकारात्मक चर्चा होते. एकदा बदलाचं तत्त्व कळलं, तर मग असं करणं अनैसर्गिक आहे, हे लक्षात येऊ शकतं आणि आपणही तसं बदलून त्याला सामोरं जाऊ शकतो. तसं सामोरं जाण्यातसुद्धा नव्या पातळीवरही आपला संवाद टिकतो. आनंदात उणं होत नाही. असे बदल उभयपक्षी न स्वीकारणं म्हणजे, त्याला शाळेत जाताना बरोबर बसणारे ड्रेस, त्यानं कॉलेजला जाताना घालावेत, असा हट्ट धरण्यासारखं ते हास्यास्पद आहे. हे आपल्या लक्षात येईल.

जगताना कितीतरी संबंधांमध्ये असे 'बदल' होत असतात. त्यामुळं आपल्याला सुखदुःखही होत असतं. अर्थात बदलाचं गणित समजलं नसलं तर! मुलांची लग्न होतात, सुना येतात, मुलंबाळं होतात, नवे नातेवाईक जोडले जातात. प्रत्येक टप्प्यावर भूमिका बदलतात. व्यवसायात चढउतार, नफ्यात बदल, गिऱ्हाईकांत बदल - हे होतच असतं. ऑफिसमध्ये कधी बॉस बदलतात, कधी हाताखालची माणसं बदलतात. बदलातसुद्धा आवश्यक, अनावश्यक, कधी कुणाच्या लहरीप्रमाणं - असे अनेक बदल होतात. त्यात आपली पसंती, नापसंती असा कुठला आग्रह न धरता आपल्यातच आवश्यक तो पूरक बदल केला, तर आपल्या आनंदात बिघाड होत नाही. सगळ्या भूमिकांत सर्व जगभर असेच बदल घडत असतात. त्यात काही चुकून किंवा अनिष्ट बदल होत असतील आणि आपल्या हातात असतील, तर एकवेळ आपण ते न स्वीकारले तरी चालतील.

साध्या कुठल्याही झाडाच्या रोपट्यातसुद्धा रोज बदल होत असतो. आपल्या लक्षातही येत नाही आणि एक दिवशी ते आपली उंची ओलांडूनही वर जाऊन आपल्याला सावली देतं आहे, असं लक्षात येईल! आपण जमिनीवर बसून त्या लहानशा रोपट्याला पाणी घालताना, त्याच्या छोट्या पानावरून हात फिरवीत होतो, त्याच झाडाला आता आपण पाणी घालण्याची

गरज तर उरली नाहीच, उलट आपल्यात वयानं झालेला थकव्याकडं झुकणारा बदल आणि त्याच्यात पूर्ण विस्तार होऊन आपल्याला सावली देण्याइतपत आलेलं सामर्थ्य - हे दोन्ही बदल परस्परांना पूरक आणि आनंदाचे आहेत!

त्यासाठी आपण असे शक्य तेवढे 'बदल' समजून घेऊ. बदलांकडं थोडं मोकळेपणानं आणि जिज्ञासेनं पहात राहू. म्हणजे ते कसेही असले तरी आपल्याला आनंददायी ठरतील !

**I

३. आनंदासाठी जगूया - आजचं आज !

सकाळची ऑफिसची वेळ. बारानंतर साहेबांच्या केबिनमधून सूचना आली की, एक वरिष्ठ अधिकारी काही वेळातच ऑफिसमध्ये स्पॉट व्हिजिटसाठी येऊन जात आहेत, अशी बातमी आहे. थोड्याच वेळात त्यांची कार बाहेर थांबली. सॅल्यूट करून दार उघडणाऱ्या दरवानाकडं ओळखीचा कटाक्ष टाकून, ते त्यांच्या बरोबरच्या सचिवासह साहेबांच्या केबिनमध्ये गेले. केबिनमधले साहेबही पटकन पुढं आले, त्यांनी स्वागत केलं. पंधरा ते वीस मिनिटांत त्यांच्या हातातल्या कागदांवरून, उलगडत असलेल्या फाईलवरून, ते सचिवांना लिहून घ्यायला सांगत असलेल्या सूचनांवरून, काम महत्त्वाचं आहे आणि ते काम चटकन उरकलं जाणार याचा अंदाज, बाहेरून आतली चाहूल घेणाऱ्यांना लागला. वरिष्ठ अधिकारी स्वतः एकटेच बाहेर आले. वेगवेगळ्या विभागांत जाऊन त्यांनी प्रत्येकाला ओळख दिली. तिथंच एका टेबलवर असलेल्या व्यक्तीजवळ ते थांबले. 'येस रोहितजी' अशी वैयक्तिक ओळखीनं सुरुवात करून त्यांच्याशी चार शब्द बोलले. आले तितक्याच वेगानं वरिष्ठ अधिकारी बाहेर पडले.

काही माणसं उठून रोहितजींच्या टेबलाजवळ आली. नवीन मंडळींना उत्सुकता होती, यांची काही खास ओळख असावी. रोहितजींच्या चेहऱ्यावर मात्र कोरडेपणा आणि थोडे त्रासिक भाव होते. ओळखीचा उल्लेख इतरांनी केल्यावर ते म्हणाले,'ते आपलं तुमच्यावर इंप्रेशन टाकायला ठीक आहे. मी काही त्याला आज ओळखत नाही.' विचारणारी मंडळी ऐकतच राहिली. 'माझ्यापेक्षा पाच वर्षांनी लहानच. वयानं आणि नोकरीतही. प्रमोशनचा अभ्यासही आम्ही बरोबर केला. तो लकी ठरला. पहिल्या प्रयत्नात पास होऊन आता कुठल्या कुठं गेला. आम्ही राहिलो आहे तिथंच !' कुणीतरी म्हणालं,'पण त्यांनी एवढ्या गडबडीत थांबून तुमची आदरानं चौकशी केली!' रोहितजींच्या चेहऱ्यावर फारसा बदल झाला नाही,'तो आपला देखावा !'

डायोजेनिसची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. एके दिवशी दिवसाढवळ्या

दुपारी हातात कंदील घेऊन रस्त्यावरून जाताना त्याला अनेकांनी पाहिलं. तशी त्याची थोरवी लोकांना माहीत होती. असेल काहीतरी प्रकार, म्हणून काहींनी दुर्लक्ष केलं. काही त्याच्यावर विचार करीत पुढं निघून गेले. तो मात्र रात्रीच्या अंधारात एखाद्या माणसाच्या चेहऱ्याकडं कंदिलाच्या प्रकाशात पाहावं, तसं एवढ्या मोठ्या सूर्यप्रकाशात पाहात, निरीक्षण करीत पुढं चालत होता. त्याची थोरवी जाणणाऱ्या एकानं मात्र त्याला जवळ आल्यावर थांबवलं, आणि विचारलं,'एवढ्या भर उन्हात आपण कंदील लावून काय शोधत आहात ?' डायोजेनिस म्हणाला,'मी माणूस शोधतोय.' त्यावर आश्चर्य वाटून त्याला थांबवणाऱ्या सद्गृहस्थानं विचारलं,'अहो ही इतकी माणसं रस्त्यावरून येतजात आहेत आणि तरी तुम्ही माणूस शोधताय?' डायोजेनिस शांतपणे म्हणाला,'तुम्ही म्हणता आहात, तसं कुणालाही वाटणं शक्य आहे. तरीही मी माणूस शोधतोच आहे. तुम्हाला वाटताहेत, दिसताहेत, त्या माणसांच्या आकृती आहेत.पण मला मात्र खऱ्या अर्थानं माणूस भेटला नाही.'

जगात अशी अब्जावधी माणसं जगत आहेत. ती माणसं आहेत, तशी त्यांची आणि इतरांची समजूतही आहे. तरीसुद्धा माणसात अपेक्षित असलेल्या, त्याला खऱ्या अर्थानं माणूस ठरवणाऱ्या 'माणुसकी'चे गुण असलेली, एवढ्या अब्जावधी माणसांत किती माणसं आपण 'माणूस' म्हणून दाखवू शकू? विचार केला तर उत्तर कुठंतरी हजारपाचशे माणसांच्यावर येईल.

तसंच आपल्यासह आपल्या भोवती, लक्षावधी माणसं जगतात, अगदी आपल्याबरोबर, संपर्कात. ती सारी आपल्या डोळ्यांसमोर आज जगताहेत. पण त्या हजारो माणसांतली किती माणसं 'आज' जगत आहेत? असं विचारलं तर उत्तर 'एकदम सगळी' असं येत नाही. कारण विचार करायला लागलं की, लक्षात येतं, की आधी उल्लेख केला तसे कितीतरी 'रोहित'जी आपल्यात आहेत. ते आज जगताना दिसत आहेत, पण या कालच्याच नव्हे तर कधीच्या तरी भूतकाळातल्या गोष्टींची ओझी डोक्यावर घेऊन जगत आहेत. त्यामुळं 'आज'च्या जगण्यात, वर्तमानात त्यांना त्रागा आहे, त्रास आहे. स्वतः भूतकाळात जगून आपल्या वातावरणातसुद्धा तसेच नकारात्मक भाव पसरवीत आहेत.

आज वास्तविक यांना नोकरी आहे, पगार आहे, सुखवस्तू जीवन आहे. पद नसेल पण अर्थातच त्या पदाचे त्रासही त्यांना आज नाहीत. त्यामुळं

आज वर्तमानात आनंदात राहायला, आहे त्यात आनंदी जीवन जगायला खरं काहीच अडचण नाही. उलट 'आज'चा विचार केला तर त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पद, पैसा, प्रतिष्ठा याबरोबर असलेले त्रासही आहेत. पण त्यांनी त्याचा आज वर्तमानात जगताना कुठं गोंधळ होऊ दिलेला नाही, उलट त्यांच्या एकेकाळच्या सहकाऱ्याबद्दल मित्रत्वाची, आदराची भावना ते 'आज'ही टिकवून आहेत. 'आज' जगण्यातला आनंद ते स्वतः घेत आहेत आणि इतरांनाही देत आहेत. उलट हे 'आज' जगण्याकडं दुर्लक्ष झाल्यामुळं आजच्या कितीतरी आनंदांना मुकलेले आहेत. 'काल' - भूतकाळात - जगत असल्यामुळं अधिकाऱ्यांनी आज यांना दिलेल्या आनंददायी आदरालासुद्धा ते 'देखाव्या'चा रंग अकारण फासून स्वतःच दुःखी झालेले आहेत.

आज तर सगळेच जगत असतात. पण खऱ्या अर्थानं 'आज' जगणारे खूप कमी ! जे केवळ 'आज' जगतील, ते सरळ, सहज, अधिक आनंदी जीवन जगू शकतील. हे कुठल्याही क्षेत्रात लहान-मोठ्यांना, स्त्रीपुरुषांना सर्वांना करण्यासारखंही आहे आणि आनंददायीही आहे. पण आपल्या असं लक्षात येईल की, 'आज'चा आनंद माहीत नसल्यामुळं, सावधानता नसल्यामुळं, किंवा जगण्याचं धाडस नसल्यामुळं माणूस कालची ओझी - संबंध, कल्पना, स्थिती, अपेक्षा - डोक्यावर घेऊन आज जगताना दिसेल. तर दुसऱ्या बाजूला 'उद्या' किंवा भविष्यात काय व्हावं, होणार, त्या विषयीच्या कल्पना, चिंता, काळज्या, अनिश्चितता - यांचीही ओझी डोक्यावर घेऊन जगताना दिसेल.

लहानपणची श्रीमंती, लाड, इतरांकडून होणारं कौतुक - याला त्यात्या वेळेला महत्त्व असतं. आज कदाचित सारं जरुरीपुरतं असेल, त्याचा आनंद आजच्या जगण्यात आहे, पण आजचं 'आज' जगलं तरच ! कदाचित परिस्थिती ही याच्या उलटही असू शकते. आज श्रीमंती असेल, उच्च शिक्षण असेल, त्याचा आनंदही आजचा 'आजच'! त्यात जुनी गरीबी, अशिक्षितपणा, लोकांकडून अशांमुळं झालेले अवमान - या गोष्टी विसरून एकतर त्यांच्याबद्दल दुर्भाव किंवा आपल्या कर्तृत्वाचा अहंकार असं 'आज'मध्ये मिसळायचं काही कारण नाही. असं आज वर्तमानात जगता आलं तर, कालचा मत्सर, आज प्रेम करण्यात आड येत नाही, कालची आपुलकी, आजचा दुरावा स्वीकारण्यात आड येत नाही. कालचं शत्रुत्व, आजची मैत्री स्वीकारण्यात

आडयेत नाही. या आणि अशा अनेक गोष्टी आपलं आजचं जीवन हलकं, आनंदी आणि मुक्त करतात !

तीच गोष्ट कालची माणसं, कालचे संबंध,'आज'च्या जगण्यात आणण्यात आहे. काल कुणाकडून त्रास, अवमान, सुखदुःख झालं असेल, पण ते ओझं 'आज'च्या दिवसावर ठेवू नये. आज हा 'आज' आहे. तो जसा माझा बदलला तसा तो इतरांचाही बदलू शकेल. मग आज जे घडेल, जो भेटेल, जो जसा वागेल, तसं त्याच्याशी मोकळेपणानं, तणाव न घेता, सहजतेनं वागता येईल. ते 'आज'च्या जगण्यातला आनंद काय असतो, त्याचा अनुभव आपल्याला देईल. मग जुने राग, लोभ, अपमान, दुःख, अपेक्षाभंग - असल्या गोष्टींनी अनेकांना आलेली आजची जगण्याची चांगली संधी वाया जाते.

याचा अर्थ 'काल'ला काहीच किंमत नाही, असं नव्हे. त्यातून 'उद्या' अधिक चांगला जगण्यासाठी शिकण्यासारख्या काही गोष्टी जरूर मिळतील. काल जमवलेली तांत्रिक माहिती, शिक्षण - यांचाही आज उपयोग करून घेता येईलच. पण आज उजाडला की, काल संपलेला आहे, मृतवत् आहे. ही जाणीव कालच्या ओझ्यांपासून मुक्त व्हायला आपल्याला मदत करील. आज जसा आहे तसा आनंदानं जगता येईल. तेच 'उद्या'च्या बाबतीत. उद्यासाठीचा विचार, नियोजन, त्यानुसार आज करायची कामं यांना 'आज' जरूर स्थान आहे. पण 'उद्या'ची काळजी, चिंता, भय - यांनी आज दबून जायचं काहीच कारण नाही. कालच्या चुकांतून शिकलेलं आज उपयोगी पडतं. कालच्या उपकारांची जाणीव आजचं जीवन समृद्ध करते. उद्याच्या हितासाठी केलेलं नियोजनही उपयुक्त आहे. त्यात आज मोकळेपणानं जगल्यामुळं मिळणाऱ्या संधी ही दुधात साखर आहे !

मग नोकरीत काल एखादा हाताखाली असेल तर मार्गदर्शनाचा आनंद, आज बरोबर असेल तर सहकार्यानं काम करण्याचा आनंद आणि उद्या तोच आपला वरिष्ठ असेल तर, त्याच्याकडून मार्गदर्शन, निर्णय घेऊन जगण्यातला आनंद - तिन्ही वेळी समानच राहतील ! काल मूल म्हणून सांभाळण्यात, आज कर्तबगार तरुण म्हणून पाहाण्यात आणि उतारवयात तो करीत असलेली सेवा घेण्यात - आनंद समानच असेल. असंच सगळीकडे कुटुंबात, माणसांत, वेगवेगळ्या संबंधांत घडेल !

'काल' ही कधीच निघून गेलेली गाडी आहे. त्यात 'आज' बसायला

जाऊ नये. 'उद्या' ही कदाचित येणारी किंवा कधी न येणारी गाडी आहे. त्यामुळं तिची काळजी केली तरी त्यात आज बसता येणार नाही. 'आज' आपण सहज, सरळ आणि थेट समोर उभ्या असलेल्या 'आज'च्याच गाडीत प्रवेश करू शकतो, बसू शकतो, जगण्याची खरी संधी 'आज'हीच आहे.

त्यासाठी फक्त 'आज'च्या आनंदाची विद्या येत असावी ! ती आली तर अर्थात हेही लक्षात येईल, की हजारो माणसं दिसत असूनही डायोजेनिसला जसा 'माणूस' शोधावा लागला, तसं आपल्याला आज जगणारी हजारो माणसं दिसली तरी 'आज' - वर्तमानात जगणारा माणूसही असाच शोधावा लागेल ! निदान आपण तरी तसं होऊ शकू. आनंदाची गरज आपल्याला तरी आहेच ना !

**

४. बिनगरजेची ओझी !

आठवड्यातून एखादा दिवस मिळालेली मोकळी संध्याकाळ. चार वाजता उन्हं उतरल्यावर यायचं आणि सात-आठ वाजेपर्यंत परत निघायचं. यासाठी घरी आलेले जुने स्नेही आजी-आजोबा. चार ते पाच साडेपाच पर्यंतचा वेळ, बरेच दिवसांनी भेटल्यामुळं नवनव्या विषयांत, गप्पांत गेला. साडेपाच होत आले, त्याबरोबर त्यातल्या आजींची चुळबुळ सुरू झाली. थोडं गप्पांत, थोडं घड्याळाकडं लक्ष. त्या आजींना मी लग्नाची मुलगी असल्यापासून ओळखतो. वहिनी, काकू, आजी असा त्यांचा सगळा प्रवास मी डोळ्यांसमोर पाहिलेला आहे. त्यामुळं आत्ताची चुळबुळ कशानं सुरू झाली आहे, हे लक्षात यायला वेळ लागला नाही. म्हणून विचारलं,'आज आहे ना अजून वेळ? अजून गप्पा, चहापाणी व्हायचं आहे !'

यजमानही आमचे जुने स्नेही. त्यांनी माझ्याकडं बघितलं. दोघेही जाणून होतो. त्या म्हणाल्या,'हो. तसा अजून वेळ आहे परतायला. सूनबाईंचीही आज सुट्टीच आहे.' मी म्हटलं,'मग आता आज घरची कुठली काळजी आहे?' त्या म्हणाल्या,'तशी काळजी नाही, पण नातवाची घरी यायची वेळ झाली. सहाला तो आला म्हणजे, भुकावलेला असतो. वेळेला काहीतरी गरम करून दिलं की, खाऊन साडेसहाला खेळायला जातो.' मी म्हटलं, 'त्याची आई आहे ना घरी आज ? ती नाही का काही करणार ? तिची सुट्टी म्हणून तर आज आपण निवांतपणे यायचं ठरवलं !'

त्या जरा अवघडून बोलल्या,'ते खरंच आहे, तिनं करायला पाहिजे, करीलही. पण नेमकी सुट्टी म्हणून कुठं बाहेर गेली तर ? नातू काही बोलायचा नाही. पण तो तसाच पाणी पिऊन खेळायला जाईल ! म्हणून आपली काळजी वाटते. तसं आता इथून निघून त्याच्या वेळेत पोचता येणार नाहीच आहे.' आमच्या उरलेल्या तिघांच्या जे मनात येत होतं, तेच त्यांच्या मनातही येत होतं. कारण आता त्याची आई त्याची काळजी घ्यायला समर्थ आहे, आज ती घरी आहे, आता आपण जाऊन ते करू शकणार नाही, त्याची तशी गरजही

नाही.आपण ही काळजी आता उगाचच करीत आहोत. हे त्यांना स्वतःलाही जाणवत होतं. आम्हाला ते सवयीचं असल्यामुळं लक्षात आधीच आलं असणार, हे त्या जाणून होत्याच. तरीही तो नातू, ती सहाची वेळ - सगळ्याची काळजी त्यांना इथं निवांत असतानाही सोडवत नव्हती.

एखादं महत्त्वाचं काम असलं, म्हणजे ते व्यवस्थित पुरं व्हावं, त्यासाठी करायच्या गोष्टी आपण वेळेत कराव्यात, त्या बरोबर होत आहेत ना, याची काळजी घ्यावी - हे सारं व्यवहार्यच आहे. पण ते तेवढं करून सोडून द्यायचं, हे मनाला मानवत नाही. जे जे म्हणून करणं आवश्यक आहे, आपल्या हातात आहे, ते सारं करून झाल्यानंतरसुद्धा मनाला त्या संपलेल्या कामात पुन्हा अडकवून ठेवणारी वृत्ती म्हणजे - काळजी ! प्रत्येक कामाचं पुढं काय होणार - असले विचार निर्माण करून माणसाचा कामाचाच नव्हे, तर झोपेचाही वेळ घालवणारी काळजी म्हणजे एक अनुत्पादक उद्योग होऊन बसतो ! त्याचं वैशिष्ट्य हे की, त्याचीसुद्धा माणसाला नुसती सवयच नव्हे, तर मनाला काळजी करण्याची हळूहळू आवडही लागते. असल्या काळजी करण्याच्या उद्योगातून काही निष्पन्न होत नसतं, ते लक्षात येतं, तरी नकळत काळजी करीत राहाण्याची मनाला खोड लागते. त्यानं इतर कामांचं नुकसान होत असतं. त्यात लक्ष लागत नाही, ती वेळेला होत नाहीत, तरी माणसाकडून ही काळजीची बिनगरजेची ओझी वर्षानुवर्षं वाहिली जातात.

लहानपणी बाराखडी शिकताना आपण ओ-ओझेवाला घोकलेलं असेल. त्या बिचाऱ्याला रोजच्या अन्नपाण्यासाठी पाठीवर पोत्याचं ओझं घेऊन, उन्हातान्हाचं दिवसभर राबत राहावं लागतं, घाम गाळावा लागतो, तेव्हा कुठं दिवसाच्या आमटीभाकरीची सोय होते. त्याच्या ओझं वाहाण्याला कारुण्याची किनार असली तरी, ते गरजेच्या वस्त्रासारखं आहे. पण आपल्या काळजीत कुठं अन्नपाण्याचा, निर्वाहाचा, घरादाराचा, मुलाबाळांचा प्रश्न नाही, कुठलं कर्तव्य नाही, हलक्या मनानं आनंदानं जगण्याची संधी आहे. तरीसुद्धा ही अनावश्यक काळजीची ओझी वाहून आपण का दमतो, याचा वेळीच विचार करणं गरजेचं नाही का ?

घरोघरी अशा असंख्य आजी, आई, वहिनी, इतकंच नव्हे तर, मुलं, मुली, वडील, आजोबा, नोकर-मालक, बॉस - आपल्याला पाहायला मिळतील. ते या काळजीच्या ओझ्याखाली दिवसेंदिवस, वर्षानुवर्षं वाकलेले

असतात. त्यापोटी त्यांनाच त्रास होतो, चिडचिड होते, इतरांचं स्वास्थ्य जातं. त्यांतल्या अनेकांना आपण होऊन, विनाकारण, पाठीवर घेऊन वाहिलेल्या या ओझ्यांची कल्पना आली तर, कितीतरी लहान-थोर व्यक्ती या ओझ्यातून मुक्त होतील. मिळालेल्या, मिळवलेल्या गोष्टींचा आनंद घेत जगू शकतील.

माणसाच्या आयुष्यात त्यात्या टप्प्यावर रास्त असलेल्या गोष्टी होत जाणं, हा निसर्गक्रम आहे. त्या होण्यासाठी आपल्याकडून जे करायचं ते करणं, हे त्याचं कर्तव्यही आहे. चांगल्या तऱ्हेनं पास होण्यासाठी उत्तम अभ्यास, वेळेचं नियोजन, चांगली प्रकृती, उत्तम मार्गदर्शन - हा तर साधा सरळ निसर्गक्रम आहे. तो मनापासून व्हावा म्हणून, मनाची साथ मिळणं-घेणं हे गरजेचंच आहे. पण आपल्या लक्षात येईल की, या निसर्गक्रमात काळजीला कुठं स्थान नाही. कामाला आहे, वेळेला आहे, कौशल्याला आहे ! ते सारं केल्यानंतर, त्याचा परिणाम म्हणून परीक्षेत मिळणारं यश हेही, या निसर्गक्रमाचा एक भाग आहे.

इतक्या सरळ असलेल्या गोष्टीत शिरकाव करून, मन अपेक्षित यश मिळेल की नाही, विशिष्ट साईडला जाता येईल की नाही-असला एखादा मुद्दा उत्पन्न करून, मुलालाच नव्हे तर त्याच्या आईवडिलांपासून सगळ्यांना हा काळजीचा उद्योग कधी निर्माण करतं, तेही कळत नाही. अनेकदा तर त्यामुळं निसर्गक्रमानं चाललेल्या अभ्यासापासून परीक्षेपर्यंतच्या सगळ्या कामांवर विपरीत परिणाम होतो. ही काळजी मनावर अनावश्यक ताणाचं ओझं निर्माण करते, त्यामुळं मार्क वाढणं तर सोडाच, उलट कमीच होतात.

इतकं असूनही कामं करावीत, पण यशाची काळजी सोडावी असं कोणाला वाटत नाही. वास्तविक परीक्षेतला शेवटचा पेपर टाकेपर्यंत, आधी म्हटलं तशी, सगळी कर्तव्यं करण्याची गरज आहे. ती केल्यावर मात्र आता निकालापर्यंत मुलाला, आईवडिलांना, संबंधितांना आनंदानं दुसरं एखादं चांगलं काम करता येण्यासारखं आहे. कला, कौशल्य शिकेल, एखादा शॉर्ट टर्म कोर्स करील. निकालाच्या दिवशी निकाल पाहील ! त्यानुसार पुढची दिशा आणि कामं सुरू करील. पण मन असा सरळ, निर्वेध असलेला प्रवास त्याला करू देत नाही. परीक्षा संपली तरी, त्याची अकारण सुरू असलेली काळजी, निकालाच्या आदल्या दिवशी शिगेला पोचलेली असते. मनाची एवढी शक्ती या काळजीवर खर्च होऊनसुद्धा मार्कांवर त्याचा एक टक्काही परिणाम होणार नसतो. पण यापोटी उत्पन्न झालेली काळजी ना मुलाला सोडीत, ना

आईवडिलांना !

त्यात्या टप्प्यावर माणसाला तसंतसं काम असणार, हे उघड आहे, योग्यही आहे. लग्नाची मुलगी-मुलगा आहे, तर त्यासंबंधी काम, नोकरी नसेल तर ती मिळवण्याचं काम, लहान मूल असेल तर त्याच्या संगोपनाचं काम - अशी कर्तव्यं असतात. मनुष्य ती करतो. तरीही खरंतर यांत काही स्थान नसलेली ही काळजी आणि तिचं ओझं वागवीत असलेले अगणित लोक, आपल्याला असंख्य ठिकाणी दिसतील. या काळजीचं स्वरूप नुसतं एवढंच नाही. ओझेवाल्यांनी टोच्या लावून पाठीवर घेतलेलं पोतं, तो योग्य जागा आली की, तिथं ठेवून मोकळा होतो. तो आता ओझेवाला राहात नाही ! पण वेळोवेळी त्यात्या टप्प्यावर तीती कामं करूनही चाळीशीत-साठीत-नव्वदीतसुद्धा मनुष्य काळजीरहित असेल, चित्तानं हलका असेल, मोकळा असेल, अशी शक्यता नाही.

काळजीनं मनाच्या शक्तीचा ऱ्हास होतो. काळजी करताकरता तिची सवय लागून ती करणं बरोबर आहे, असा भ्रमही ती निर्माण करते. इतकंच नव्हे, तर माणसाला काळजी करण्याला, त्या अर्थानं विषय उरला नसला, तरी विषय शोधूनशोधून मनुष्य त्यावर काळजी करतो. नसला तरी उत्पन्न करून देणारे लोकही असतात. ते नसलेला विषय त्याच्या डोक्यात आणून त्याला काळजीत ढकलतात. काळजी एका मर्यादेपलीकडं गेली, म्हणजे ते ओझं माणसाला सहन होत नाही, मग वेगवेगळ्या प्रकारचे मनोकायिक आजार उद्‌भवतात. आनंदाच्या आड येणाऱ्या या काळजीबद्दल आपल्याला काय करता येईल, ते आता समजून घेऊ.

आपल्याला अपयश येण्याच्या भीतीपोटी काळजी निर्माण होते. वास्तविक, आपण केलेलं काम आणि त्याला मिळणारं यश-परिणाम हे नेहमी प्रमाणात असतात. त्यात भीतीला वाव नाही. स्वतःबद्दल बाळगलेल्या अवास्तव अपेक्षा, इतरांच्यात स्वतःबद्दल निर्माण केलेल्या अवाजवी चांगल्या प्रतिमा जपण्याचे प्रयत्न - माणसाच्या मनात काळजी निर्माण करतात.

त्याबाबतीत आपण जसे जेवढे आहोत, ते धैर्यानं स्वीकारण्यानं-सांगण्यानं भीती, काळजी दूर होतात. प्रत्येकाला प्रगतीला वाव असला, तरी कुवत ओळखून प्रगतीची ध्येयं ठेवली तर, काळजीचं ओझं निर्माण होत नाही. अर्थातच सत्याला सामोरं जाण्याच्या धैर्याचा अभाव, अमुक एका मार्गानं गोष्टी

घडल्या तरच आपल्या आयुष्यात आपण यशस्वी होऊ शकू अशा कल्पना, भविष्यात अपेक्षित असलेल्या गोष्टी त्यात्या वेळी त्यात्या पद्धतीनं घडल्या नाहीत तर काय होईल, याविषयी विचार करीत राहाणं, त्यातून पुढं पैसा-प्रतिष्ठा-मानमान्यता यांचा लोभ - असल्या गोष्टी माणसाला प्रत्येक टप्प्यावर काळजीत नेऊन टाकतात. हे समजून घ्यावं. ही वस्तुस्थिती आहे खरी. ती पटली, तरी आपल्याला काय, इतरांना काय, काळजीची ओझी वाहण्याची वर्षानुवर्षांची एक सवय लागलेली असते. ती बहुतांशी बऱ्याच लोकांना बरोबरही वाटते. आजवर लागलेल्या काळजीच्या अनावश्यक सवयीमुळं, या काळजीच्या ओझ्यातून सुटणं सुरुवातीला थोडं अवघड जाईल, पण अशक्य नाही !

कर्तव्यांच्या प्रमाणात मनुष्य कामांची ओझी वाहील, पण नकळत काळजी निर्माण करण्याची मनाची सवय समजून घेतली, तर काळजीचं बिनगरजेचं ओझं वाहाणार नाही ! मग आयुष्याचा प्रवास हलका आणि आनंदी होईल !

**

५. कुवत !

ऑफिसच्या टीमच्या कामांचा क्वार्टरली रिव्ह्यू होता. वेगवेगळी डिपार्टमेंट्स् आणि त्यांचे हेड्स् आपापल्या टीमलीडर बरोबर सर्व मुद्यांबद्दल, वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा करीत होते. सर्वांचं काम संपल्यावर, लंचब्रेकनंतर ब्रँच-हेड बरोबर सर्व डिपार्टमेंटल हेड्सची बैठक झाली. प्रत्येकानं आपापल्या टीमची, टीमलीडरच्या कामांची थोडक्यात माहिती दिली. परत एकदा आपली उद्दिष्टं, कमी-जास्त पडणाऱ्या गोष्टींबद्दल चर्चा झाली. असं लक्षात आलं की, एक डिपार्टमेंट मात्र कामाच्या बाबतीत मागं पडलेलं होतं आणि एच्आर्च्या बाबतीत अडचणीतही होतं.

त्याबद्दल ब्रँच-हेडनं त्या डिपार्टमेंटच्या प्रमुखाची स्वतंत्र भेट घेतली, आढावा घेतला. त्यांच्या हाताखाली चांगला टीम लीडर देऊनसुद्धा त्या डिपार्टमेंटचा परफॉर्मन्स कमी का व्हावा, याविषयी त्यांना जाणून घ्यायचं होतं. डिपार्टमेंट-हेडसुद्धा थोडे गोंधळात होते. त्यांच्याकडं प्रत्येक टीमचा सर्व डेटा होता. तो सर्वसाधारणपणे चांगला होता. डेटावरून अडचण दिसत होती, ती उलट या चांगल्या म्हणून दिलेल्या टीम लीडरच्या संदर्भात होती. याचं कोडं डिपार्टमेंट-हेडनाही समजत नव्हतं. आधीची पाच माणसांची टीम उत्तम हाताळणारा टीमलीडर त्यांनी आता चाळीस माणसांच्या टीमवर नेमला होता. त्यांच्या कामाच्या, यशाच्या अपेक्षा अर्थातच जास्त होत्या. तरीही रिझल्ट मात्र त्यांच्याशी जुळणारे नव्हतेच. उलट टीमचा परफॉर्मन्स खाली आणणारे आणि एच्आर्चे प्रॉब्लेम निर्माण करणारे होते.

यांचा तो गोंधळलेला चेहरा पाहून ब्रँच-हेडनी त्यांना सांगितलं, की तुम्ही काळजी करू नका. आपल्याला त्या प्रश्नाचं स्वरूप नीट कळलं नाही, हे त्याचं कारण आहे. त्याचा खुलासा करताना ते म्हणाले, कुवत आणि काम यांची सांगडच माणसाला यशस्वी करीत असते, हे तर तुम्हाला माहीत आहेच. यात थोडा कुवतीचा अधिक विचार करत जा. यशाच्या अपेक्षांना मर्यादा नसतात. कुवतीला मात्र त्या असतात ! प्रत्येक व्यक्तीप्रमाणं त्याच्या कुवतीची

उंची ठरलेली असते. त्यात त्याचा दोष नसतो. कुवतीपेक्षा काम कमी असलं, तर मनुष्य त्यात जास्त यश मिळवतो. जेव्हा ते काम त्याच्या कुवतीच्या एका अंतिम मर्यादेपर्यंत येतं, तोपर्यंत यशही वाढत जातं. सावध राहावं लागतं, ते त्यावेळेला ! कुवतीपेक्षा जास्त काम आपण त्याच्यावर टाकलं, तर मात्र आता यश त्याप्रमाणात मिळत नाही, उलट अपयश यायला सुरुवात होते. आपण काम देत असतो, अधिकारपद देत असतो, म्हणून हा विषय आपला आहे.

तुम्ही वेटलिफ्टिंग बघितलं असेल. पाचपाच दहादहा किलोंची वजनं लीलया पेलणारा यशस्वी असतोच. तसा तो वजन वाढवीत जाऊन चाळीस, पन्नास किलोंपर्यंत जातो. ती त्याच्या शारीरिक कुवतीची एक मर्यादा असते. त्यापुढं जर तो यशस्वी आहे, म्हणून दोन्ही बाजूंना वजनं वाढवली, तर त्याला ते उचलत नाही, प्रयत्न केला तर तो त्यासकट खाली बसतो. दुसरा एखादा अधिक शारीरिक कुवतीचा माणूस त्याच्याही पुढं दहादहा वीसवीस किलो जातो, यशस्वीपणे उचलतोही. आता यात पहिल्याचा दोष नाही. त्याच्या कुवतीची ती मर्यादा आलेली असते. त्यानं ती ओळखावी आणि तेवढं यशाचं रेकॉर्डही त्यानं करावं. दुसऱ्यालाही पहिल्याच्या तुलनेनं अहंकार वाटायचं काम नाही. त्याचं यश दिसायला मोठं दिसलं, तरी त्याच्या कुवतीप्रमाणं ते बरोबर असतं. उद्या त्याच्यावरही त्याच्या कुवतीप्रमाणं वजन वाढवीत गेलं, तर तोही एका क्षणी खाली बसेल. तेही त्यानं अपयश मानायचं कारण नाही !

स्पर्धेसाठी उतरवताना त्यांच्या गुरूंना ते कळलं म्हणजे झालं. तुमच्या या टीमलीडरला पाच माणसांची टीम उत्तमपणे सांभाळता आली, ते त्यांचं यश आहेच, त्याचं आपण कौतुक केलंच पाहिजे. अभ्यासानं माणसाची कुवतही थोडी वाढू शकते. पण आधी म्हटलं, तसं ती एका मर्यादेपर्यंत. त्यानंतरचं काम त्याची इच्छा असली, त्याला करायचं असलं, तरी कुवतीच्या प्रश्नामुळं त्याला अडचणी येतात. हे खरं तर त्यानं लक्षात घ्यावं, हे अधिक चांगलं ! वेळी त्यापुढचं काम स्वीकारू नये. त्यामुळं त्याच्या कुवतीचा पुरेपूर वापर होईल, कामांत यश येईल, तोही आनंदात राहील आणि कंपनीही. इथं थोडा तसा प्रश्न झाला आहे. आता तो तुम्ही त्याच्याबरोबर बोलून सोडवा ! यथावकाश त्या टीमलीडरला चाळीसऐवजी दहा जणांची टीम देऊन तो प्रश्न निर्वेधपणे मार्गी लागला !

कुवतीचा हा प्रश्न असा एखाद्या ठिकाणापुरता नाही. तो तसा

सार्वत्रिक आहे. त्यात कुणी कुणाला काही सांगण्यापेक्षासुद्धा सर्वांत जास्त उत्तमपणे तो सुटणार असेल, तर स्वतःला तो कळण्यानं, समजून घेण्यानं आणि स्वीकारण्यानं. एखाद्या ऑफिसमध्ये क्लार्क म्हणून उत्तमपणे काम करणारी आणि वेळी अधिकाऱ्यांचीही काही कामं सांभाळू शकणारी व्यक्ती, केवळ कुवतीच्या एवढ्या अंदाजावर अधिकारी म्हणून नेमली, तर ती तेवढीच यशस्वी होते, असं अनेकदा आढळत नाही. काही गुण, शक्ती या सुप्त स्वरूपात असतातही. त्यांना योग्य वातावरण दिलं गेलं, तशी जबाबदारी, संधी मिळत गेली, तर व्यक्ती विकसित होतात. वरवरच्या पदांवर जातात, यशस्वीही होतात. पण तेही या कुवतींच्या शक्यतांच्या मर्यादेपर्यंत !

कुवत असं म्हटलं, की साधारणपणे बौद्धिक कुवत, शारीरिक कुवत - अशा ढोबळ गोष्टी समोर येतात. पण कुवतीमध्ये - शिकण्याची क्षमता, नम्रता, सबुरी, स्वतःची आणि कुटुंबाची एकूण आर्थिक कुवत, त्यात निकड असल्यास कष्टानं, कौशल्यानं भर घालण्याची कुवत, पालकांची कुवत अतिरिक्त असली तर आपल्या कुवतीएवढंच आपण त्यातून स्वीकारण्याचा विवेक आणि धैर्य, इतरांबद्दलचा खरा आदर, त्यांनी मोठं व्हावं, उत्तरोत्तर अधिक यशं मिळवावी अशा तऱ्हेचं निकोप औदार्य, इतर व्यक्तींच्या चांगल्या कामांची पारख आणि मनमोकळं कौतुक - अशा असंख्य गोष्टी या कुवतीत समाविष्ट आहेत. त्यात आणखीही अनेक गोष्टी आढळतील.

या साऱ्या कुवतीच्या गुणांचा मुकुटमणी, हा आधी म्हटलं तसं, आपापल्या कुवती वस्तुनिष्ठपणे ओळखणं, स्वीकारणं आणि त्यानुरुप योग्य, आदर्श असं काम इतरांबरोबर आनंदानं करणं, मागं असणाऱ्यांना प्रोत्साहन आणि पुढं असणाऱ्यांचं निर्भेळ कौतुक आणि शुभेच्छा - हे सारं देण्याची कुवत असणं, हा आहे !

याचा व्यक्तीच्या सुखदुःखाशी अगदी जवळचा संबंध तर आहेच, पण त्याच्याबरोबर वावरणाऱ्या कुटुंबातल्या, नात्यातल्या, मित्रपरिवारातल्या - अशा सगळ्यांच्या सुखदुःखाचाही संबंध आहे. त्याची सुरुवात अगदी लहानपणातल्या खेळापासून होते. श्रीमंत मित्रांच्या संगतीत मिळालेलं खेळणं आपल्या घरी, आपल्या गरीब आईवडिलांनीसुद्धा द्यावं असा हट्ट, त्यापोटी त्रागा, त्यामुळं आईवडिलांना वाटणारी खंत, राग - इथूनच दुःखं सुरू होतात. ती अशा कुवती न ओळखण्यामुळं सुरू होतात. त्या अर्थानं आपली स्वतःची कुवत

नसताना घेतलेली घरंदारं, मुलांना अत्यंत खर्चिक ठिकाणी शिक्षणाला घालणं, त्यांच्या कुवतीबाहेर असलेले अभ्यासक्रम त्यांना नकळतपणे सक्तीचे करणं, ईएम्आयसुद्धा न पेलणाऱ्या महागड्या गाड्या, चैनीच्या वस्तू - असा हा सारा दुःखद प्रवास सुरू राहातो. हा कुवतीचा मुद्दा लक्षात आला नाही, अमलात आणला नाही, तर हा प्रवास आयुष्यभर नव्हे आयुष्याच्या अंतापर्यंत सुरू राहातो. तो अस्वास्थ्य देतो यात शंकाच नाही !

एखाद्या वेळी नामांकित गायक-वादकाच्या मैफिलीला त्याची आवड असलेला माणूस जातो. त्यांची ती तल्लीनता, पेशकारी, नजाकत, झेप, स्वरावरची-तालावरची हुकुमत हे अवर्णनीय असतं. लोकांचा प्रचंड प्रतिसाद, टाळ्या, वाहवा, प्रसिद्धी, कॅमेरे, लाईटइफेक्ट्स् - यांत श्रोता-प्रेक्षक देहभान विसरून जातो, आनंदात असतो. इथंपर्यंत ठीक आहे. पण ते संपलं की, तो एका भाषेत, 'देहा'वर येतो. मग काहींना वाटू लागतं, बस् आता हेच वाद्य वाजवायचं, असंच वाजवायचं, आपली मैफल अशीच होणार !

आर्थिक पाठबळाची ऊब असते तोवर तसली वाद्यं येतात, शिकायला जाणं सुरू होतं. पण हे सारं कुवत नसताना करणाऱ्यांच्या आयुष्यात असा मैफिलीचा दिवस कधीच उजाडत नाही. त्यात मनुष्य हुशार असला, तर तो उत्तरायुष्यात कुवतीचा खरा मुद्दा टाळून - या गोष्टी आम्हीही केल्या असत्या, पण आम्हाला तसा वेळ नाही, स्वास्थ्य नाही - असं सांगून टाकतात. त्यानं वस्तुस्थिती बदलत नाही.

याबाबतीत दुसरीही एक बाजू आहे. त्या हजारो श्रोत्यांमध्ये एखादा लहान मुलगाही असतो. जबरदस्त समज, अपरंपार कष्ट, शिकण्याची अथक तयारी, अखंड रियाज या मार्गानं एक दिवशी तो तिथंच काय, त्याच्यापेक्षाही मोठ्या उंचीवर पोचतो. पण त्यालाही कारणं, आधी म्हटली तशी, कुवत ओळखण्यात आणि ती वापरण्यात असतात.

मग अशी कुवत नसलेल्यांनी यांतलं काही करूच नये का ? हा प्रश्न प्रामाणिक वाटला, तरी वस्तुस्थितीकडं दुर्लक्ष करणारा आहे. कुवतीनं माणूस उत्तम गायक होईलही, पण त्याहीपेक्षा वेगळ्या आणि परतत्त्वस्पर्श असलेल्या, रसिकत्वाच्या कुवतीच्या विकासानं अव्वल श्रोताही होईल. माणसाकडं काही एकाच प्रकारची कुवत नाही आणि सगळ्यांकडं सगळ्या प्रकारच्या कुवतीही सहसा नाहीत. अशा वेळी आपल्या कुवतीप्रमाणं केलेलं काम तितकंच मोलाचं

आणि आनंददायी असतं. फक्त त्यासाठी कुवतीबद्दलची ही आणि यापेक्षाही मोठी समजूत हवी ! याच काय, प्रत्येक क्षेत्रात - शेती, संशोधन, तंत्रज्ञान, साहित्य, व्यवस्थापन, कला, सेवा - अशा अनेक क्षेत्रांत मनापासून काम करणाऱ्यांची गरज आहेच.

कुवती जशा वेगवेगळ्या असतात, तशा गरजांच्या पातळ्या, क्षेत्रंही वेगवेगळी असतात. कुवत समजून, तिचा विकास करून वेगवेगळ्या पातळीवर उत्तमात उत्तम काम करणारा माणूस खरोखरच हवा आहे. तो बाहेर समाजमंदिरात विधायक कार्याचा कळस गाठता यावा, यासाठी योगदान देईल आणि अंतरंगात तर सदैव आनंदाच्या कळसावर विराजमान राहील !

**

६. अंतर...

रविवारचा दिवस. सर्वांना सुट्टी असल्यामुळं मुलांना उठवण्याची, शाळेत पाठवण्याची गडबड नाही. एरवी स्वयंपाकघरात चहा-कॉफीपुरता वेळ देऊन पटकन आवरायला जावं लागतं, तेही आज नाही. त्यामुळं उशिरा उठून, कॉफीचे कप हातात नुसतेच घेऊन, पती-पत्नीच्या इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. आठवड्याभरात गडबडीमुळं राहून गेलेला नव्या वस्तूच्या खरेदीचा विषय. ती आणायला आज मुहूर्त मिळेल यावर एकमत झालं. आज पुन्हा एकदा चौकशी करू, वाटलं तर अजून पाहू. ती केव्हा घरपोच होईल याची चौकशी करून संध्याकाळपर्यंत परतू. असा सगळा संवाद उत्साहानं, एकमतानं ठरत ठरत चाललेला होता. त्यातच संध्याकाळपर्यंत घरी परतलं तर चालणार असेल, तर मग घरच्या नाश्त्याला, स्वयंपाकाला सुट्टी देऊन, बाहेर जेवूनच घरी परतू, हेही ठरलं.

इतक्यात दरवाजावरची बेल वाजली. दोघांनी एकमेकांकडं बघितलं. चटकन उठून दार उघडायला जाणाऱ्या पतीला पत्नीनं खुणेनंच थांबवलं. इतका वेळ एकमनानं, समरसपणे चाललेल्या संवादाला ब्रेक लागला. पत्नीनं हळू आवाजात सांगितलं,'आज तरी काही लगेच उठून दरवाजा उघडायला जाऊ नका. बेल कुणाची आहे, ते मला माहितीच आहे.' त्यालाही हे माहीत होतं, ती शेजारच्या काकांची असणार. त्यांचं तसं काही कामही नसणार. ते येणार, पेपर वाचणार, गप्पा मारणार, मग पत्नीच्या मूडनुसार चहा किंवा चहा-नाश्ता दोन्हीही मिळणार.

आत्ताही तिच्या चेहऱ्यावर तेच भाव होते,'आत्ता तरी लगेच काही जाऊ नका. आज रविवार आहे, उठलो नाही, म्हणून ते परत जातील. असं काही कुठून लांब अंतरावरून ते आलेत का ? भिंतीपलीकडं तर ते राहातात. येतील पुन्हा तासाभरानं !' सकाळी उठल्यापासून एकमनानं आणि सोबतीनं चाललेली गाडी आता अडखळली होती. त्याला वाटत होतं, जाऊदे, आपले एकेकाळचे ऑफिसमधले साहेब आहेत, शेजारी आहेत, निवृत्त आहेत, हे खरं.

पण म्हणून दारसुद्धा उघडू नये असं काही नाही. आपली गडबड असेल तर बोलणं उरकतं घ्यावं, सांगावं. त्याला अनुभवानं हेही माहीत होतं, हे सारं तिला सांगून काही पटणार नाही.

पुन्हा शब्दानं शब्द वाढणार. ती म्हणणार तुम्हाला हे सांगणं जमणार नाही. सुट्टीचा दिवस म्हणून ते काही समजून लवकर हालणार नाहीत. एकदा चहापाणी मागं लागलं, की पुढचा सबंध सुट्टीचा दिवस 'असाच' जाणार. अखेर त्याची पावलं बाहेर वळली आणि तिची कट्ट्याकडं! दोघंही त्या अर्थानं घरातच होते. फार झालं तर पाचदहा फुटांवर. पण मनातलं अंतर मात्र शेदोनशे फूट झालं होतं !

हा तसा छोटासा, कधीही, कुठंही घडणारा प्रसंग आहे. वास्तविक,आपल्याला लहानपणापासून 'अंतर' शब्द दोन ठिकाणांमधलं भौगोलिक अंतर या अर्थानं परिचित आहे. शाळा एक फर्लांगभर अंतरावर असली आणि ती नावडती असली, तर ते अंतर मुलांना चालायला खूप वाटतं. ते त्यामानानं काहीच नाही. इतर मुलं किती अंतरावरून येतात-असलं काही सांगून फारसा उपयोग होत नाही. त्यामुळं आईवडिलांना या फर्लांगभर अंतरावरच्या शाळेतसुद्धा मुलांना गाडीवरून सोडावं-आणावं लागतं.

आपल्याला विरंगुळ्यासाठी कुठं चारआठ दिवस बदल म्हणून, कौटुंबिक सहल म्हणून जायचं असेल, तर उलट मनुष्य जवळचं ठिकाण शोधण्यापेक्षा आधी दूरच्या अंतरावरचं, चांगलं ठिकाण निवडतो. एरवी कामासाठी जवळच्या ठिकाणाच्या शोधात असलेला माणूस, असल्या बाबतीत मात्र अधिक लांबचं अंतर निवडतो असं आढळेल.

घरातून ऑफिसला जायचं असेल किंवा असं सहल म्हणून कुठं शेकडो मैल जायचं असेल, कुठल्या तरी मार्गानं त्यात्या अंतरावरच्या ठिकाणी जायला लागणारा वेळ मात्र, कमीत कमी करण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. एखाद्या दुचाकीपासून विमानापर्यंत, त्यात्या अंतराप्रमाणं आपली वेळेची बचत करण्याची गरज, आर्थिक कुवत - याप्रमाणं मनुष्य वाहनांचे पर्याय काढतो. रेल्वेनं दोन दिवस चालणारा प्रवास, विमानानं दोन तासांत संपवून, तो मोकळा होतो.

यात तो आठ दिवसांचं-दोन दिवसांचं भौगोलिक अंतर दोन तासांवर आणीत नाही. पण त्या प्रवासाचा, वेळेचा त्रास वाचवून तो मात्र दोन तासांवर

आणतो. इथं विचार करण्यासारखं हे आहे, की भौगोलिक अंतर हे तर तेवढंच राहाणार आहे. गावं तितक्याच अंतरावर राहाणार आहेत. आपल्याला आपल्या गरजांनुसार, त्यात्या गावी जावं-यावंही लागणार आहे. व्यवहार असो, कार्य असो, विरंगुळा असो की आणखी काही. मग अंतरात फरक करण्याचा प्रश्न तर येणार नाही. ते आहे तसंच स्वीकारावं लागतं. उरतो पर्याय, तो आपण पाहिला तसा वेळ-त्रास कमी करणाऱ्या वाहनाचा. तेही तसं मर्यादितच असतं.

मग असं का होत असावं, की आपल्या जिवलग मित्राचं पाच किलोमीटरवरचं घर, आपण जातायेता सहज जाऊन येऊ, असं वाटतं आणि पत्नीच्या भावाचं दोन किलोमीटरवरचं घर म्हणजे, मात्र केवढा तरी वळसा वाटतो ! पुढच्या रविवारी गेलं तर नाही का चालणार, असं का म्हणावंसं वाटतं ? बरं, हे एवढ्या बाबतीतच होतं असं नाही. आपल्या ऑफिसमधल्या जवळच्या मित्राचं लग्न असलेलं कार्यालय, हे इथं 'अगदी दोन' किलोमीटरवर आहे, असं नकळत वाटतं ! त्यात काही मोठं अंतर आहे, असंसुद्धा वाटत नाही. पण तेच पत्नीच्या ऑफिसमधल्या कुणाचं लग्न असलेलं, अगदी अर्ध्या किलोमीटरवरचं चौकातलं कार्यालयसुद्धा लांऽब वाटतं !आता एवढं लांब कधी जायचं, मग तिथं गर्दी असणार, पार्किंगचा प्रश्न, आपल्याला खूप वेळ होईल- असे, जवळजवळ ते जाणं रद्द करणारे, विचार मनात का येतात?

हे घरात होतं, ऑफिसमध्ये होतं, नातेवाईकांच्यात होतं,मित्रामित्रांत, मैत्रिणींच्यात होतं. मूळ भौगोलिक अंतरं तीच असून, आता हे सोपं, सहज, जवळ, जाता जाता-'असं' काही बाबतीत वाटणारं अंतर - एरवी मात्र कधीकधी, एवढ्या लांब कुठं जायचं, गर्दी खूप असते, जायला वेळ होईल, रस्ता कऽस्सला आहे - असं तेच अंतर, 'तसं' का वाटतं ? उघड आहे की, आता असं वाटणं भौगोलिक अंतरांवर नाही. कारण ती तर तशीही बदलता येत नाहीतच. दुचाकी, चारचाकी, रेल्वे, विमान - असे अंतरं गाठायला लागणारा वेळ आणि त्या अर्थानं अंतरं कमी करणारे वाहनांचे आपण मार्ग काढले, त्याचा उपयोगही करतो. पण त्यापलीकडची तशी अजून काही विद्या, क्षमता आपल्याजवळ आहे. ती म्हणजे आपुलकी, आत्मीयता, प्रेम !

ती असली, वापरली, तर तीच अंतरं एका वेगळ्या अर्थानं कमी करण्याचं सामर्थ्य त्यांत आहे. उलट त्यांचा अभाव असला - दुरावा, संबंधातला कोरडेपणा - अशा गोष्टी असल्या, की तीच अंतरं वेगळ्या अर्थानं

वाढवण्याचं आणि त्रासदायक करण्याचं सामर्थ्यही या मनाच्या क्षमतांत आहे. आपल्याला त्या क्षमतांची जाणीव नसली, तरी त्या क्षमता आपल्याआपल्या पद्धतीनं काम करीतच असतात. म्हणून सुरुवातीला म्हटलं तसं, सुट्टीच्या सकाळचा, आणायच्या वस्तूतल्या एकमताचा आनंद होता, तोपर्यंत हे मानसिक अंतर नव्हतं. असं अंतर नसतं तेव्हा आनंद असतो, तो होताही. पण एकदा बेल वाजण्याचं निमित्त झाल्यावर विचारांत, करायच्या कृतींत, मतांत - अंतर वाढत चालल्यावर, हाच आनंद कमी होत गेला. हे कसं आणि का घडतं, याची जाणीव नसली, तर मन आपला उद्योग नकळत करीत राहातं आणि सुट्टीचा सगळा दिवसही वाईट घालवू शकतं !

म्हणून आपल्याच हितासाठी, आनंदासाठी हे ओळखून राहावं, की भौगोलिक अंतर कायम राहातं, ते अंतर गाठायला लागणारा वेळ, शक्य असेल तेवढं अधिक चांगलं वाहन वापरून, कमी करता येतो.

पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे अंतर कायम असलं, वाहन कुठलंही असलं तरी निरपेक्ष स्नेहानं, आपुलकीनं, प्रेमानं कुठलंही अंतर, कितीही कमी करता येतं आणि जितकं कमी करता येईल, तेवढा आनंद वाढत जातो ! असा आनंद वाढवणं आपल्याच हातात असतं !

**

७. 'आपलं' जग..!

शाळेत असताना आपल्या तालुक्याचा परिचय करून देणारं - आपला तालुका, जिल्ह्याचा परिचय करून देणारं - आपला जिल्हा - अशी पुस्तकं असतात. पुढं मोठ्या पातळीवर जगाचा परिचय करून देणारं - आपलं जग - असंही पुस्तक असतं. व्यवहाराच्यादृष्टीनं आपण एकाच वेळी आपल्या तालुक्यात, आपल्या जिल्ह्यात आणि फार मोठ्या असलेल्या आपल्या जगातही राहात असतो. एकाच वेळी असे आपण आपला तालुका, जिल्हा, राज्य, जग अशा सगळ्यांत कसे काय राहू शकतो, याचा विचार करताना थोडी गंमत वाटते. आपण तेच असतो, एकाच ठिकाणी राहातो, पण एकाच वेळी आपण अशा अनेक ठिकाणीही राहिल्यासारखं असतं. हे थोडं विस्मयकारक असलं तरी, ते संदर्भानं खरं ठरतं.

जिल्ह्यात कुठं राहाता म्हटलं तर, तालुक्याचा उल्लेख करावा लागतो, राज्यात कुठं राहाता म्हटलं तर जिल्ह्याचा उल्लेख करावा लागतो. त्या अर्थानं हळूहळू सर्वांचं एक समान उत्तर निघतं, ते म्हणजे आपण या जगात राहातो. त्याला आपण 'आपलं जग' असं म्हणतो. हे सगळं तसं सोपं, सरळ वाटतं. पण वस्तुस्थिती काही वेगळं सांगते, शिकवतेही.

कुठं व्याख्यान चालू असतं, ते ऐकायला अनेक माणसं असतात. तिथं एका विषयाला धरून अनेक गोष्टी सांगितल्या जात असतात. ते ऐकताना सगळे वस्तुतः एकाच ठिकाणी, एकाच कामाला आणि एकत्र श्रवण करीत असलेली माणसं असतात. त्याअर्थानं या बाबतीत ते एकाच जगात, त्या वेळेपुरते तरी वावरत असतात. पण म्हणून सगळ्यांचा असाच एकत्रित प्रवास चालू असतो का, याकडं थोडं लक्ष द्यावं. ऐकता ऐकता एखादं उदाहरण किंवा प्रसंग एखाद्या श्रोत्याच्या जीवनात घडलेला असतो. ते ऐकताच त्याला त्याची आठवण होऊन त्यावर तो विचार करीत बसतो. त्यावेळचं सारं त्याच्या डोळ्यांसमोर उभं राहातं. कधीतरी तो त्यातून बाहेर येतो, तोपर्यंत इकडं दहा-पंधरा मिनिटांचं व्याख्यान पुढं गेलेलं असतं. त्यामुळं मधले संदर्भ लागत

नाहीत. त्यांच्याशी जुळवून घ्यावं लागतं.

असं अनेकांच्या बाबतीत वेळोवेळी घडत असतं. इथल्या त्या व्याख्यानाच्या विश्वात बसलेली माणसं अशा वेळी प्रत्यक्षात इथं, एकत्र बसलेली दिसली, तरी ती 'आपापल्या जगात' वावरत असतात. म्हणून मनुष्याला विचारलं की, तो कुठल्या जगात जगतो, तर या सर्वांच्या जगात जगत असूनही, खऱ्या अर्थानं तो 'आपल्या जगात' जगत असतो.

काही वेळा पती ऑफिसमधून आल्यावर हुश्श करून, चहापाण्याची वाट बघत बसलेला असतो. ते सुरू असताना आत आल्या बरोबर, आज उशीर का झाला इथंपासून दुपारी काय काय घडलं, कुणाकुणाचे फोन आले, कोण कोण येऊन गेलं, नातेवाईकांच्यात, संबंधित माणसांच्यात कोणत्या नवीन घटना घडल्या - अशा असंख्य विषयांवर त्याला एवढं ऐकून घ्यावं लागतं, की त्याचं चहापाणी झालं आहे, हेही तो विसरून जावा. कारण त्याला दिवसभरात तिकडं कोणते ताणतणाव होते, कोणती माणसं भेटली, कोणते निर्णय घ्यावे लागले, कोणती कामं मनासारखी झाली-झाली नाहीत - यांसंबंधी इतकं सांगायचं असतं, तेही त्याच्या डोक्यात विरून जातं.

आता ती तिच्या जगात वावरत असल्यामुळं आणि त्याची फारशी जाणीव नसल्यामुळं, त्या सगळ्या जगातलं सांगण्यापलीकडं दुसऱ्याच्याही जगात काही सुरू असेल, ते आधी समजून घ्यावं, हा विचारही तिच्या मनात येत नाही. त्याला सांगायला संधी मिळाली नाही म्हणून, अन्यथा असं नसतं तर तोही आल्याबरोबर त्याच्या जगात राहिला असता आणि त्यानंही तेच केलं असतं.

ज्याला कुणाला आपल्या जगातलं सांगता आलं नसेल, त्याचा कोंडमारा होईल, त्याला त्रास होईल, हे उघड आहे. म्हणून आपल्याला अनेकदा घरोघरी आणि समाजातही विसंवाद, त्रास, त्रागा आणि पर्याय नसला तर शेवटी राग किंवा भांडणं होत असल्याचं आढळून येईल. आता आपण स्वतः ज्याच्याशी थेट निगडित आहोत आणि ज्यात जगतो आहोत, ते 'आपलं जग' असणार हे सत्य आहे. पण तेवढंच जग आहे किंवा इतरांचंही तसंच जग असणार, याचा विसर पडल्यावर एकमेकांची अशी जगं समजून घेतली जात नाहीत, तेवढी सबुरी, समजूत उरत नाही. मग परस्परांच्यातल्या संवादाला, आनंदाला बाधा येते. ते लक्षात न आल्यास, एखाद्या उदाहरणापुरतं ते मर्यादित

राहात नाही. त्यात पुन्हा अशी जाणीव, समजूत असणं हे त्यात्या व्यक्तीवर अवलंबून आहे, वयावरही नाही.

म्हणून आपल्याला असंही आढळून येईल, की कर्त्या मुलासमोर असंख्य कामं असतात, ताणतणाव असतात, जबाबदाऱ्या असतात, तसंच ते कदाचित त्याच्या पत्नीबद्दलही असतं. ते लक्षात घेतलं जात नाही. अशावेळी अशी समजूत नसलेली घरातली प्रौढ-वृद्ध माणसं या नव्या पिढीला, आत आल्याआल्या दोन मिनिटं बसू देत नाहीत की पाणी पिऊ देत नाहीत. त्यांनी आणायला सांगितलेली एखादी वस्तू, औषध आणलं की नाही, हे दारात पाऊल टाकल्याटाकल्याच विचारतात. काही जण तर त्यांच्या जगाविषयी इतके आग्रही असतात की, इतरांनी काम केलं तरी त्यात काय विशेष, असा त्यांचा भाव असतो आणि नाही केलं तर मात्र, तुम्हाला आता आमची किंमत उरली नाही, असले शेरे मारून, विषय बंद करतात आणि आपल्याशीच खिन्न होऊन बसतात.

याउलट आपल्याला जसं आपलं जग आहे, तसं त्यांनाही त्यांचं जग आहे, याची जाणीव असली, तर असा चांगला अनुभवही आपल्याला येऊ शकतो, की अशी मोठी माणसं आधी या कर्त्या मुलांना, सुनांना त्यांचं दिवसभरात काय घडलं, सगळं ठीक आहे ना - अशा सहज आणि प्रेमळ विचारणा करताना दिसतील.

त्यांनी काम केल्याचं कळलं तर त्याबद्दल, इतक्या गडबडीत तुम्ही हे लक्षात ठेवलंत, असे कौतुकाचे चार शब्दही बोलतील. तसंच ते काम न केलं तरी, ते इतकं महत्त्वाचं नाही, उद्या-परवा बघता येईल, असं म्हणून कुठलाही ताण निर्माण न करता, तो विषय स्वास्थ्यानं घेतील आणि त्या कर्त्या पिढीलाही त्याची खंत, त्रास देणं टाळतील.

आता यांतलं काय उपयोगी आहे, सकारात्मक आहे, ते आपण सहज ठरवू शकतो. हेच कदाचित पुढं शिक्षणाच्या टप्प्यातल्या मुलांच्या आणि त्यांच्या आईवडिलांच्या बाबतीत होऊ शकतं. अगदी या शब्दांत नसलं तरी समजुतीनं इतरांचा विचार करणं कॉलेजमधल्या मुलांनाही शक्य असतं. त्यांच्या आईवडिलांनाही. पण अशा तऱ्हेची जाणीव, समजूत नसली तर, ते कुणालाही अशक्य वाटतं. मग विसंवाद होतो, त्रास होतो. या अर्थानं ते वयावर अवलंबून नाही.

थोडं पुढं जाऊन आपण पाहिलं तर, ज्याचा अनुभव कुटुंबात येतो, त्याचा अनुभव दोन नातेवाईक, दोन शेजारी, एखादी अपार्टमेंट, एखादी सोसायटी या ठिकाणीही येताना दिसेल. तिथंही पुन्हा असं आपलं आपलं जगच बरोबर आणि तेच महत्त्वाचं आणि खरं - त्याचबरोबर इतरांचं कमी महत्वाचं आणि चुकीचं असं वाटून, त्याप्रमाणं या साऱ्या ठिकाणी वागणारे लोक, हे त्यात्या पातळीवर असाच विसंवाद आणि अशांतता आणतात.

आपलं जग हे असणार-व्यक्तीपुरतं, कुटुंबापुरतं, नातेवाईकांपुरतं, अपार्टमेंट, सोसायटी, गल्ली, गाव - असं त्यात्या पातळीवर असणार, हे समजूनच राहिलेलं बरं. अडचण आहे ती, तेच खरं, बरोबर, मुख्य - अशा गोष्टी मानण्याची, वागण्याची. तसं मानायचं खरं तर कारण नाही. कारण प्रत्येक पातळीवर या जगाला त्यात्या पातळीवरच्या स्वार्थांच्या मर्यादा पडतात. म्हणून त्यापोटी होणाऱ्या कुठल्याही कृती या स्वार्थी,अहंकारी आणि अर्थातच अनुचित असतात. कारण आपल्यासारखंच दुसऱ्यालाही त्याचं जग असतं. त्यालाही त्याप्रमाणं व्हावं, असं वाटणं स्वाभाविक असतं.

त्यामुळं मूलतःच असं दोघांच्याही किंवा अशा अनेक समूहांच्याही मनाप्रमाणं, सुखाचं सदैव घडणं शक्य नसतं. स्वतःच्या जगाला थोडी मुरड, दुसऱ्याच्या जगाचा थोडा स्वीकार, त्यासाठी सर्वांनीच करायचा थोडा त्याग, दाखवायची अत्यावश्यक समजूत - या मार्गांनी त्यात्या काळचे, त्यात्या पातळीवरचे प्रश्न सुटू शकतात. विसंवाद, त्रास खूप कमी होऊ शकतात, आनंद वाढू शकतो.

अधिक मोठ्या पातळीवर विचार केला, तर भौगोलिक, राजकीय, धार्मिक - अशा अनेक पातळ्यांवरही असे विसंवादाचे, त्रासाचे प्रश्न असतातच. खूप वेळा या आपल्याआपल्या जगांना प्राधान्य देण्यानं, इतरांच्या जगांचा विचार न केल्यामुळं, त्यांनाही आवश्यक प्राधान्य न दिल्यामुळं, समजुतीच्या विकासाची सर्व पातळ्यांवर वाढ न झाल्यामुळं - मुळात असे प्रश्न निर्माण होतात. खूप मोठे होऊन बसतात.

आपल्या रोजच्या पातळीवर पाहिलं तरी, आपल्या कुटुंबात प्रत्येकाचं 'आपलं जग' समजून घेणं गरजेचं आहे. तसंच इतर घटकांचं 'आपलं' जगही समजून घेणं शक्य आहे. तीच गोष्ट बाहेर पडल्यावर ऑफिसमध्ये आपल्या सहकाऱ्यांच्या बाबतीत, वरिष्ठांच्या बाबतीत करण्याचा फायदा आहे. तसंच ते

आपण कुठल्या धंद्यात, व्यवसायात असू तर व्यवसायातले स्पर्धक, नोकरवर्ग, देणेकरी-घेणेकरी, पुरवठादार, ग्राहक - अशांच्या बाबतीतही करणं गरजेचं आहे. अनेकदा, 'ते असं कसं काय म्हणतात, ते असं कसं वागले, त्यांनी माझं नुकसान केलं..' - असल्या होणाऱ्या प्रतिक्रिया, एकमेकांच्यावरचे राग, गैरसमज जरूर कमी होतील.

भूगोलानं 'आपल्या जगाचा' परिचय 'घडतो'. पुढं मात्र अशा मानसिक पातळीवरच्या 'आपल्या आणि इतरांच्याही जगाचा' परिचय घडणं, समजूत वाढणं, त्यामुळं विसंवाद कमी होणं, सौख्यात भर पडणं - हा आनंदाचा प्रवास करणं, आपल्याच हाती आहे. बेसावध, चुकीचा प्रवास 'घडू शकतो', पण 'बरोबर, आनंददायी प्रवास' मात्र आपोआप घडत नाही, तो आपल्यालाच 'करावा लागतो'!

**

८. खरी सोबत !

सकाळची गडबडीची वेळ असते. अनेक मुलींच्या घरी माहेरून आईचा फोन येतो. धावपळ एवढी असते की, केवळ आईचाच आहे म्हणून तो फोन घेतला जातो. काही घडणं, आजारी पडणं - असं अचानक काही असलं तर फोन घेतलेला बरा, अशा शंकेनं फोन उचलला जातो. इथं स्वयंपाकाचा कट्टा, गॅसवर ठेवलेल्या वस्तू, मुलांची दप्तरं भरणं, आपली ऑफिसची वेळ सांभाळण्याचं व्यवधान - असल्या गडबडीत फिरतफिरत संभाषण होतं. लक्षात येतं, तसं काही घडलेलं नसतं. पण आठवण आली, बोलायला कुणी नाही, एकाकी वाटतं - अशा नेहमीच्याच कारणानं फोन केलेला असतो.

तेवढ्या गडबडीतही मुलगी ते समजावून सांगत असते. अनेक गोष्टी सांगूनही शेवटी, तशी कुणाची खरी सोबत नाही, यावर आईचा आवाज जड होतो. पुढं बोलवत नाही. फोन बाबांकडं दिला जातो. तेही त्याच भावनेत असतात. शेवटी मुलीला घड्याळ दिसत असतं. अखेर नाईलाजानं, आत्ता मला वेळ नाही, रात्री घरी आल्यावर निवांत फोन करीन, असं सांगावं लागतं. इकडं आईवडिलांना वाटतं तिला फोन घ्यायलाही सवड नाही. एकीकडं तिची बाजू समजते. पण आपल्याला सोबत नाही, अशी खंत काही मनातून जात नाही !

एखादा दिवस ढगाळ वातावरणात, कोंदटलेल्या हवेत उजाडावा आणि संपावा अशा अवस्थेत अकारणच खिन्न, एकाकी, वाटत दिवस जावा, तसे अशा अनेकांचे दिवस सोबतीच्या अभावी जातात. या आईवडिलांना मुलगा आहे, मुलगी आहे. मुलगी त्याच महानगरात असली तरी दूरवरच्या उपनगरात राहाते. आईवडिलांना प्रत्यक्ष भेटणं तिला कठीण असतं. आपल्या आयुष्याची सारी कमाई मुलाच्या उच्च शिक्षणासाठी रिकामी करून आईवडील मोकळे झालेले असतात. पण मुलाची बुद्धिमत्ता, यश, त्यामुळं मिळत गेलेल्या संधी त्याला अखेर परदेशात घेऊन जातात. पहिल्यांदा असं वाटतं, तो इथं येणार, मग त्याची, सुनेची, नातवंडांची आपल्याला सोबत होणार - या

कल्पनांनी पूर्वीच घेऊन ठेवलेल्या मोठ्या घरातल्या दोनदोन खोल्या आता वर्षानुवर्षं रिकाम्याच राहातात.

हळूहळू वर्षातून येणारा मुलगा, आता दोन वर्षांतून येतो, सुनेला, नातवंडांना आणीत नाही. त्यांनाही त्यामुळं यांचं प्रेम लागत नाही. नंतर कधीतरी ओघात कळतं, की त्याचा तिकडंच स्थायिक व्हायचा विचार आहे. कर्तृत्वानं मिळवलेल्या पैशाची आधीची ऊब-सोबत तर कधीच कमी झालेली असते. त्याची खंत मध्येमध्ये मनात येत असते. रिकाम्या खोल्या सोबत देत नाहीत. तेव्हा एवढं मोठं घर मोकळं करून छोट्या फ्लॅटमध्ये जावं, असा विचार मनात येतो. मधल्या काळात महागाई, बाजारभाव एवढे वर गेलेले असतात, की ते विकून त्यात दोन खोल्यासुद्धा येणं अवघड दिसतं. वनआरके एवढंच शक्य दिसतं. मुलाचा अंदाज घ्यावा म्हणून त्याच्या कानावर घातलं, तर तो तिकडं अमाप पैसा मिळवीत असून, मदतीची भाषा करीत नाही. तर उलट, त्याच किमतीत येईल असं बघा, असा सल्ला देतो !

त्यावरून जवळ राहून नाहीच, पण लांबूनसुद्धा त्याची सोबत होणार नाही, हे अवघड सत्य हळूहळू पचवावं लागतं. मुलीच्या परीनं तिचं बरोबर, तसं मुलाच्या परीनं त्याचंही बरोबर आहे, हेही कळतं. पण त्यामुळं सोबतीच्या अभावी एकाकीपण अधिकच जाणवायला लागतं.

हा प्रश्न अशा उतरत्या वयात येतो, असं नाही. ऐन उमेदीत आपल्याबरोबर जोडीदार, मित्र, मैत्रिणी, वेगवेगळे ग्रुप असं सारं असतानाही, अखेर एखाद्या क्षणी जो तो आपल्या वाटेनं जाणार आहे, याची एकदम वीज चमकून जावी, तशी जाणीव होत असते. ती वस्तुस्थिती अटळ असते. पण सोबतीची उणीव मात्र मनात जागी राहात असते. अनेक मुद्यांवर एखाद्या संघटनेत, प्रसंगात एकत्र आलेली माणसंसुद्धा एका मर्यादेपर्यंत सहमत होतात, बरोबर काम करतात. पण पुढं ही सोबतीची वाटचाल अशीच राहाणार नाही, याची जाणीव देणारे प्रसंग घडतात. कुणी आडून, कुणी उघड मतभेद व्यक्त करतात, सोबत सोडून जातात. तरुणपणी, प्रौढपणीसुद्धा सोबत नसण्याचा प्रश्न असतोच ! आपण एकाकी आहोत, ही भावना माणसाला अस्वस्थ करते. त्याचा जगण्यातला आनंद झाकोळून टाकते. काही व्यक्तींची अवस्था तर चालण्याचं बळ असेपर्यंत 'एकला चलो रे' अशी होते. नंतर ते बळही संपतं. मग, पाऊस कोसळत असताना, पूर्ण भिजून, कुठल्या तरी निष्पर्ण झाडाच्या

आसऱ्यानं कुडकुडत राहाणाऱ्या माणसासारखी अवस्था होते. ना पावसावर राग धरता येत, ना लोकांवर, ना न मिळालेल्या सोबतीवर !

मोठमोठी कार्यं करून यशस्वी झालेल्या, नावाजलेल्या माणसांतसुद्धा, आत हा सोबतीचा कोपरा रिकामाच असतो ! अस्वस्थ करीत असतो. सामान्य माणसांची अवस्था यापेक्षा वेगळी नसते. इतर मोठ्या माणसांना निदान पैसा, मान, प्रतिष्ठा, घरंदारं, इस्टेटी, स्थावर - अशा गोष्टींची तरी अनुकूलता असते. सामान्य, मध्यमवर्गीयांना तीही नसते.

त्यामुळं अशा मोठ्यांच्याकडं बघून सामान्यांना अधिकच एकाकी वाटतं. तिथंही खरंतर हे लक्षात घेण्याची गरज असते, की अशा अनुकूलता म्हणजे सोबत नसते. अनेक अनुकूलता असल्या तर सोबत नसल्याचं दुःख अधिकच असतं. पण याचा अनुभव त्यांनाच असतो ! राजाची दुःखं राजाला माहीत असतात !

असा सोबतीचा अभाव माणसाच्या आयुष्याच्या आनंदी प्रवासात अडथळा आणतो, दुःखाच्या लाटा निर्माण करतो, असं अनेकदा जाणवत असलं, तरी सोबतीचं खरं स्वरूप काय आणि खरी सोबत कोणती-याचा विचारही अनेकदा होत नाही. म्हणून सोबतीचं स्वरूप थोडं समजून घेऊ.

पहिल्या पातळीवरची सोबत ही माणसाची एक प्राथमिक गरज असते. जसं एखाद्या लहान मुलाला दूध, पाणी, उभं राहाण्यासाठी आधार या गरजांपोटी आईवडिलांची सोबत लागते. ती समजून येण्यासारखी आहे. कारण मूल मोठं झालं की, हळूहळू या गरजा कमी होतात आणि त्या अर्थानं आईवडिलांच्या सोबतीची गरजही कमी होत जाते. याला पुढं दोन्ही रस्ते फुटतात. मोठ्यांकडून मुलाला लागणाऱ्या सोबतीची गरज संपली, तरी मोठ्यांनाच मुलांच्या सोबतीची सवय लागते. ती सवय वेळीच लक्षात आली नाही, तर आता मुलांना सोबतीची गरज नाही, हे पचवणं अवघड होतं. वास्तविक, मुलं मोठी होणं, ही आनंदाची गोष्ट असली, तरी दुसऱ्या बाजूला नकळत, आपली त्यांना गरज उरली नाही, असं दुःख निर्माण होतं. तितकंच, मोठ्या होत जाणाऱ्या मुलांना मोठ्यांच्या सोबतीची गरज आता उरली नसली, तरी मित्र, मैत्रिणी, मार्गदर्शक यांच्या सोबतीची गरज असते. हे लक्षात आलं नसलं, तर आपण आता स्वावलंबी झालो, आपल्याला सोबतीची गरज उरली नाही, अशा भ्रमात राहायला होतं. सोबतीची माणसं बदलली, तरी सोबतीची

गरज कायम राहाते, हे लक्षात येत नाही. मग कुठंतरी उमेदीच्या काळातसुद्धा अचानक यांतल्या कोणी सोबतसंगत सोडली की, दुःख निर्माण होतं.

गरजा असोत, माणसांतल्या उणिवा असोत, त्याला जगाचं वाटणारं भय असो किंवा जगाकडून मिळणाऱ्या आधारांची त्याला गरज असो - त्यात्या टप्प्यावर त्या सोबतींशिवाय माणूस राहू शकत नाही. हे जितकं खरं, तितकंच त्यात्या सोबतींना अनेक प्रकारच्या मर्यादा असतात. हे सारं वेळेतच समजून आलं, तर कधी सोबत करणाऱ्या आणि कधी सोबत सोडून जाणाऱ्या व्यक्तींमुळं दुःख निर्माण होत नाही. मग सोबती असल्या आणि नसल्या तरी माणसाला समजूतदारपणे, आनंदानं आयुष्याचा प्रवास सुरू ठेवता येतो.

सोबतींचं स्वरूप असं कुठल्या माणसांच्या सोबतीपुरतं मर्यादित नसतं. अनेकांच्या बाबतीत, त्यांच्या आवडीच्या गोष्टी, कला, छंद - अशा गोष्टींचीही त्यांना सोबत वाटत असते. त्यांना वाटतं की, तेते छंद जोपासले, त्यात्या कलेमध्ये असलो, म्हणजे मला इतर सोबतींची गरज नाही. ते त्या अनुकूलता असेपर्यंत खरं असतं, हे अनेकदा लक्षात घेतलं जात नाही. वास्तविक माणसांच्या काय, कलाछंदांच्या काय - सोबतींनासुद्धा एक मर्यादा आहे. गायकाला गाण्याची सोबत असली, तरी आवाज बसत नाही तोपर्यंत किंवा वयानुसार आवाज साथ देईनासा होईपर्यंत ! नुसत्या श्रवणाचा छंद जोपासून त्या सोबतीनं आपण आयुष्यभर आनंदात राहू, अशा समजुतीत असणाऱ्यालासुद्धा त्याचे कान ऐकायला साथ देतात, तोपर्यंत ! गळा अंतरला, कान अंतरले, भ्रमंतीची आवड असलेल्यांचे पाय थकले, डोळे थकले, पैसा आटला - म्हणजे या सोबतींना मर्यादा येतात. त्यावेळी सोबतीच्या या स्वरूपांची आणि मर्यादांची कल्पना नसली, तर दुःख अटळ असतं ! तेच सोबतींचं स्वरूप नीट आणि वेळेत समजून घेतलेलं असलं, तर मात्र आनंदाला बाधा येत नाही. त्या साऱ्या गोष्टी निसर्गक्रम म्हणून स्वीकारल्या जातात.

आपल्या एक लक्षात येईल, की या साऱ्या सोबतींना आपल्या अपेक्षा, गरजा, अनुकूलता - अशा गोष्टींच्या मर्यादा आहेत. जगण्याच्या धावपळीत खऱ्या सोबतीची ओळख घडणं राहून जातं. खरी सोबत कशावर अवलंबून नसलेली आणि आंतरिक असते. सश्रद्ध माणसांना निदान त्यांच्या त्यांच्या श्रद्धास्थानांची सोबत असते. पण तीही आंतरिक असली तर शेवटपर्यंत साथ देते.

खरं तर सर्वांना एक सोबत शाश्वत असते. थोड्या शांत चित्तानं पाचदहा मिनिटं विचार केला, तरी ती लक्षात येणारी आहे. ती म्हणजे जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड चाललेल्या श्वासाची. ती निश्चित, निरंतर आणि सदैव असणारी खरी सोबत आहे. माणसं येतीलजातील, श्रवण-भ्रमण-दर्शन असं काहीही चालू राहील-बंद पडेल, पण श्वासाची सोबत त्या अर्थानं आजीवन आहे, कारण आपण असताना ती सदैव असते आणि ती नसली तर आपण नसतोच !

ही खरी सोबत जाणली, लाभली तर सोबतीचा आनंदही आजन्म लाभेल !

**

९. तक्रार !

ज्याची कशाबद्दल तक्रार नाही, असा माणूस मिळणं अवघड आहे. हे नियमासारखं असलं तरी त्याला अपवाद असतात, ही गोष्ट खरी. तरीसुद्धा आपल्याला असं आढळेल की, वर्षभर तक्रार नसलेला मनुष्य कदाचित दुसऱ्या वर्षी तक्रार करेल. तसंच दिवसभरात कशाहीबद्दल, कुणाचीही तक्रार नाही असा दिवस अगदी मूहूर्त घेऊन शोधायला निघालं, तरी मिळणं अवघड आहे. नात्यातली, जवळची, मैत्रीतली - अशी माणसं म्हणजे खरं तर आपल्याला पसंत असलेली गोष्ट असायला हवी. तिथं तर काही तक्रार असू नये. पण उलट असं आढळेल, की अशा जवळच्या माणसांबद्दलच माणसाच्या तक्रारी जास्त आहेत. बरं त्या तक्रारींना काही विशिष्ट कारण, विशिष्ट वेळ असं असावं म्हटलं, तरी तसंही असत नाही.

सकाळी उठल्या उठल्या नीट झोप लागली नाही, म्हणून तक्रार होते. मग दिवसभर तारवटल्यासारखं झालं म्हणून तक्रार होते. घरातलं एखादं माणूस लक्षात ठेवून एखादं काम करून येतं किंवा वस्तू घेऊन येतं, मग तरी निदान आनंदात असावं, पण तसंही होत नाही. त्यानं लक्षात ठेवून केलेल्या कामाचा आनंद घेण्याच्या आड, त्यानं आणलेली वस्तू बरोबर नाही, अशी तक्रार मनात येते. आणखीही एक आहे. इतके दिवस सांगूनही न झालेली गोष्ट, आज आठवणीनं केल्याबद्दल एका बाजूला खरं तर बरं वाटलेलं असतं, पण दुसऱ्या बाजूला केलेलं काम मनासारखं झालेलं नाही म्हणून होणारी तक्रार मनाला टोचणी देत राहाते.

यात लक्षात घेण्यासारखं हे की, एका बाजूला काम लक्षात ठेवून केल्याचा आनंद आणि दुसऱ्या बाजूला काम पसंत नसल्याबाबतची तक्रार, या दोन्हीतलं नक्की काय व्यक्त करावं, हेही लक्षात येत नाही. केलं म्हणून आनंद व्यक्त करता येत नाही, बरोबर केलं नाही म्हणून राग व्यक्त करता येत नाही. एकूण एवढ्याशा साध्या गोष्टीत आणि जवळच्या संबंधातसुद्धा तक्रार माणसाच्या आयुष्याला एक अवघडलेपण आणते.

या तक्रारीला वर म्हटलं तसा वेळ काळ नाही. सकाळ छान आनंदात सुरू झाली तरी, त्याच माणसांत दुपारी तक्रार होणार नाही असं नाही. स्वयंपाक लवकर उरकला म्हणून आनंदात राहावं, तर नंतर अशी काही अनपेक्षित कामं उद्‌भवतात, अनपेक्षित माणसं येतात आणि जेवायला दोन वाजतात. बरं त्या माणसांबद्दल तक्रार करावी तर तसंही नसतं. आपला आनंद बिघडवावा असा त्यांचा हेतू नसतो, हेही आपल्याला कळतं. त्यांचीही काही अशी अचानकच उद्‌भवलेली अडचण असते म्हणून ते आलेले असतात. त्यामुळं दोन वाजता जेवताना सकाळचा नऊचा आनंद निघून जातो, तक्रार होते, चिडचिड होते. यात तसा कुणाचाच दोष नसल्यामुळं, कुरकूर, तक्रार मनात येते, पण ती कुणाबद्दल करावी हेही कळत नाही. त्यामुळं आणखीच त्रास होतो. बरं असं आहे म्हणून रागानं न जेवावं तर तेही फार वेळ निभत नाही. कारण शेवटी भुकेनं, रागानं कामं चुकायला लागतात. कुणालातरी काहीतरी बोललं जातं, दुखवलं जातं. अशा पद्धतीच्या तक्रारी कुणाला सांगताही येत नाहीत. मग शेवटी न आवडणारं एखादं कडू औषध, कडू गोळी घेण्याचं खूप वेळ टाळावं आणि मग ती एकदम घेऊन टाकावी तशी ती तक्रार सोडून द्यावी लागते.

या तक्रारींना जसा वेळ-काळ नाही, तशी त्याला काही विशिष्ट कारणं आहेत असंही नाही. कामांतून जरासुद्धा फुरसत मिळत नाही, वेळ नाही म्हणून गांजून गेलेला माणूस तक्रार करील हे एकवेळ समजू शकतो. पण असे कामाचे चारआठ दिवस गेल्यावर जर त्याला चार दिवस बिनकामाचे, विश्रांतीचे आले तरी, त्याला करमत नाही, काम नाही म्हणून तक्रार होते. आता वास्तविक कामानं गांजून गेल्यामुळं विश्रांती नाही, म्हणून तक्रार होती ना, तर मिळालेल्या शांतपणात आता बिनतक्रार दिवस जायला हवे. पण असलं तर्कशुद्ध काही घडत नाही. काम पडल्याची तक्रार आहे आणि बिनकामाचं कसं राहायचं म्हणूनही तक्रार आहे.

अनेकदा माणसांना कुणाकडून तरी आदर्श जेवण कसं असावं याचा सल्ला मिळतो. पित्त, डोकेदुखी असल्या तक्रारींवर कुणी ज्येष्ठ माणसं किंवा आपले डॉक्टर, याचं मूळ आहारात आहे, असं सांगतात. आदर्श आहाराची कल्पना आपल्याला देतात. मग त्यानुसार उत्साहानं अगदी चौरस आहाराची आखणी होते. एकदोन दिवस कुणाची काही तक्रार नसते. आजार, त्रासही

कमी होतात. पण हळूहळू आठवड्याभरातच रोज तेचतेच काय खायचं, म्हणून कुणाचं एकाचं मन तक्रार करून उठतं. बाकीच्यांच्या मनात ते आधीच आलेलं असतं. पण चांगली गोष्ट आहे, बोलायचं कुणी म्हणून ते गप्प बसतात. त्यामुळं असा कुणी विषय काढला की, त्याला भराभर पाठिंबा मिळतो आणि तळणीत भजी सोडली जातात ! बाहेरून पुन्हा एकदा फूड पॅक येतात. आदर्श आहाराविरुद्धची तक्रार नकळत थांबते. पण किती दिवस ? एकदोन दिवस ! पुन्हा पित्त, अपचन, जळजळ सुरू झालं की, तीच तक्रार दत्त म्हणून उभी राहाते.

घरात कुठले निर्णय मला विचारून घेतले जात नाहीत, म्हणून अनेक घरात अनेकांची तक्रार असते. ती दूर करावी म्हणून प्रत्येक गोष्ट सांगून करायची ठरते, निर्णय विचारून घ्यायचे ठरतात. असे काही दिवस गेले की, ज्यांची ही तक्रार आहे, तीच माणसं तक्रार करतात. प्रत्येक गोष्ट विचारून करता, तुमचे तुम्ही निर्णय घेत जा की, आता या तक्रारीवर यांनी मार्ग काढावा की त्यांनी. हे काही नक्की ठरत नाही. त्यामुळं सगळ्यांचीच तक्रार होऊन गोंधळ उडतो. बेशिस्तीला कंटाळून दुसऱ्याबद्दल तक्रार करणारा माणूस, तो दुसरा माणूस अगदी वेळच्या वेळी सगळी कामं करायला लागला की, काही दिवसांनी याच माणसाची तक्रार होते, असं काही घड्याळाच्या काट्यावर सगळं होतं का, काही अडीअडचणी असतात की नाही. कामात थोडा तरी मोकळेपणा हवा की नाही !

हे तर सारं आपण घरात, नात्यात रोजच्या संबंधातलं पाहातो आहोत. पण तिकडं बाहेरच्या एवढ्या मोठ्या जगात या पक्षाची त्या पक्षाबद्दल, या धर्माची त्या धर्माबद्दल, या देशाची त्या देशाबद्दल - अशा असंख्य तक्रारी रोज आणि वर्षानुवर्षं सुरू असतात. तक्रार होऊ नये किंवा दूर करावी म्हणूनच तर वेगवेगळे पक्ष काढलेले असतात. वेगवेगळे धर्म स्थापन होतात, संघटनांची विभाजनं होतात. इतकंच काय, देशाची विभाजनं करूनसुद्धा तक्रार दूर करण्याचे प्रयत्न होतात. पण तेच पुन्हा तक्रारींना कारणीभूत होतात.

तक्रारींचं निवारण व्हावं म्हणून, लक्षावधी लोक तिकडं वर्षानुवर्षं कोर्टात हेलपाटे मारत असतात. दोन माणसं तक्रार घेऊन तिसऱ्याकडं जातात, हे आपण एकवेळ समजू शकू, पण दोन संघटना कोर्टात असतात, दोन धर्मं कोर्टात असतात, दोन देश आंतरराष्ट्रीय कोर्टात असतात. अशा तक्रारींचे

अक्षरशः कोट्यवधी खटले निकालात काढण्यात येतात, पण त्यापेक्षा जास्त पुन्हा दाखल होतात. म्हणजे एवढ्या मोठ्या जगाच्या पातळीवरसुद्धा सगळीकडं तक्रारच तक्रार आहे. सूर्यमालेवरच्या पातळीवर अजून कुठलं कोर्ट नाही, म्हणून बरं. नाहीतर शुक्राची मंगळाविरुद्ध, शनीची गुरूविरुद्ध अशासुद्धा तक्रारी झालेल्या आपल्याला पाहायला मिळाल्या असत्या !

एकूण या तक्रारी आपल्या आनंदाच्या एवढ्या दूधावर भलंमोठं विरजण घालतात, ही गोष्ट तरी नक्की आणि तेही पुन्हा त्यातून दही, ताक, लोणी, तूप असं काही चांगलं निर्माणही होत नाही. तेव्हा यावर आता उपाय मुळातच शोधायला हवा.

आपल्या लक्षात येईल की, जग जसं आहे, तसं ते त्यात्या वेळी आपल्याला मानवत नाही, पचत नाही, हे तक्रारींचं मूळ आहे. रस्ता आहे म्हटल्यावर कधी त्यावर रहदारी होणार, कधी तो निर्मनुष्य असणार, कधी त्यावर रस्ता रोको होणार, कधी-कधी नव्हे, बहुधा त्यावर खड्डे असणार, कधी तो वाहतुकीला बंद असणार, कधी त्याचा वनवे होणार-हे सगळं गृहीत आहे. वास्तविक, यांतलं सगळं एकाच वेळेला असणार असं नाही. कुठलं ना कुठलं असणार. आपली तक्रार तर यांतल्या कशाहीबद्दल असू शकते.

पण मुळात, आपल्याला इच्छित ठिकाणी नेण्यासाठी रस्ता निर्माण झाला आहे, याचा आनंद आणि आपली त्यामुळं झालेली सोय ही कधीच विसरून चालणार नाही. तक्रारीच्या वेळेला नेमकी तीच गोष्ट दुर्लक्षित झालेली असते, विसरलेली असते !

त्यातही ज्या यंत्रणेमुळं आपण आपल्या ठिकाणी पोचू शकतो, कधी मोकळ्या रस्त्याचा आनंद घेतो, चांगल्या दुरुस्त केलेल्या रस्त्यांचा आनंद घेतो, तोच जर अगणित माणसांनी घ्यायचा ठरवला तर गर्दी, अतिवापरामुळं खड्डे हे होणारच ना !

नियंत्रण, दुरुस्ती करणाऱ्या यंत्रणा या सगळ्याला तरी कुठे पुऱ्या पडतील ? असा विचार जरी मनात आला, तरी एखादा खड्डा पार करताना बसलेला धक्का किंवा रहदारीतून जाताना सारखे लागत राहाणारे ब्रेक आपण आनंदानं सहन करू शकू. मला माझ्या मनाप्रमाणं व्हावं असं वाटण्याचा जो अधिकार आहे, तोच अधिकार दुसऱ्याला त्याच्या मनाप्रमाणं व्हावं असं म्हणण्याचाही आहे आणि दोन मनं त्या अर्थानं सारखी असणार नाहीत.

हे जर खरं आहे तर, कधी परिस्थिती आपल्या, तर कधी दुसऱ्याच्या मनाप्रमाणं असणार, हे उघड आहे. आपल्या मनाप्रमाणं आजवर झालेल्या गोष्टी, झालेल्या सोयी, मिळत असलेला न्याय, आपल्यासारख्याच इतर अगणित लोकांच्या आनंदासाठी आपण दाखवायचं मनाचं औदार्य - अशा काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर जीवनाचं गुलाबाचं फूल पाहाण्याचा आणि सुगंध घेण्याचा, देण्याचा आनंद मिळेल आणि तक्रारींचे काटे नक्कीच कमी टोचतील !

**

१०. बरोबर आणि चूकही..!

एकदा एक गंमत झाली. एक जण टायपिंग करीत होता. दुसरा काही कामात होता. दुसऱ्याचं काम थांबलं, तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, पहिला टायपिंग करताना कुठंतरी अडला आहे आणि धडपड करतो आहे. म्हणून त्यानं सहज पहिल्याला विचारलं, काही प्रॉब्लेम आहे का ? पहिला म्हणाला, होय. यात 'बरोबर चिन्ह'च येत नाही. दुसरा म्हणाला, जरा वर शोध की. त्यात 'बरोबर चिन्ह' आहे ! पहिला म्हणाला, ते माझं सगळं शोधून झालं आहे. कुठल्याच 'की'वर 'बरोबर चिन्ह' नाही. ते ऐकल्यावर दुसरा उठून उभा राहिला आणि म्हणाला, आहे ! पहिला म्हणाला, नाही. हे बराच वेळ आहे-नाही सुरू राहिलं ! शेवटी पहिला म्हणाला, कुठं आहे, ते दाखव. दुसरा जरा घुश्श्यातच आला आणि त्यानं वरच्या ओळीमधली 'बरोबर चिन्ह' असलेली 'की' दाबली. लगेच समोर बरोबरचं चिन्ह उमटलं !

त्या दोन रेघा बघून पहिल्याचा पारा चढला. तो म्हणाला, मला 'हे बरोबर' नको आहे. मला 'दुसरं बरोबर' पाहिजे. दुसरा गोंधळात पडला. तेव्हा पहिल्यानं जरा रागारागानं हातातलं पेन घेऊन त्याला 'बरोबर म्हणजे काय' ते काढून दाखवलं. ते चिन्ह म्हणजे 'बरोबरची खूण' होती. दुसऱ्यानं कपाळावर हात मारून घेतला. म्हणाला, आडव्या दोन रेघा म्हणजे 'बरोबरच' ना ? हे 'तुझं बरोबर' म्हणजे दोन रेघांऐवजी 'बरोबरची खूण' हे मला काय माहिती ? पहिला म्हणाला, एकंदरीत आपण 'दोघंही बरोबर' आहोत आणि 'चूकही' आहोत. मित्र असल्यामुळं त्यांनी त्या 'दोन' चूक आणि बरोबर असल्या गोष्टींतली निर्भेळ गंमत समजून घेतली. आता यात ते दोघे मित्र होते. तसा मुद्दाही छोटासा होता. थोडा त्रागा झाला, तरी समजून घेण्यानं तो विरून जाण्यासारखा होता. पण हेच प्रश्न असे नुसते शाब्दिक पातळीवर चूक किंवा बरोबर क्वचितच असतात. ते तसे तांत्रिक असले तरी, त्यातही पुन्हा समजूत असली, तरच तेसुद्धा सुटू शकतात. नाहीतर चूक ठरवणारा आणि माझंच बरोबर असं म्हणणारा, दोघंही आपल्या म्हणण्यावर ठाम राहातात. राग डोक्यात

घेऊन, दुसऱ्यांना काही समजत नाही असं समजून, आपापल्या घरी निघून जातात.

एखाद्याच्या घराची खूण सांगायची असली, तर एक जण म्हणतो, ते घर पश्चिमेला आहे. त्यातलाच दुसरा म्हणतो, ते पूर्वेला आहे. ज्याला घरच माहीत नाही, तो गोंधळात पडतो आणि यांचं पूर्वपश्चिम काही संपत नाही ! उलट मी प्रत्यक्ष पाहिलंय, असं ते म्हणत राहातात. वास्तविक त्या एखाद्याचं घर एका विशिष्ट ठिकाणीच असणार ना? उघड आहे की, पहिल्याचं घर या एखाद्याच्या घराच्या पूर्वेला आहे. म्हणून तो ठामपणानं ते घर पश्चिमेला आहे म्हणतो आहे. तर दुसऱ्याचं घर त्या एखाद्याच्या घराच्या पश्चिमेला आहे. म्हणून तोही ठामपणानं ते घर पूर्वेला आहे म्हणतो आहे. घर तेच. खुणा या अर्थानं दोघांच्याही बरोबरच. पण वाटताना उलटसुलट वाटून दोघंही बरोबर आणि चूक ठरतात आणि ते कुणाला न कळलं, तर दोघंही ठाम राहून, दुसऱ्याला काही कळत नाही, असं म्हणू शकतात. मू*्*ण समजून घेणारा गोंधळात पडतो, ते वेगळंच!

असल्या प्रश्नात जो तो मार्ग काढील, पुढं जाईल, त्याचं काम साध्य करून घेईल. पण हेच बरोबर - चूकचं प्रकरण माणसाला कळायला लागल्यापासून त्याच्या मागं लागलेलं असतं आणि खरं सांगायचं झालं तर, 'त्याला खरं कळायला लागेपर्यंत' ते त्याचा पिच्छा सोडीत नाही. अनेकदा हे चूक-बरोबर सापेक्ष असतं, तांत्रिक असतं, समजून घेण्याचा विषय असतो. लक्षात न घेतलं तर आग्रही मतं, अकारण ठामपणा, संबंधांतले तणाव, समाजातले भेद, भांडणं, युद्ध - इथंपर्यंत ते माणसांना घेऊन जातं. हे कळलं तर सखेद आश्चर्य वाटेल. पण ही वस्तुस्थिती आहे.

साधी वेशभूषा घ्या. पूर्वीच्या शतकातली वेशभूषा त्या काळात प्रचलित, उपलब्ध आणि कामकाजांना अनुकूल असलेली - म्हणजे त्या अर्थानं बरोबरच होती. मधल्या अगदी या शतकापर्यंतच्या काळातली वेशभूषा या काळातल्या कामं, गरजा यांना अनुकूल, म्हणून बरोबरच होती. इथून पुढं हे असंच होत राहील. त्यात्या पिढीची माणसं एकत्र आली की, ती पुढच्या पिढीला चूक, उथळ ठरवतात. दुपारचा मोकळा वेळ त्यावर निंदा करण्यात जातो. असा तासन्तास विनाकारण, निंदेत, नावं ठेवण्यात, नकारात्मक जगण्यात जाणारा वेळ वाचवणं शक्य आहे ना ? ते गरजेचं आहे ना ? त्या

वाचलेल्या वेळात अशा असंख्य व्यक्तींकडून रोज त्यापेक्षा नक्की, कितीतरी चांगली कामं होऊ शकतील. पारायण, वाचन, समाजसेवा, ज्ञान-कौशल्य संपादन, ईशसेवा-अशा असंख्य गोष्टी या वाया जाणाऱ्या वेळात घडू शकतात. अनेक लोक आजही अशी विधायक कामं करीत आहेत.

मत, आग्रह, अनुभव हा जरूर 'बरोबर' असू शकतो. तो जेव्हा समग्र,व्यापक,सार्वत्रिक हिताचा असतो,त्यावेळी तो नुसता व्यक्तिगतदृष्ट्या बरोबर राहात नाही, तर तो कौटुंबिक, सामाजिकदृष्ट्यासुद्धा बरोबर ठरतो. मग त्या अर्थानं त्यात 'चूक' नसल्यामुळं त्याचा स्वीकारही होतो. अर्थात, या बरोबर असण्याला त्यात्या काळाची, गरजांची, प्राथमिकतांची मर्यादा असणार. म्हणून 'आपलं ते बरोबर' असा आग्रह धरण्यानं या बाबतीत नुकसान होतं. म्हणून तर, व्यवस्थापनशास्त्रातही नियोजन करताना, विचार करून काही 'बरोबर' ठरवावं लागतं, त्यानुसार कामं, वेळा, माणसं, लक्ष्य यांचं नियोजन करावं लागतं. यांतले घटक बदलत नाहीत, तोपर्यंतच 'हे नियोजन बरोबर असतं.' या बाबी बदलल्या तर मात्र, ते हळूहळू चुकीचं ठरून नुकसानकारक होतं. म्हणून अनेकदा कंपनीला ते बदलावं लागतं.औद्योगिक क्षेत्रांतसुद्धा पहिलं 'बरोबर' असलं तरी काळ, तंत्रज्ञान, ग्राहक यांच्यातले बदल घडले की, हे 'बरोबर' हे हळूहळू 'चूक' ठरायला लागतं. उत्पादनावरचे भर, उत्पादनसंख्या, मार्केटिंग पॉलिसीज् - बदलत जावं लागतं. तरच त्यावेळी ते 'बरोबर' ठरतं.

कौटुंबिक आयुष्यातसुद्धा शिक्षणं, निवासस्थानं, गावं - यांच्या बाबतीतले निर्णय, या 'बरोबर-चूक'च्या मर्यादा लक्षात घेऊन, ठरवणं हिताचं होतं. आमच्या काळी शाळा दोनदोन, पाचपाच मैलांवर होत्या. त्यामुळं सक्तीनं चालणं होत होतं. निसर्गाचं सान्निध्य मिळत होतं-त्याला काळाचा संदर्भ असतो. त्या बाबतीत, त्यावेळी ते 'बरोबर असतं', नव्हे 'होतं', हे लक्षात घेणारे खरे मोठे. कारण ते आजच्या काळावर 'असलं बरोबर' लादण्याचा आग्रह धरीत नाहीत. त्याचा आग्रह आता धरला, तर 'तेच बरोबर' असलेलं मुलानातवंडाच्या बाबतीत 'आज चूक' ठरेल !

हेच इतर असंख्य प्रश्नांच्या बाबतीत खरं असतं, हे आपल्या लक्षात येईल. कुटुंबाकुटुंबातले मतभेद, जातीपातीतले दुराग्रह, संस्कारातली कट्टरता, धर्माधर्मांतले भेद - अशा असंख्य पातळ्यांवर अशा 'आपलं बरोबर' आणि 'दुसऱ्याचं चूक' या ठेक्यावर चालण्यात अनेक दुःखं निर्माण होत असतात.

सुरुवातीला पाहिलं तसं, साध्या बरोबर चिन्हाला बोलीभाषेत दोन अर्थ असतात, ते समजून घेतले नाहीत, तर अकारण बोलाचाली होते. अशा साध्या बाबतीतसुद्धा अर्थाचा अज्ञानानं, बिनसबुरीनं, असमंजसपणानं अनर्थ होतो. मग दोन कुटुंबातले काय म्हणतात, यापेक्षा त्यांना काय म्हणायचं आहे, दोन धर्मांत शब्दशः काय म्हटलं आहे, त्यापेक्षा त्यांना काय म्हणायचं आहे - हे लक्षात न घेता, आपल्या नादात अर्थ लावत गेलो, तर केवढा अनर्थ साऱ्या जगात निर्माण होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! तिचा अनुभव येतच आहे.

यासाठी मला रोज काय करता येईल, हा खरा प्रश्न आहे. उत्तर तसं सोपं आहे. मी ज्याला 'बरोबर' म्हणतो, त्यावर 'माझ्या' अनेक प्रकारच्या मर्यादा आहेत. जग अमर्याद आहे. त्यामुळं 'माझं थोडं चूक' गृहीत धरावं आणि 'दुसऱ्याच्या चूक'मध्ये 'त्याचं थोडं बरोबर' गृहीत धरावं. तर रोज आपल्या शांतीत आणि आनंदात वाढ होते.

मग आपल्या जगण्याच्या डहाळीवर छोटंसं का होईना, प्रसन्न फूल उमलेल. ते खचितच आपल्याला आणि इतरांनाही नकळत आनंद देऊन जाईल!

**

११. एक मिनिट..!

मनुष्य विचारशील प्राणी आहे. प्रत्येकाच्या डोक्यात विचार सुरू असतात. झालेल्या गोष्टी, करायची कामं, कुठल्या घटना, आलेले प्रसंग, भविष्यातल्या गोष्टी, समोरचा अभ्यास, पडलेली कामं - इथंपासून ते जगातल्या घडामोडींपर्यंत, त्या क्षणी विचाराला काय विषय असेल, हे सांगता येत नाही. निश्चित दिशेनं, जरूर असलेले, व्यवस्थितपणे केलेले विचार - माणसाचं काम सोपं करतात, यशस्वी करतात, यात शंका नाही.

कमी गरजेच्या गोष्टींवर मनुष्य निवांतपणे आणि कमी विचार करतो, तर जास्त निकडीच्या, तातडीच्या मोठ्या प्रश्नांवर खूप आणि लगेच विचार करतो. पण आपण हाही विचार करावा की, गोष्ट कमी वेळात घडणारी असेल, लहान वाटत असेल, गरजेची, तातडीची वाटत नसेल, तरी ती विचार करण्यासारखी नसते, काही कमी महत्त्वाची असते असं नाही. अशी एक दुर्लक्षित गोष्ट म्हणजे - 'एक मिनिट' !

असं म्हणण्याला कितपत अर्थ आहे, ते सहज पाहू. एखाद्या खूप लांबच्या ठिकाणी जाण्यासाठी हजारो रुपये भरून कुटुंबातल्या सगळ्यांचं आरक्षण केलेलं असतं. त्याद्दष्टीनं लागणाऱ्या सर्व व्यवस्था, तयारी चालू असते. ज्या दिवशी जायचं, त्या दिवशी सकाळपासून सारी आवराआवर करून, सामान, बॅगा सगळं भरून आपल्या कुटुंबियांना घेऊन, मनुष्य टॅक्सी करून, स्टेशनवर पोचतो. वाटेत कुठंतरी रहदारीत अडकायला होतं. काही वेळा टॅक्सीवाल्याचा चालवण्याचा वेग कमी असतो - असं काहीही असू शकतं. रेल्वेस्थानकाच्या आवारातल्या रांगेतून टॅक्सी क्रमानं पुढं येते, सामानासह रिकामी होते. सामानासह पायऱ्या चढून रेल्वेच्या फलाटावर मनुष्य पाऊल टाकतो. तोपर्यंत त्याच्या डोळ्यांसमोर रेल्वेची शिट्टी होऊन, ती सुरू झालेली असते. फलाटावर पोचेपर्यंत शेवटच्या डब्यातल्या गार्डच्या हातातला फक्त हिरवा झेंडा फडकताना दिसतो. गाडी वेग घेते. सबंध महिन्याभराच्या प्रवासाची सुरुवातच चुकते. तीही फक्त एक मिनिटानं !

कदाचित हेच एक मिनिट आधी आलो असतो, तरी स्टेशनमास्तर, गार्ड, प्रवासी कुणालाही सांगून, आधीपासून ठरवलेल्या त्या रेल्वेत प्रवेश मिळणं शक्य असतं आणि त्यामुळं पुढचा आखलेला सर्व दौराही आपल्या सोयीच्या वेळापत्रकाप्रमाणं पार पाडणं शक्य असतं. नुकसान पत्करता येतं. वेगवान गाडी चुकली तरी दुसऱ्या कुठल्या गाडीनं, काही तासांनंतर तोच प्रवास करताही येतो. पण जे एका मिनिटानं चुकलं, ते तसंच्या तसं दुरुस्त करता येत नाही. असं हे मोलाचं 'एक मिनिट' !

खरं तर तसे हे फक्त काही सेकंद ! त्या साठ सेकंदांचं मिनिट, त्या साठ मिनिटांचा तास, अशा चोवीस तासांचा दिवस, अशा तीस दिवसांचा महिना... असा विचार केला, तर हे मिनिट फारच किरकोळ वाटतं. पण हे एवढंसं मिनिट साऱ्या महिन्याच्या आखलेल्या कामांचा गोंधळ उडवू शकतं आणि त्याचबरोबर आपल्या साऱ्या उत्साहावर पाणीही पाडू शकतं. हा तर केवळ एका मिनिटाचा एका विषयातला प्रताप. अशी असंख्य एक एक मिनिटं आपल्या आयुष्यात अनेकदा कितीतरी गोष्टी घडवायला, बिघडवायला, चांगल्या-वाईट करायला कारणीभूत ठरू शकतात, हे लक्षात येईल. आधी म्हटलं तसं, अनेकांच्या दृष्टीनं एक मिनिट व्यवहारानं छोटं, नगण्य, कमी महत्त्वाचं - असं कळतनकळत वाटल्यामुळं, त्यावर अनेक जण विशेष विचारही करीत नाहीत.

पण वस्तुस्थिती पाहिली, तर ती या एका मिनिटाचं महत्त्व केवढं आहे, याची जाणीव करून देणारी आहे. आपण आत्ताच उदाहरण पाहिलं. तसंच आपण असाही प्रसंग अनुभवला असेल. एस्.टी.त प्रवासी बसलेले आहेत, ड्रायव्हरनं गाडी सुरू केली आहे, कंडक्टर एका हातानं दरवाजा बंद करताहेत आणि दुसऱ्या हातात बेल आहे. अशा परिस्थितीत, मनुष्य हात करीत दरवाजाजवळ पोचतो, तो कंडक्टरना दिसतो. बेलचा हात थांबवून, दरवाजा उघडून प्रवाशाला ते आत घेतात, दोन बेल होतात आणि गाडी सुटते. खूप मोठ्या लांबच्या प्रवासाच्या गाडीत त्याला प्रवेश मिळतो. प्रवास ठरल्याप्रमाणं सुखकर होतो, तोही फक्त या एक मिनिटात !

आयुष्यातले शिक्षणक्षेत्रातले प्रवेश असोत, नोकरीची संधी स्वीकारण्याचे निर्णय असोत, आयुष्यातल्या जोडीदाराला हो किंवा नाही म्हणणं असो, घर हे घ्यावं की ते असा मोठा प्रश्न असो - आधी खूप विचार झालेला

असतो. शेवटी निर्णय घेण्याचा एक दिवस येतो. त्या दिवशी सकाळी दहा, संध्याकाळी पाच, रात्री नऊ - अशा कुठल्या तरी वेळेला निर्णय देण्याचा अंतिम टप्पा येतो. शेवटच्या मिनिटात, ज्याच्यावर निर्णय अवलंबून आहे, अशा व्यक्तीचा दोन्ही बाजूंचा साधकबाधक विचार एका अंतिम टप्प्याला येतो आणि त्या मिनिटात ठरतं की, होय किंवा नाही. त्यावेळी घेतलेल्या त्या निर्णयाचा परिणाम असा कुठं एकदोन महिन्यावरच नव्हे, तर वर्षानुवर्षांवरसुद्धा होतो. तो नुसता निर्णयच उरत नाही तर, अनेकांचा अनुभव असेल, की त्यांच्या आयुष्याची दिशा आणि प्रवास त्या निर्णयानं बदलून जातो. असं हे मोलाचं 'एक मिनिट'!

या एक मिनिटाचं आणखीही खूप महत्त्व आहे. लाखो रुपयांच्या देवघेवीच्या व्यवहारावर मनुष्य सही करतो ती फक्त एक मिनिटात ! आधी कितीही कागदपत्रं, बैठका, भेदमतभेद, फिरवाफिरव, गोंधळ - असं त्या त्या विषयाबद्दल काहीही झालं असलं, तरी त्याचा अंतिम निकाल होतो, त्या साऱ्याला निर्णायक पूर्णविराम मिळतो, तो या सहीनं, जी होते केवळ एक मिनिटात ! तसंही इतर कितीतरी व्यवहारात, हे घडताना आपल्याला आढळेल. मनुष्य या अवाढव्य जगात येतो, तोही एका मिनिटात. तसाच या जगात तो शंभर वर्षं जरी वावरला, तरी जातो तो एका मिनिटात.

इतकंच नव्हे, एखाद्या माणसाला काही जिवावरचा आजार होतो. एका मिनिटात तो कोसळतो. तातडीनं हालचाल होते किंवा कुणी अगदी योग्य माणूस शेजारी असतो. तो पुढच्या एका मिनिटात हालचाली करतो, एका मिनिटात गेलेला जीव दुसऱ्या मिनिटाला पुन्हा जगात परततो. अनेकदा हे उद्‌गार आपण डॉक्टरांकडून ऐकले असतील की,'एक मिनिट जरी आधी आला असता, तरी आपण काही प्रयत्न करू शकलो असतो, जीव वाचला असता.' फक्त एखाद्या मिनिटात बोललेले आपुलकीचे, जिव्हाळ्याचे शब्द माणसाला सावरतात, त्याच्या मनाला उभारी देतात. तशाच एका मिनिटात बोलल्या गेलेल्या चार शब्दांतला अपमान माणसाच्या जिव्हारी लागतो. पहिला एका मिनिटानं जोडला जातो, जवळ येतो, तर दुसरा अशाच एका मिनिटानं तुटतो, दूर जातो. आपण इतका विचार करतो आहोत, तर मग या एका मिनिटावर काही विचार करणं आवश्यक आहे, हे नक्की ना ?

अनेकांना हेही वाटलं असेल की, हे 'एक मिनिट' किती महत्त्वाचं

आहे, हे आता लक्षात आलं आहे. पण त्याचा विचार आपण कसा आणि काय करू शकतो ? या लेखनाच्या मर्यादेत आपण एवढं लक्षात घेऊ शकतो, की अशा एका मिनिटाला निर्णायक महत्त्व असतं. प्रश्न निर्णयाचा असेल, तर निर्णयाच्या क्षणी विधायक विचार करायला लागणारी सावधानता आपल्याकडं असावी. त्या क्षणी त्या मिनिटात आपण होकार देणार असू अथवा नकार, तो एकदा दिल्यानंतर त्यावर स्थिर राहाण्याची गरज असते. ती आपल्याकडं आहे ना? शेवटच्या या एक मिनिटात घोटाळा घडवणारं - असं प्रवासाची गाडी गाठण्यासारखं महत्त्वाचं मिनिट असेल, तर खाण्यापिण्याच्या वस्तू, सामान, मतं - असल्या गोष्टींवर तासन्‌तास देण्यापेक्षा ते महत्त्वाचं मिनिट चुकू नये, यासाठी आपण आवश्यक ती दक्षता घेऊ शकतो, नुकसान टाळू शकतो. जिथं जन्ममृत्यूसारख्या आपल्या हातात नसलेल्या गोष्टी असतील, तिथं हे शेवटचं मिनिट शांत, निर्विचार, मनोमुक्त राहण्यासाठी आपल्याला आधीपासून काही तयारी करावी लागते, ती जरूर करू शकू.

एक मिनिट म्हणून त्याचा कालावधी कमी असेल, पण शांत, सुयोग्य जीवन आणि आनंदाची अखेर साधून देणारं हे 'एक मिनिट' सावध राहण्याचा, विचार करण्याचा विषय आहे, हे नक्की !

**

१२.आपण आहोत तिथंच असतो का..?

वरवर पाहाता हा प्रश्न थोडा निरर्थक वाटण्याची शक्यता आहे. कदाचित मनात असंही येऊ शकतं की, आपण जिथं असतो तिथंच असतो किंवा तिथंच असू शकतो. आपण एकाच वेळेला जिथं आहोत त्यापेक्षा दुसऱ्या ठिकाणी कसे असू शकू ? आपणच काय, आपल्या बरोबरचे इतरही जिथं आहेत, तिथंच असतात ! घरात आपल्यासमोर जर माणूस प्रत्यक्ष बसलेला दिसतो आहे, तर तो त्याचवेळी आणखी इतर कुठं, कसा असू शकेल ? अशा पहिल्या प्रतिक्रिया येतीलही. आपण विचार करू.

आपला स्वतःबद्दलचा, इतरांबद्दलचा अनुभव, आपण थोडं आत डोकावून पाहिलं तर, आपल्याला आणखी काही सांगून जाईल. अभ्यासाच्या टेबलावर पुस्तक डोळ्यांसमोर ठेवून बसलेला विद्यार्थी, आपल्याबरोबर गप्पा मारणारी आपली मैत्रीण किंवा मित्र, आपल्याशी काही व्यावसायिक बोलणं करीत असलेली समोरची व्यक्ती, कुटुंबात आपल्याबरोबर बोलणारी अगदी जवळची समोरची व्यक्ती, वक्त्यासमोर बसून व्याख्यान ऐकणारा श्रोता - अशा व्यक्ती, ज्या ठिकाणी बसल्या आहेत 'त्या ठिकाणीच' आहेत, असं आपल्याला दिसतं खरं, पण आपण तसं खरोखर म्हणू शकू का ?

प्रामाणिकपणे आणि थोड्या शोधक बुद्धीनं पाहिलं तर, विद्यार्थी पुस्तकासमोर बसलेला दिसत असला, तरी तो आहे त्या ठिकाणी असेलच असं सांगता तर येत नाहीच, पण अनेकदा तो त्याक्षणी तिथं नसतो. तो त्याचवेळी जिमवर, मित्रांत, मैत्रिणींत, कॉलेजात, कुठल्यातरी कडू-गोड प्रसंगांत - कुठंही असू शकतो. अनेकदा असतोही. समोर बसलेली मैत्रीण - मित्र आपल्या समोरच आहे, आपण एखाद्या विषयावर बोलतोही आहे, पण त्याचवेळी तो किंवा ती आपल्या ऑफिसमध्ये घडलेल्या एखाद्या महत्त्वाच्या घटनेच्या आठवणीत, त्याच वेळी मनानं वावरत असते. कुणी उद्या घडायच्या प्रसंगात वावरत असते.

व्यावसायिक गप्पा सुरू असतात. माणूस समोर असतो. विषय

व्यवसायाचा असतो. काही नियोजन असतं, काही देवघेव असते, काही तांत्रिक मुद्दे असतात, पर्याय काढले जात असतात, दोन्ही माणसं तशी समोरासमोर असतात. हे सारं चालू असतं, ती समोर आहेत हे दिसत असतं तरी, तसंच असेल, असं म्हणता येईल का? कारण समोरासमोर असतानाच, एकजण सकाळी घरातून निघताना झालेल्या भांडणांच्या, घरी पोचल्यावर होऊ घातलेल्या उत्तरार्धात पोचलेला असतो. त्यातला त्रागा, त्रास, संभाव्य मतभेद - हे सारं तो, हेच समोरचं संभाषण चालू असताना अनुभवीत असतो. तर त्याच्यासमोर बसलेला, चर्चा करणारा दुसरा, त्याचवेळी ही व्यावसायिक चर्चा संपल्यानंतर होणाऱ्या, कुठल्यातरी हॉटेलमधल्या पार्टीतल्या वातावरणात पोचलेला असतो. आज तिथं कोणकोण येईल, कोणता मेनू असेल - यांत तो वावरत असतो !

तेच कुटुंबातल्या, आपल्या समोर बसलेल्या खासगी - कौटुंबिक विषय बोलणाऱ्या व्यक्तीचंही असू शकतं. अनेकदा तर, घरातल्याला काही विषय महत्त्वाचा वाटतो आहे, बोलायचा आहे, म्हणून तो त्या संभाषणात सहभागी असतो, समोर बसलेला असतो. पण त्याचवेळी, त्याच्याहीपेक्षा महत्त्वाच्या वाटणाऱ्या त्याच्या ऑफिसमधल्या घटनांत,मित्रमंडळीतल्या चर्चेत, काही व्यक्तिगत काळजीच्या विषयांत तो कधीच पोचलेला असतो, वावरत असतो. हे असं आपलंच काय, असंख्य लोकांचं वेळोवेळी सुरूच असतं.

याचा विचार केला तर, मग आपल्याला आपण आहोत तिथंच राहातो का, अशा तऱ्हेचा प्रश्न फारसा निरर्थक वाटणार नाही. कारण इतरांचे अनुभव तर आपल्याला असे अनेकदा आढळून येतीलच. पण आपले स्वतःचे अनेक अनुभवही आपल्याला हे जाणवून देतील. आपण स्वतःसुद्धा एखाद्या नाटकाला-एकपात्री प्रयोगाला गेलेले असू, त्यात काही विषय, उदाहरण आपल्यासमोर येत असेल, त्याच्या निमित्तानंसुद्धा आपल्या आयुष्यात कुठंतरी घडलेल्या प्रसंगात आपण मनानं कधीच पोचलेले असू. त्याची थोडी आठवण शक्य आहे, स्वाभाविक आहे. तरीही ते उदाहरण आणि कधी येऊन गेलेला प्रसंग याची सांगड दाखवून ते क्षणार्धात संपायला हवं, तसं मात्र होतच नाही.

आपण आहोत तर सभागृहात, नाट्यगृहात ! पण एकदा त्या उदाहरणानं कुठल्यातरी प्रसंगात पोचलेले आपण मात्र वावरत असतो ते तिथं घरी, जिथं कुठं ते घडलं असेल त्या गावीही. आश्चर्य हे की, मुळात एका

क्षणाचं हे काम !पण एकदा आपण तिकडं गेलो की, किती काळ आपण त्यात्या ठिकाणी वावरत राहू, हे सांगता येत नाही. कधी पाचपाच दहादहा मिनिटं जातात आणि मग दहा मिनिटांनंतर ऐकलेल्या एखाद्या वाक्यावर श्रोते हसतात, त्या मोठ्या आवाजानं एकदम आपण जिथं खरे बसलो आहोत, तिथं पुन्हा दचकून परत येतो. मधल्या पंधरा मिनिटांत काय झालं, हे समोर असूनही ऐकू आलेलं नसतं, समजलेलं नसतं, सांगता येत नाही. मग 'आपण आहोत तिथंच राहू शकू का?' हा प्रश्न नुसता निरर्थक नसून तो खरा आहे, विचार करण्यासारखा आहे, हे पटतं.

तो विचार केला तर लक्षात येईल की, माणसाच्याच अस्तित्वाला दोन अंग आहेत. तो शरीरानं तर वावरत असतोच, पण तो मनानंही वावरत असतो. अनेकदा तर त्याच्या या शारीरिक अस्तित्वापेक्षा, वावरण्यापेक्षा मनाच्या अस्तित्वाला - त्याच्या वावरण्याला अधिक महत्त्व असतं. कारण पुस्तकासमोर बसलेला विद्यार्थी, नुसता शरीरानं समोर असण्यापेक्षा त्याचवेळी मनानंही तो समोरच्या पुस्तकातल्या त्या पानावरच्या विषयात वावरत असेल, राहात असेल, तर त्याला तो तो विषय तर समजेलच, पण त्यातली त्याची गुणवत्ता वाढेल, यश नक्की अधिक येईल. किंबहुना, त्या अभ्यासाचा वाटणारा कंटाळा जाऊन, त्याला अभ्यासाचा आनंदही मिळेल.

इथं एक लक्षात घ्यावं की, झालेल्या घटनांची स्मृती असणं, पुढं करायच्या कामांची आठवण असणं - हे उपयोगी आहे, आवश्यकही आहे. पण ते त्याची वेळ होईल तेव्हाच ! आत्ता बसलो आहे त्या कामात शरीरही असेल आणि मनही असेल तर त्या कामाचा प्रवास, हा गुणवत्तेनं आणि दर्जानं होतो. त्यात त्याक्षणी संबंधित नसलेल्या गोष्टींची स्मृती ही आवश्यकही नाही, उपयोगीही नाही. उलट अडथळा आणणारी आहे, चाललेल्या कामाची गुणवत्ता कमी करणारी आहे, याची कल्पना नसल्यानं विद्यार्थ्यानी केलेला असो किंवा शिक्षक किंवा आईवडील अशा इतर कुणी घेतलेला असो, तासन्तासाचा अभ्यास आकलनही वाढवीत नाही आणि अपेक्षित गुणही वाढवीत नाही. उलट इतकं करून काही उपयोग झाला नाही, अशी नैराश्याची भावना मात्र विद्यार्थ्यात आणि असा अभ्यास करून घेणाऱ्यांत निर्माण करते आणि प्रगतीची गाडी अडखळायला लागते. अनेकांची आयुष्यातली ध्येयाची वाटचालही विस्कळीत होऊन जाते.

जे या एका उदाहरणानं पाहिलं, तेच इतर उदाहरणांच्या बाबतीत घडत असतं, हे कृपया लक्षात घ्यावं. मग त्या मित्रमैत्रिणींतल्या गप्पा असोत, कामाचं नियोजन असो, व्यावसायिक बोलणी असोत की कुटुंबांतले खासगी विषय असोत. त्यातही अपयश, असमाधान, आपण दुर्लक्षित होत असल्याची, एकाकी पडत असल्याची भावना - अशा अनेक प्रकारे ते आपल्याला त्रास देत असतं. दुसरं हेही असतं की, तशी कुठलीच गोष्टविशिष्ट शक्ती वापरल्याशिवाय घडत नाही. मन ज्यावेळेला शरीर आहे तिथून दुसरीकडे जातं, विचार करतं, वावरतं, त्यावर जाणारी शक्ती हा अपव्ययच असतो. तिसरं नुकसान असं की, यामुळं आहोत तिथलंही काम नीट घडत नाही आणि जिथं मनानं वावरतो तिथलंही. कारण तिथं तर त्यावेळी काम नसतंही आणि करायचंही नसतं ! चौथं, हे ठाऊक नसलेल्या किंवा येत नसलेल्या माणसांकडून कामांचा उरक होत नाही. आयुष्यातली अनेक महत्त्वाची कामं करायची राहून जातात !

अशी अनेक नुकसानं कळली तरी टाळता येतील. काम कुठलंही असो, कितीही वेळाचं असो, एकदा ते हातात घेतल्यानंतर शरीरानं आणि मनानं त्यातच राहाणं हा मनाचाच एक अभ्यास आहे, गरजेचा, विधायकही !

**

१३. धूसर रेषा...!

माणूस म्हणून त्याला अनेक गरजा आहेत. अन्न-वस्त्र-निवारा या तर आहेतच. माहिती, ज्ञान, मनोरंजन, कला - अशाही आहेत. संबंध म्हणून कुटुंब, समाज, आवडीचे काही गट, मित्रमंडळी, काही संघटना - अशाही आहेत. कुणाच्या आवडी-निवडीनुसार लोकसंग्रह, समाजकारण, राजकारण - अशाही आहेत. वाचन, व्यासंग, भेटीगाठी, प्रवास, देशाटन-अशाही आहेत.

म्हणून मनुष्य अगदी वेगवेगळ्या मार्गानं त्यात्या गरजांच्या प्राथमिकतांनुसार त्या पुऱ्या करण्याचा रोज आणि त्या अर्थानं आयुष्यभर प्रयत्न करीत असताना आपल्याला दिसेल. पण, याचबरोबर अशी कामं करताना काही गोष्टी घडत असलेल्या आपल्या लक्षात येतील. अगदी साधं म्हणजे माणसाला भूक लागते. भुकेच्या गरजेपाटी तो जेवतो. त्याच्या ताटात अनेक पदार्थ असतात. जेवणाच्या नादात साहाजिकपणे तो खूप जेवतो. एका क्षणी त्याच्या लक्षात येतं, की आपण भुकेपोटी जेवतो आहोत हे खरं, पण आता तो घास गोड असला तर तोंडात घोळतो आहे आणि तिखट असला, तर जीभेला हायहाय होतं आहे. मग त्याची खाण्याची मर्यादा येते आणि जेवण थांबतं.

जेवणानंतर पाणी प्यावं एवढीही इच्छा आणि शक्यता उरलेली नसते. तो कसाबसा कोचावर जाऊन बसतो किंवा गादीवर लोळत पडतो. त्याचा त्याला कदाचित त्यावेळी किंवा नंतर दुसऱ्या दिवशीही त्रास होतो. वास्तविक, अन्न ही तर प्राथमिक गरजेची गोष्ट आहे. तळमळ होत असली, घशाशी येत असलं, जळजळ होत असली - तरी अशा कुठल्याही कारणानं त्याच्या मनात, त्यावेळेला तरी एक क्षणभर येऊन जातं, आपण थोडं कमी जेवायला हवं होतं. अर्थात ती वेळ निघून गेलेली असते. ती वेळ एक गोष्ट दाखवत असते. तिच्याकडं, आपल्या हितासाठी तरी ज्यांचं अजून लक्ष गेलं नसेल, ज्यांना ते जाणवलं नसेल, त्यांनी हे कृपया लक्षात घ्यावं की, गरजेसाठी वेळी खाणं आणि गरज संपल्यावरही मनानं आपल्याला खायला लावणं - यांत एक रेषा आहे. तिच्या मागं असलो की सुख आहे, पोषण आहे. तिच्या पुढं

असलो की काय होतं, ते आत्ता आपण पाहिलंच.

असा एखाद्या नुसत्या कमीजास्त जेवणाचा हा प्रश्न नाही. नाहीतर, यावर मिताहार असं एखाद्या शब्दात उत्तर देऊन आपण मोकळे झालो असतो. थोड्याशा प्रयत्नानं ही रेषा सांभाळणं सोपं झालं असतं. पण या रेषेचं प्रकरण आपल्या आयुष्यात असंख्य क्षेत्रांत आणि गुंतागुंतीचं आहे, हे आपल्या लक्षात येईल. आपली तब्येत चांगली राहावी, म्हणून पायी फिरण्यासारखा सोपा व्यायाम नाही. त्याची गरज आहे, यावरही दुमत नाही. ऐन पावसात छत्री घेऊन फिरायला जाणारे निष्ठावंतही काही कमी नाहीत. हे सगळं खरं असलं तरी, आपल्या प्रकृतीप्रमाणं आपण ठरवलं असेल किंवा आपल्या वैद्यांनी आपल्याला सल्ला दिला असेल, त्यानुसार, त्यावेळेला एक मैल फिरणं हा आपला गरजेचा व्यायाम ठरतो. पण फिरायला गेल्यावर हवा चांगली असते, मोकळी असते, छान वाटतं - त्या नादात आणखी एक मैल पुढं गेलं, तर येताना दमछाक होते. आता ती गरजेच्या व्यायामानं झालेली नाही, तर ही रेषा ओलांडण्यानं झालेली आहे.

तशी या रेषेची आपली आयुष्यात कुठंही गाठ पडू शकते. काही जरुरीच्या कामासाठी आपण खरेदी करायला दुकानात गेलो, तर आजूबाजूला दिसणाऱ्या, आपल्याला त्या क्षणी उगाचच हव्याशा वाटणाऱ्या आणखी चार वस्तू घेऊन येतो, तेव्हा हीच रेषा ओलांडलेली असते. त्यानं नुसताच खिसा रिकामा होत नाही, तर कदाचित घरातल्या अडगळीत आपल्याकडून भर पडल्याचं आपल्या नंतर लक्षात येतं.

ऑफिसमधे कुणी उत्साही प्रबंधक बदलून येतात. तसं ऑफिस आधीपासून सुरू असतं. माणसं आपापल्या जागी आपली कामं नीट करीत असतात. त्यात्या ऑफिसला दिलेली कामाची उद्दिष्टंही पुरी होत असतात. अर्थात हे अपेक्षित आहे की, नवीन प्रबंधकांनी ही प्रगती टिकवून धरावी आणि त्यात भरही घालावी. त्यानुसार त्यांनी काही कार्यपद्धतींतल्या सुधारणा, नवे ग्राहक - अशा स्वरूपाचे प्रयत्न करणं गरजेचं असतं. पण आपल्याला हेही आढळेल की, या कर्मचाऱ्याला उठवून तिथं बसव, त्या कर्मचाऱ्याला उठवून इथं बसव, एकमेकांची कामं बदलून टाक, शांततेत चाललेल्या ऑफिसमधे धाक निर्माण करण्यासाठी, उगाचच कुणाला फैलावर घे, जुन्या ग्राहकांना किरकोळ कारणावरून उगाचच बोलावून घे- अशा साऱ्या कामांचा त्या मूळ

अपेक्षित प्रगतीशी काही संबंध नसतो. उलट, ऑफिसमधली आणि ग्राहकांमधलीही शांती आणि गुण्यागोविंदानं चाललेले व्यवहार उगाचच ताणले जातात. लोकही मग नसलेले प्रश्न उपस्थित करतात. पुन्हा एकदा तीच रेषा ओलांडलेली असते. इकडं प्रगतीचंही नुकसान झालेलं असतं.

अंगणवाडीत किंवा खेळांच्या वर्गात जाऊन मुलं घरी आली, की त्यांना पाटीपेन्सिल घेऊन, अभ्यासाला बसवून, शाळेत कुठला कुठला अभ्यास झाला, इतर मुलं काय करत होती, अशा अनेक चौकशा घरी करणं आणि पुढं हरघडी शाळेत, त्यांच्या शिक्षकशिक्षिकांना रोज आपल्या पाल्याची प्रगती होते आहे की नाही, याची खात्री करून भंडावून सोडणं - असं झाल्यास मुलांचीही चिडचिड होते. त्यांचं खेळण्याचं वय हुकतं. शिक्षकही रोज काय प्रगती होणार, असा विचार करून वैतागतात आणि अशा पालकांना टाळतात. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवणं गरजेचं असलं, तरी पुन्हा एकदा हीच रेषा ओलांडली जाते आणि त्रास निर्माण होतो.

असं आपल्याला आयुष्यभर असंख्य ठिकाणी होताना दिसेल. व्यापाऱ्यांच्या साठेबाजीत, वाचनाच्या अतिरेकात, वक्त्यांच्या लांबलेल्या भाषणात, घरकोंडेपणात, सदैव गावभर फिरत राहाण्यात, अकारण चिंता-विचार करण्यात, आपला संबंध नसलेल्या असंख्य विषयांच्या चौकशा करण्यात, कधी तुसडेपणात तर कधी अतिमैत्रीत, कधी येनकेनप्रकारेण प्रसिद्धी मिळवण्यात, कधी पाचपाच-दहादहा स्थावरं करण्यात, कधी चार खोल्यांचं पुरणारं घर असतानाही, आहे पैसा म्हणून, वर दोन मजले काढण्यात - अशा माणसाच्या आयुष्यात नेहमी दिसणाऱ्या व्यवहारांत, हा रेषेचा प्रश्न वाढत असलेला आपल्याला दिसेल.

ती रेषा कशी वावरते, हे अनेकांना पूर्वीपासून माहिती असेल, कदाचित त्यावर आपण आज विचार केला असेल. पण तिला नुसतं 'रेषा' न म्हणता 'धूसर रेषा' असं का म्हटलं आहे, याचाही थोडा विचार करणं गरजेचं आहे. अनेक व्यवहारांमधे आपण अनुभवलेली एक गोष्ट उदाहरणासाठी पाहू. एखादं घर बांधायचं असेल, तर त्याचा खर्च किती येईल याचा अंदाज, आपण ते घर बांधताना तज्ज्ञांकडून विचारून घेतो. ते अगदी इंचाचा, फुटाचासुद्धा विचार करून जास्तीत जास्त अचूकपणे तो अंदाज काढून देतात. तरीही घर बांधायला लागणारा कच्चा माल, लागणारा वेळ, मजुरांची उपलब्धता,

बाजारभावांची परिस्थिती - अशा अनेक गोष्टींत होणारे संभाव्य फेरफार लक्षात घेऊन, त्या खर्चाला ते अंदाजे खर्च म्हणतात, तसंच शेवटी एकूण खर्चात कमीअधिक दहा टक्के गृहीत धरा, असं सांगतात.

हीच गोष्ट अशा गरजा ठरवताना घडते. म्हणून तिला धूसर रेषा म्हणावं लागतं. अगदी सुरुवातीला आपण ज्या गरजेच्या आहाराचा उल्लेख केला, त्यात मूळ गरजेचा आहार ठरवताना, काही सर्वसाधारण प्रमाण काढलेलं असतं. त्या रेषेपर्यंतचा आहार हा सर्वांना आवश्यक आणि हिताचा असतो. तरीही व्यक्तिपरत्वे त्याच्या त्यावेळच्या भुकेच्या प्रमाणात, इतर आजार-पथ्यं - अशा गोष्टी लक्षात घेता, ही प्रमाणाची रेषा 'धूसर' बनते. व्यक्तीनुसार कमीजास्त होऊ शकते. पण जी रेषा त्या व्यक्तीनुसार ठरेल, ती रेषा ओळखून, त्यानं खाणं हिताचं असतं, हे निःसंशय !

आपल्या लक्षात येईल की, आधी म्हटल्या तशा आयुष्यातल्या - फिरणं, बोलणं, नोकरी, पैसा, मुलांचं संगोपन, घरंदारं, मिळकती-मालमत्ता - अशा असंख्य गोष्टींतही ही रेषा व्यक्तिशः भले धूसर असो, पण ती असते. ती रेषा ओळखणं आणि पाळणं हे कुणाच्याही हिताचं ठरतं, आनंदाचं ठरतं !

**

१४. पर्याय संपले...?

प्रवेशपरीक्षांच्या निकालांचे दिवस येतात. त्यातल्या गुणांना एकेकदा खूप महत्त्व येतं. विद्यार्थ्यांना, विशेषतः आईला अस्वस्थता असते. मुलाच्या आईची चलबिचल, अस्वस्थता बघून ऑफिसमधून परतलेले वडील अनेकदा तिला म्हणतातही, 'उद्या सकाळी दहाला निकाल आहे ना? उद्या उजाडल्यावर बघू.' आईची सर्वसाधारण प्रतिक्रिया थोडी फणकारतच असते, 'तुम्हाला एक काळजी नाही म्हणून ठीक आहे. उद्याच्या एकेक मार्कावर सगळं अवलंबून आहे. पाचसात वर्षं मी कष्ट काढले आहेत.' वडील शांत राहतात, 'ठीक आहे. मी उद्या रजा घेतो.'

सकाळी मार्क कळतात. मार्क कळल्यावर वडील शांतच राहतात, पण आई आणि मुलांचे चेहरे मात्र विलक्षण पडतात. हळूहळू त्याचं रूपांतर डोळ्यांत पाणी, चिडचिड यांत सुरू होतं. गुण परतपरत बघून होतात. पण त्यात बदल होत नाहीत. आई रागावणार, त्रागा करणार त्या तयारीत मुलं असतात. स्वतःलाही त्यांना एवढे गुण कसे कमी मिळाले, असा एका बाजूनं धक्का तर दुसऱ्या बाजूनं आईच्या रागापासून, भविष्यातल्या सगळ्या घटनांना तोंड कसं द्यायचं, याची चिंता भेडसावत असते.

वडील शांततेनंघेतात, ते सारं पाहतात आणि म्हणतात, 'काय अपेक्षेपेक्षा कमी आहेत, एवढंच ना ?' आईची अस्वस्थता अनावर होते. ती म्हणते, 'एवढंच नाही. ठरलेलं कॉलेज गेलं, साईड गेली. गावसुद्धा आता कठीण आहे. मार्कांवरून ते दिसतंच आहे.अंधार आहे सगळा. मेहनत वाया गेली.सगळे पर्याय संपले,नाही का?'

वडील म्हणतात, 'जरा दमानं घ्या. अजून सगळे पर्याय संपलेले नाहीत. प्रत्यक्ष प्रवेशाच्या प्रक्रिया व्हायच्या आहेत, थोडं थांबू तरी. आता एक नक्की आहे, हेच कॉलेज, हीच साईड, हेच गाव - हे जरा थोडावेळ बाजूला ठेवा.' प्रत्यक्षात असंच घडतं. प्रवेशप्रक्रियेचे नियम ऐनवेळी बदलतात. विद्यापीठांच्या परीक्षांतले गुणही प्रवेशाच्या वेळेला विचारात घ्यावेत, असा

काही नियम ठरतो. कुठं न्यायालयात कुणी याचिका दाखल करतात, त्यांच्या निर्णयांमुळं दिशा बदलतात. विशिष्ट कॉलेज नाही, पण विशिष्ट साईड मिळते, गावही मिळतं.

अनेकदा अनेक क्षेत्रांत, अनेक बाबतीत आयुष्यात अनेक टप्प्यांवर 'आपले सर्व पर्याय संपले' अशा स्थितीला माणूस येतो. खरंतर, असे सर्व पर्याय संपतात, अशी परिस्थिती एका अर्थानं कधीही नसते. कदाचित, पर्याय संपतीलही, पण ज्याला अमुकच पर्याय हवा आहे असं वाटतं त्याचे !

थोडा विचार केला तर लक्षात येईल, 'आपण' काढलेले पर्याय कदाचित संपलेले असतात. कारण शेवटी ते 'आपण' काढलेले असतात. आपल्या कुवतीप्रमाणं ! म्हणून ते संपल्यासारखे वाटतात.परिस्थिती, जग, त्यांतल्या उलाढाली - या इतक्या विशाल आहेत, की आपल्या पर्याय काढण्याच्या बुद्धीच्या कुवतीच्या बाहेर असंख्य पर्याय असतात. फक्त हे कळण्याएवढी, मान्य करण्याएवढी परिपक्वता, सबुरी आणि शांतता आपल्यात असावी लागते, याची अनेकांना कल्पना नसते.

त्यातही आपल्या कल्पनांप्रमाणं, अनुभवांप्रमाणं, आपल्या कुवतीनं आपलं हित, कल्याण कशात होईल, याचे ते पर्याय असतात. आपला उत्कर्ष, आपलं हित व्हावं हे बरोबरच आहे, पण त्यासाठी काही आपण काढलेल्या पर्यायांचीच मर्यादा गृहीत धरायचं खरंतर कारण नसतं. आपण आजूबाजूचे असंख्य अनुभव पाहावे. सर्वसाधारण पर्याय हे ठरीव असले, तरी बदलत्या परिस्थितीत इतर पर्यायसुद्धा असतात. आपण पाहिलं असेल, विशिष्ट शाखेत, विशिष्ट विषयांत प्रावीण्य मिळवल्यानं मोठा उत्कर्ष झाल्याच्या घटना आपण आजूबाजूला पाहतो. त्यामुळं तो आपला पहिला पर्याय ठरतो.

पण अनेकदा असं होतं की, हेच अनेकांना वाटल्यामुळं त्याच वाटेवरून अनेकजण जातात. अखेर त्या क्षेत्रातली मागणी कमी होते. हा पर्याय घेणारे पस्तावतात. इतर पर्याय घेणारे पुढं निघून जातात. कधी मार्केटमध्ये चढउतार, कधी मागणी-पुरवठ्याचं गणित, कधी सरकारी कायदेकानू - हे बदलतात. त्यांत 'आपले पर्याय' हे कसे अपुरे असतात आणि आपण अकारण 'पर्याय संपले' यानं निराश झालो, त्यामुळं उरलेले पर्यायही त्या परिस्थितीत गमावले याची कल्पना येते.

एका गृहस्थांचा आठवड्याच्या अखेरीला ठरलेल्या रेल्वेनं आपल्या

गावी जाण्याचा परिपाठ होता. त्या रेल्वेनं गेलं तर, ती गाडी पुढं वेगळ्या दिशेनं जात असली तरी, वाटेतल्या जंक्शनवर दुसऱ्या मार्गानं येणारी कनेक्टिंग ट्रेन त्यांना मिळत असे. त्या दिवशी नेहमीप्रमाणं ते वेळेत निघणार होते. तत्पूर्वी, आयुक्त खात्याला भेट देणार असा, फोन आला. या भेटीमुळं, कुणी अधिकाऱ्यांनी ते येऊन गेल्याशिवाय ऑफिस सोडू नये, असा आदेश निघाला.

आयुक्त ऑफिस संपण्यापूर्वी आले, सर्वांची मीटिंग ठेवली. सर्व खात्यांचे आढावे झाले. या गृहस्थांची अस्वस्थता वाढू लागली. अगदी आयत्यावेळेला जाऊनसुद्धा, आपण मुलाला गाडीनं स्टेशनवर सोडायला सांगू असा एकच पर्याय त्यांच्यासमोर होता. आयुक्तांचं भाषण सुरू झालं. थोड्यावेळात गाडी सुटण्याची वेळही झाली. आयुक्त काय म्हणताहेत, यापेक्षा त्यांच्या डोक्यात वेळेवर सुटणारी ती गाडी आता सुटली,शेवटचा पर्याय संपला, अशीच जणू ट्रेनची शिटी वाजत होती. अस्वस्थता वाढली, चुळबुळ सुरू होती. कारण, पुढची कनेक्टिंग ट्रेन मिळण्याचा पर्याय आता संपला होता. त्यामुळं, खेडेगावी वाट पाहणारे आजारी आईवडील भेटण्याची शक्यता संपली होती.

पुढं तासाभरानं मीटिंग संपल्यावर सारे पर्याय संपल्याच्या हताशपणानं ते घरी परतले. मुलगा नुकताच ऑफिसवरून परत आला होता. त्यानं एक पर्याय म्हणून स्टेशनला फोन लावला. गाडी वेळेवर निघून गेलेली होती. त्या मार्गावरच्या इतर गाड्यांची त्यानं चौकशी केली. त्याच रूटवर जाणारी पुढची गाडी सुटायला अजून अर्धा तास होता. मुलानं वडिलांना सुचवलं की, एक पर्याय अजूनही आहे. त्या रूटवरची ही दुसरी गाडी आपल्याला मिळू शकते. वडिलांचं म्हणणं होतं की, उशीरा पोचलो तर, वाटेतल्या जंक्शनवर उतरून आपण पुढं काय करणार ?कारण पुढं गावाकडं जाणारी गाडी नाही.

मुलानं सुचवलं, ती नसली, दुसरा काही पर्याय नसला तर तुम्ही परत येऊ शकाल. पण आजी-आजोबांसाठी तेवढी धडपड केल्याचं समाधान तुम्हाला मिळेल. त्यांना ते ऐकावं वाटलं. मागच्या गाडीनं ते गेले. जंक्शनवर पोचल्यावर त्यांना कळलं, ती कनेक्टिंग ट्रेन त्या दिवशी अडीच तास लेट होती आणि अजून यायची होती ! हा पर्याय वेगळाच होता, परिस्थितीतनं निघालेला होता. थोडी सबुरी, थोडे प्रयत्न आणि पर्याय संपल्याच्या कल्पनेचा त्याग केल्यामुळं, त्यांचं काम झालं होतं.

हेच आयुष्याला वळण देणाऱ्या अनेक गोष्टींत घडताना दिसेल. आपले पर्याय चुकीचे असतात, असं अर्थातच नाही. पण ते काढणारी बुद्धी, आपले अनुभव - यांच्या मर्यादा ओळखण्याची गरज मात्र नक्की असते. अनेकांच्या बाबतीत, विवाहापूर्वी काही पर्याय असतात. काही कारणांनी ते हुकतात. पर्याय संपल्याच्या भावनेनं निराशा येते.

पण अनपेक्षित ठिकाणाहून वेगळा पर्याय, परिस्थिती समोर आणते. तो आपण काढलेल्या पर्यायापेक्षाही चांगला ठरतो, आयुष्य मार्गी लागतं. तशाच नोकरीविषयी काहींच्या कल्पना असतात. त्यांच्यादृष्टीनं तेच ते क्षेत्र किंवा ते पर्याय हेच उत्तम आणि अपरिहार्य असतात. अशी माणसं त्यासाठी सर्वकाही करतात. ते प्रयत्न प्रामाणिकही असतात, रास्त असतात. पण परिस्थितीचा नूर काही वेगळा असतो. त्या नोकरीच्या प्रयत्नांत ते अपयशी ठरतात आणि इतर काही विचार न केल्यामुळं, अपयशानंतर त्यांच्यासमोर आता जणू काही पर्याय संपले अशी निराशाजनक स्थिती येते. नोकरीची संधी हुकते. त्यावेळी तेवढाच पर्याय दिसत असतो, चांगला वाटतो. म्हणून तो हुकल्याचं दुःख होतं.

पण काही काळानं तो विषय मागं पडतो. कुणीतरी इतर पर्याय सुचवतात. त्याठिकाणी प्रयत्न सुरू होतात. दुसऱ्या कुठल्या कंपनीत त्यावेळी तरी, कमी पगाराची नोकरी स्वीकारावी लागते. काही काळानं संधी मिळून तिथं पूर्णपणे अनपेक्षित हुद्दे मिळतात, पुढची प्रगती होते. कधी कानावर येतं की, ज्या कंपनीची संधी गेली, सगळे पर्याय संपले म्हणून आपण निराश झालो होतो, ती काही कारणानं खाली येते, बंद पडते. विशिष्ट ठिकाणी बदली, पोस्टिंग - अशा असंख्य बाबतीत वेळोवेळी घडत असतं. याच नव्हे, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या प्रश्नांच्या बाबतीतही !

आपल्या स्वास्थ्याच्या ध्येयापर्यंत पोचणारे मार्ग, पर्याय आपण काढतो तेवढेच नसतात, ते इतरही अनेक असतात. कारण, आपले अनुभव, कल्पना, मतं, बुद्धी, संस्कार - एवढ्यावर आपण पर्याय काढतो. ते सारं मर्यादित असतं. पण परिस्थिती बदलत असते, जग फार विशाल आहे. ते आपल्यासाठी कितीही पर्याय काढू शकतं, देऊ शकतं, आपल्या उत्कर्षाची, कल्याणाची काळजी घेऊ शकतं.

हवी आहे ती,'पर्याय संपत नाहीत' या वस्तुस्थितीची जाणीव, खात्री आणि त्यासाठी वाट पाहण्याची सबुरी !! **

१५. हवं-नकोच्या पलीकडं...

नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना एखाद्या कंपनीच्या कार्यालयात अर्ज द्यायला जावं लागतं किंवा वॉक् - इन पद्धतीनं थेट मुलाखत द्यायला जावं लागतं. तिथल्या अत्याधुनिक यंत्रणा, स्वच्छता, कार्यपद्धती, संपर्कयंत्रणा, बैठकव्यवस्था, वातानुकूलित यंत्रणा - असं सारं पाहिलं की, बाहेर पडताना, अशी नोकरी हवीशी वाटते.

कधी तसा योग येतोही. पहिल्यांदा गेल्यावर अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. आपण आता बाहेर नसून ऑफिसमध्ये आत आहोत, याच्यावर कधीकधी विश्वास बसत नाही. मन सुखावतं. नवं काम, नवी माणसं, नवे संबंध - अशा अनेक गोष्टी समोर येत असतात. त्यात पहिले काही दिवस, काही महिने कसे निघून जातात ते कळत नाही. पहिल्या पहिल्यांदा तर रोज जाण्याची-पोचण्याची उत्सुकता असते.

पण काही दिवसांनी काय होतं कुणास ठाऊक, ते काम हळूहळू अंगवळणी पडतं. त्याचत्याच कामाचा कंटाळा येतो. कधी त्या कामात काही बदल मिळाला, तरी पुन्हा काही दिवसांनी तिथंही पुन्हा ते काम हळूहळू कंटाळवाणं वाटायला लागतं. तिथं काम करणाऱ्या माणसांचे पहिल्यांदा खूप उत्सुकतेनं संबंध ठेवले जातात. शिकण्याचा, भेटण्याचा, बरोबर काम करण्याचा आनंद असतो. पण पुन्हा असं वाटायला लागतं की, आधी जे एवढं अपूर्वाईचं वाटत होतं, 'हवंसं' वाटत होतं, तसं तेवढं इथं काही नाही !

माणसं चारचौघांसारखीच आहेत. त्यांच्यात स्पर्धा आहेत, हेवेदावे आहेत, मत्सर आहेत. सुरुवातीला, आवरून बाहेर पडण्यातली उत्सुकता कमी होत जाऊन तेही कंटाळवाणं होतं. अनेकदा ते इतकं नकोसं वाटतं, की काही कारण सांगून, आज येत नाही म्हणून सांगावं, असं वाटतं. ज्या ठिकाणी केव्हा एकदा जाईन म्हणून सारं आवरून घड्याळाकडं पाहात असतो, त्याच घड्याळाकडं आता वेळ होत आली -जावं लागणार, म्हणून पाहिलं जातं !

यात गमतीचा अनुभव पुढंच आहे. कंटाळवाणं वाटलं आणि शक्य

असलं म्हणून महिनाभर रजा टाकली जाते. आठवडाभर आता घड्याळाचा काटा नाही, सक्तीनं आवरायला नको, तेच काम, तीच माणसं यांतलं आता काही नाही, म्हणून एकदम हलकंहलकं वाटतं. पुरुषांचा - महिलांचा वेळ निवांत उठण्यात, चहापाण्यात, जेवणात, नवीन पदार्थांत, मित्रमंडळींच्याकडं चक्कर टाकण्यात, आवडीच्या वाचनांत, फोन करण्यात, मनोरंजनात जातो. पहिले दोनतीन दिवस वाटतं, बसऽ, हे आपल्याला 'हवंसं' वातावरण आहे. एखादा आठवडा जातो, नंतर पुन्हा हळूहळू हे मोकळेपणही बरोबर आहे की नाही, अशा शंकेनं सुरुवात होते. निवांत बसण्याचा, फिरण्याचा, खाण्याचा कंटाळा वाटायला लागतो. रजेवर असताना फोन करायचा नाही, असं ठरवलेलं असूनही दोन आठवडे गेले की वाटतं, सहज बघू तरी, सध्या तिकडं काय चालू आहे. फोनवरचा सहकारी नेमका उत्साहात असतो. कोणाची बदली, नवीन स्कीम, नवं प्रोजेक्ट - असली माहिती उत्साहानं सांगतो.

मग मात्र मन बंड केल्यासारखं उठून बसतं. रजा घेऊन मिळालेला निवांतपणा आता 'नकोसा' वाटायला लागतो. तो आता 'आळशीपणा' वाटतो. असंच काय नुसतं लोळत राहायचं, नेहमीचं काम सुरू झाल्याशिवाय आपल्याला उत्साह येणार नाही असं वाटतं. त्याच उत्साहात कुणा वरिष्ठांना फोन केला जातो. माझी रजेतली कामं आवरली आहेत, उरलेली रजा रद्द करून उद्यापासून हजर व्हावं असं म्हणतो, असं सांगितलं की, ते एकदम उत्साहानं, या, या म्हणतात. मग ऑफिसला जाणं फारच 'हवंसं' आणि बरोबर वाटायला लागतं. दुसऱ्या दिवशी उत्साहानं पाच मिनिटं आधीच ऑफिस गाठलं जातं. दोनचार महिने गेले की पुन्हा रजा, घरचा निवांतपणा 'हवासा' वाटायला लागतो.

हे इथंच संपत नाही. तसंच ते ऑफिसपुरतंच किंवा मोठ्यांपुरतंच मर्यादित असतं असं नाही. लहान मूल कुठंतरी कुठला तरी खेळ बघतं, त्याला तो 'हवासा' वाटतो. तो खेळ घरी आणलेल्या दिवशी मूल तासन्‌तास खेळत बसतं. दोनतीन दिवस काही इतर विषय नसतो. मग ते ठोकळे जुळवायचा कंटाळा यायला लागतो. तोवर कुठंतरी खेळण्यातली गाडी दिसते. आणलेल्या दिवशी तिच्यात तास-दोनताससुद्धा जातात. झोपतानासुद्धा ती गाडी मुलाला उशाशी लागते. इतकी ती 'हवीशी' वाटते ! 'हवीशी' वाटणारी ती गाडी चारआठ दिवस स्वतः खेळली जाते, मित्रमंडळींना दाखवून होते. मग हळूहळू

खेळण्याचं प्रमाण कमी होतं. मग ती सरळच चालत नाही, तिच्यातला दिवाच लागत नाही - असल्या काहीतरी कुरबुरी सुरू होतात. ती इतकी 'नकोशी' होते की, कुणा मित्राला देऊन टाकायलासुद्धा मूल तयार होतं. मग ठोकळ्याशेजारी आता एक गाडी दाखल होते. तोवर तिसरं काहीतरी 'हवंसं' वाटायला लागलेलं असतं !

मुलांचं एकवेळ सोडून देऊ. पण आधी पाहिलं तसं, मोठ्यांचंही वेगेवगळ्या पातळीवर तेच चालू असतं, हे क्वचित लक्षात येतं. एखाद्या ड्रेसचा कंटाळा येतो, दुसरा कुठला तरी नवीन, कुणाचा तरी पाहिलेला 'हवासा' वाटतो, कधी आणीन असं होतं, आणला जातो. पहिला कपाटात जाऊन पडतो. नवा 'हवासा' असलेला दोनदोन तीनतीन दिवस उत्साहानं घातला जातो. कुणीतरी छान म्हणतं, बाकीचे बरेचसे कुणी काही म्हणतच नाहीत. पुढच्या आठवड्यात वाटायला लागतं, पहिलाच छान आहे. पुन्हा आधीचाच 'हवासा' वाटतो आणि अगदी गणवेश असल्यासारखा घालायला सुरुवात होते. पुन्हा काही दिवसांनी ये रे माझ्या मागल्या होतं !

हेच एखाद्या लग्नाळू मुलाचं किंवा मुलीचं होतं. मुलीला वाटतं, ते घर किती छान आहे. 'हवंसं' असतं, मिळतं. काही दिवस छान जातात. नंतर एखाद्या दिवशी घरातला पदार्थच आवडत नाही, कुणाचं बोलणंच आवडत नाही, कुणाचे नातेवाईक पसंत पडत नाहीत. त्यात पुन्हा आपल्या पतीनं त्यांचं सगळं बरोबर आहे असं म्हटलं किंवा त्याला त्यात न पटण्यासारखं - पसंत न पडण्यासारखं असं काही वाटलंच नाही, तर एकदम तो 'हवासा' मुलगाच बरोबर नाही आणि हळूहळू 'नकोसा' वाटायला लागतो. आपण आधी छान होतो, कुठल्या या माणसांत येऊन पडलो असं वाटतं. तो नको,ती माणसं नको, तसले ते नातेवाईक नकोत, ते घर नको - असं सगळं आता अगदी 'नकोसं' होऊन जातं!

हे असं किती ठिकाणी घडत असतं. माणसाला एखादं सामाजिक कार्य 'हवंसं' वाटतं, केलं जातं. मग तिथले पदाधिकारी, त्यांची एकमेकांतली वितुष्टं, न पटणारे व्यवहार - असं करीतकरीत आधी इतकं 'हवंसं' वाटलेलं ते कार्य 'नकोसं' होऊन जातं ! काहींना पर्यटनं, देवस्थानं 'हवीशी' वाटतात. जाण्यासाठी ते आटापिटा करतात. अनेकदा, खट्टू होऊन परत येतात. निदान पुन्हा न जाण्याइतपत तरी ते 'नकोसं' होतं. असं अनेक बाबतीत दिसेल !

खरंतर हे ओळखावं की, जगातल्या अशा प्रत्येक 'हव्याशा' वाटणाऱ्या नाण्याच्या छापामागं, 'नकोसं'चा काटा आधीच कोरलेला असतो. दुसरी बाजू कुणाची कधी उलटून पाहिली जाईल, तेव्हा ती दिसते एवढंच. हेही लक्षात येईल की, काही गोष्टी बदलता येतात,पण अनेक गोष्टी 'नकोशा' म्हणून टळत नाहीत आणि 'हव्याशा' म्हणून मिळत नाहीत. मनाला वाटणाऱ्या सुखाच्या, गरजांच्या, नावीन्याच्या ओढीपोटी असे 'हवेपणा'चे छाप उचलले जातात, हे लक्षात घेतलं, तर दुसऱ्या बाजूचा काटा गृहीत असेल, त्रास कमी होईल, नाणी फेकली जाणार नाहीत.

विचार करतील ते मुळातच मनाच्या या 'हवं-नको'च्या पेचातूनच सुटतील. कारण, शाश्वत आनंद मनाच्या या 'हवं-नको'च्या पेचाच्या पलीकडं जाण्यात आहे. ज्यांचं हे ध्येय असतं, ते आयुष्याच्या वाटेवर लागणारे हे 'हवं-नको'चे गतिरोधक अलगद पार करीत ध्येय गाठतात.

'हवं-नको'च्या पलीकडच्या शाश्वत आनंदापर्यंत सावधानतेनं आणि प्रयत्नपूर्वक जाण्याची झेप फक्त आपल्या या मनुष्यजीवनातल्या विलक्षण मनातच आहे !

**

१६. हातचा..!

एखाद्या महत्त्वाच्या वळणावर कुटुंबाचा प्रवास येतो. मुलाच्या उच्च शिक्षणासाठी प्रवेशाच्या तयारीचा प्रसंग असतो. मुलानं अभ्यास करून प्रवेशाच्या पात्रता यादीत नाव येण्यापर्यंतचे कष्ट केलेले असतात. त्याचा आनंद सर्वांना असतो. फक्त वडील घरी आल्यावर रात्री थोड्या सचिंत मुद्रेनं विचार करीत बसलेले असतात. बाकी सारी आपापल्या कामांत असतात. वडिलांच्या समोर पेपर धरलेला असला, तरी त्यात त्यांचं लक्ष नाही, हे एकदोन वेळा हॉलमध्ये खेपा घालून गेलेल्या आईच्या लक्षात येतं. ती कशाच्यातरी निमित्तानं त्यांना स्वयंपाकघरात बोलावते. चहा-कॉफी देते आणि हलक्या आवाजात विचारते की, 'तुम्ही कसल्या चिंतेत आहात का?' ते थोडं झटकून देतात. तेव्हा आई थेट विचारते, 'तुम्ही आता या शिक्षणाच्या खर्चाच्या जुळणीच्या चिंतेत आहात ना?' ते फक्त मानेनं होकार देतात. ती काही न बोलता दोन मिनिटांत तिच्या खोलीत जाऊन येते आणि त्यांच्या हातात काही छोटीछोटी सोन्याची वळी ठेवते. ती दिसताच, ते एकदम चमकून तिच्याकडं पाहतात.

ती म्हणते, 'काळजी करण्याचं कारण नाही. यानं हा प्रश्न सुटेल ना?' त्यांच्या चेहऱ्यावरचा ताण एकदम कमी होतो. ते म्हणतात, 'सहजच!' तरीही आई त्यांच्या मनातली चिंता ओळखून असते. ती म्हणते,'हे उधार उसनवार नाही. कष्टाचंच आहे, आपल्या घरातलंच आहे. काटकसरीचं, माझं हातचंच आहे..!' तसं म्हटलं तर घरातल्या जवळच्या माणसालासुद्धा माहीत नसलेलं, पण त्याक्षणी त्याला एकदम चिंतामुक्त करणारं, कर्तव्य करायला ऐनवेळी उपयोगी पडणारं - असं हे 'हातचं'!

जवळजवळ प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या रूपानं वावरणारा आणि ज्याच्यावर कधी फारसा विचारही कुणी करीत नसतं, असा हा 'हातचा'! कौटुंबिक जबाबदाऱ्यांनी आधीच घर थकलेलं असतं, आधीच्या दोन मुलींच्या लग्नांत ते घाईला आलेलं असतं. तिसरीच्या लग्नाच्या ठरावाच्या आधीच्या

रात्रीसुद्धा दिसत नसली तरी, मनात चिंता पोखरत असते. दुसऱ्या दिवशी सकाळी उगवणारी ही मंडळी आपली आता किती फरफट करतील, सुचवण्याच्या शब्दांत पण कायकाय मागतील, याचा अंदाज करता येत नाही. त्या तणावात चहापाणी होऊन बैठक मुद्द्यावर येते.

'बाकी आपल्या सगळ्या गोष्टी जमल्या, फक्त आमच्या मुलाचं मत असं आहे..',असं म्हणून थांबलेल्या वडिलांच्या वाक्यावर मुलीच्या वडिलांना ब्रह्मांड आठवतं. सवय असली नसली तरी, कुंभक करून ते त्यांच्या तोंडाकडं पाहत राहतात. मुलाचे वडील बोलण्याच्या ओघात म्हणतात,'..लग्न बिनखर्चात आणि साधं झालं पाहिजे!' मुलीच्या वडिलांच्या डोक्यावरचं मणभराचं ओझं कुणीतरी उतरवून ठेवावं, तसा त्यांचा चेहरा एकदम हलका होतो. तिकडच्यांना हे फारसं पसंत नसलं तरी, मुलानं शेवटपर्यंत मनात ठेवलेला हाही 'हातचाच!' मग लग्नाची फक्त नोंदणी करू, चार माणसं आनंदानं जेवू, हे सगळं थोडंथोडं समजुतीनं सावकाश, पण ठरतं. आधीपासून त्याच्यावर चर्चा होऊन माणसं दुखावण्यापेक्षा, नातेवाईक इरेला पडण्यापेक्षा बाकी सगळं ठरल्यानंतर तोपर्यंत गुप्त ठेवावा लागणारा हाही 'हातचाच!'

शत्रूच्या समोरून पूर्ण तयारीनिशी येणाऱ्या पलटणीला सरळ समोरासमोर युद्ध करण्याचा दिलेला आदेश, हा आपल्या स्वाभिमानी सैन्याच्या तुकडीला एका बाजूला आव्हान देणारा असला तरी, कुठंतरी आपण तयारीत असलेल्या शत्रूला सामोरं जातो आहोत म्हणजे, थेट मृत्यूला सामोरं जाण्यासारखं आहे, हे काहींच्या मनात चमकून जातं. ते प्रतिज्ञेवर चढाई करतातही. दुसऱ्या क्षणी इतका वेळ हातचा ठेवलेला आदेश एकदम समोर येतो. कुणालाही कचरण्याचं काही कारण नाही, समोर आलेल्या शत्रूच्या पलटणीवर मागून हल्ला करण्याची व्यवस्था आधीच झालेली आहे. हे कळताकळता समोरच्या तयारीनं येणाऱ्या शत्रूची झालेली कोंडी आणि शत्रूचा दोन्ही बाजूंनी होत असलेला पराभव, हा आधी मनात येऊन गेलेली भीती कुठल्याकुठं पळवून लावतो, पण आपल्या सैन्याच्या मनोधैर्याची परीक्षा घेऊन त्यात पास झाल्यावर मग हातात पडणारा हाही 'हातचाच !'

असंही समजायचं कारण नाही, की असा हा हातचा माणसाला एकदम हलकं करतो, सुखी करतो, दिलासा देतो. 'आता काय तुला चांगला अनुभव आहे, येणंजाणं, पैपाहुणे, देणंघेणं सगळं तू छान सांभाळू शकशील' -

असं म्हणून, महिनाभर एकट्या बहिणीच्या सोबतीला राहण्याच्या, सात्त्विक वाटणाऱ्या इराद्यानं पहाटेच्या गाडीनं निरोप घेणाऱ्या सासूबाईंना हात करून आत आल्यावर थोडावेळ झोप लागते. नंतर उठून आता जबाबदारी आपल्यावर आहे म्हणून, चहा करायला गेलं की लक्षात येतं की पातेलीत तापवून ठेवलेल्या दुधात फारतर एखाद्याचा चहा होईल. नकळत, फ्रीझ उघडून दुधाची पिशवी काढायला गेलं, की दूधच काय आत दुधापासून भाजीपर्यंत काहीही नसलेला रिकामा फ्रीझ सासूबाईंचा 'हातचा' दाखवतो. क्षणभर कळत नाहीसं होतं, पण नंतर संपलेलं तेल, पिठाचे रिकामे डबे - एकेक हाताशी आलं की, हाच 'हातचा' काय हात दाखवतो आणि रडकुंडीला आणू शकतो ते कळतं !

हे तर अगदी साध्या पातळीवरचं आणि थोडं, पण हा हातचा कुठंपर्यंत काम करीत असतो हे सांगता येणंही कठीण आहे. साध्या पत्त्यांच्या खेळातसुद्धा एक खास हुकुमाचं पान बाजूला ठेवलेलं असतं. तेच हातचं पान सारी बाजू पलटवू शकतं. क्षेत्र कुठलंही असो - संगीत असो, पैलवानकी असो, खेळ असोत, अनेकदा शिकवणारे त्यांच्या तोडीचा शिष्य तयार करतात. पण तो कधी वरचढ होऊ नये म्हणून एखादी बंदिश, एखादा डावपेच, एखादी खेळी - अशी कुठंतरी 'हातची' ठेवलेली असते. आपण अनेकदा पाहिलं असेल की, राज्याचं, देशाचं लक्ष लागलेल्या आणि एखादी बाजू हमखास जिंकणार असं सर्वत्र वातावरण असताना दुसऱ्या दिवशी अनपेक्षितपणे ती बाजू पडते, दुसराच निवडून येतो, तेव्हा काम करतो, तो असाच कुठलातरी मुठीत ठेवलेला 'हातचाच !'

माणसांचे अनेक पातळ्यांवर वेगवेगळ्या प्रकारे समाजात संबंध येत असतात. ते कुटुंबातले नात्यांचे असोत, मैत्रीचे असोत, बाहेर कुठल्या संघटनेतले असोत. आपल्याला असं आढळेल की, त्यात कितीही मनमोकळेपणा असला, जवळीक असली तरी, कळतनकळत प्रत्येकाचं काहीतरी 'हातचं' ठेवलेलं असतं. काहीवेळा असंही होतं की, तसं काही नसलं तरी जवळच्याला वाटतं की, यांनी काहीतरी 'हातचं' ठेवलेलं असलं पाहिजे. कारण, या हातच्याचंच स्वरूप असं आहे की, ते आहे याला एकवेळ पुरावा मिळेल, पण तो नाही, हे सिद्ध करणं अवघड असतं !

असं हे हातचं सकारात्मकही आहे आणि नकारात्मकही आहे. ते तसं का आणि कसं असावं याचा थोडक्यात विचार करू. प्राण्याला पाठीचा कणा

आणि प्रगल्भ मेंदू प्रदान करून माणूस म्हणून उभा केला, तेव्हा खरा, त्याचा हा 'हात' मोकळा झाला. म्हणताना आपण चांगल्या असो, वाईट असो - अर्थानं 'हातचं' म्हणत असू, तरी त्याच्या मेंदूतला आणि मनातला तो एक कप्पा आहे.

अनेकदा बरोबरची माणसं उधळपट्टी करणारी असतील, विश्वासार्ह नसतील, कुवतीची नसतील, भविष्यातल्या अडीनडींची जाणीव नसणारी असतील, तर अशा अनेक कारणांसाठी त्या कप्प्याची जरूर असते. तसं पाहिलं तर, ईश्वरालाही सर्वसामान्यांच्या कुवतीची अजून खात्री नाही. म्हणून ती प्रगती होईपर्यंत विश्वाची अनेक रहस्य त्यानं आपल्या 'हातात' ठेवली आहेत ! जसं आपण व्यवहारांतल्या बाबतीत, युद्धातल्या यशासाठी गुप्ततेची जरूर आहे हे पाहिलं, ते काम करण्यासाठी हा कप्पा त्याला मदत करतो, वापरता येतो. पण याचं नीट आकलन झालं नसेल, उपयोग कळला नसेल, त्यानं स्वतःचं - दुसऱ्याचं हित साधता येतं हे कळलं नसेल, तर याच कप्प्याचा असंख्य वेळेला दुरुपयोग होताना आढळेल. कारण, या कप्प्याचा ताबा आता अशा सद्‌बुद्धीकडं, विवेकाकडं न राहता अहंकाराकडं जातो. मग माणूस त्याचा उपयोग दुसऱ्यावर स्वामित्व गाजवण्यासाठी, दुसऱ्याचं नुकसान करण्यासाठी, आपलं महत्त्व वाढवण्यासाठी करू लागतो.

आपण अनेकदा पाहिलं असेल की, आपण वेगवेगळ्या प्रकारची नवनवीन यंत्रं घेतो. संगणक घेतो. ते पुरवणारा स्वतः येऊन वस्तू देऊन त्याची प्राथमिक माहिती देऊन जातो. आपण ती वस्तू जर पूर्ण किंमत देऊन खरेदी करीत आहोत, तर ती कुठल्याही परिस्थितीत चालू राहण्यासाठी, वापरण्यासाठी तिच्या पूर्ण माहितीची गरज आपल्याला असते. पण आपल्याला आढळेल की, सामान्य काम सुरू होतं आणि एकदम काही अडथळा उभा राहतो. त्यावेळची कृती अत्यंत साधी पण महत्त्वाची असते. एखादी कळ दाबणं, काही सांकेतिक शब्द टाकणं, एवढ्यावर साऱ्या अडचणी दूर होऊ शकतात. पण तेवढंच नेमकं आपल्याला सांगितलेलं नसतं. मग फोनाफोनी, खेपा, वेळेचा अपव्यय - सारं अपरिहार्य असतं. कारण ती छोटीशी गोष्ट त्या माणसाच्या मेंदूतल्या 'हातच्या' कप्प्यात ठेवलेली असते. हे जेव्हा फार मोठ्या प्रमाणावर आणि खूप माणसं करतील, त्यावेळी त्यांच्याकडून इतरांना किती आणि कोणकोणत्या प्रकारचा त्रास होऊ शकेल, याची कल्पना करावी.

'हातचा' असणं ही जन्मतः मिळालेली विद्या आहे. नकारात्मक

आणि बेसावधपणे वापरली तर, व्यक्तिमहात्म्य, पैसा, सत्ता, अडवणूक - असं काहीही घडेल. पण तसं करणं टाळणं आणि त्याच हातच्यानं लोकांना माहिती, मदत, अनेक प्रकारचे आनंदाचे अनपेक्षित क्षण देणंही शक्य आहे. तेच मोठ्या मनाचं आणि माणुसकीचं काम आहे !

**

१७. वेगळेपणाचा चकवा !

एखादा लग्नसमारंभ ठरला की, माणसं वेगवेगळ्या कामाला लागतात. त्यात काही विशेष जिव्हाळ्याचे विषय उत्साही मंडळींच्या सतत समोर असतात. जसं दागदागिने, कपडालत्ता, वस्तू - खरेदी. त्यातही जास्तीत जास्त लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो तो जेवणाचा बेत. त्याबद्दल महिलावर्ग विशेष आघाडीवर असला तरी, पुरुषवर्गही अनेकदा मागं नसतो. त्यात प्रत्येकाच्या अनुभवांची खूप देवाणघेवाण, चर्चा होत असते. पण बहुधा नेहमी तो विषय आतल्या गोटातल्या मर्यादित अशा स्त्रीवर्गाकडं जातो. सगळ्यांचे अनुभव गृहीत धरून केटररशी ऊहापोह होतो. तिथून पुढचा बेत मात्र हळूहळू खाजगीत होत जातो. त्यात एका बाजूनं सर्वांना चकित करणारा, आवडणारा बेत ही अनुभवी मंडळी ठरवणार, याची खात्री असते. त्यात सर्वांत जास्त खात्री असते ती ही की, हा बेत एकदम 'वेगळा' असेल आणि चांगल्या अर्थानं सर्वांना चकित करील, त्यावर चर्चा होईल, त्याचं कौतुक होईल असा असणार.

प्रत्यक्षात अनेकांचं त्या जेवणाकडं लक्ष लागून राहिलेलं असतं. लग्नानंतर वेगवेगळ्या हॉलमध्ये, वेगवेगळ्या स्टॉलवर जेवणारी मंडळी फिरत असतात. त्यांतल्या काहींना त्या जेवणाच्या बेतातले अनेक पदार्थ नवीन असतात. तसे सगळेच जाताना आवर्जून या आगळ्यावेगळ्या बेताचं कौतुक करीत निरोप घेतात. ते ऐकताना असा आगळावेगळा बेत ठरवणाऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद लपत नाही. मग बाहेरच्या गाड्या काढताना गटागटांच्या चर्चा सुरू होतात.

अनेकजण बाहेर गेल्यावर म्हणतात की, या प्रकारचा बेत जेवण्याची त्यांची तिसरीचौथी वेळ आहे. काहींनी त्यातले पदार्थ अनेकवेळा पूर्वी खाल्लेलेही असतात. पण खाल्ल्या अन्नाला जागून आणि व्यवहार म्हणून सर्वांचं यावर एकमत होतं की, त्यांनी काहीतरी वेगळं केलं आहे, याच्या त्यांना होणाऱ्या आनंदावर विरजण कशाला घाला ? असा बेत आम्ही

पहिल्यांदाच खातो आहे, असं म्हटलं तर काय बिघडलं ? त्यांना तेवढंच समाधान !

तसं खरंतर निसर्गानं प्रत्येक माणसाला, माणूस म्हणून सारखं ठेवलं असलं तरी, प्रत्येकात विलक्षण वेगळेपण आधीच ठेवलं आहे. लाखो चेहरे हुडकले तरी, त्या चेहऱ्याचा दुसरा माणूस शोधणं किती कठीण जातं, हे आपल्याला माहीत आहे. नुसत्या शारीरिक ठेवणीच नव्हे तर, बुद्धी, कल्पना, विचार - अशा अनेक शक्तींत निसर्गानं असंच वेगळेपण जपलं आहे.

तरीही या वेगळेपणाचं माणसाला विलक्षण आकर्षण आहे, असं आपल्याला आढळेल. एकवेळ कर्तृत्वानं त्याचं स्वतःचं असं वेगळेपण मिळवलं तर समजू शकेल. पण हे आकर्षण इतक्या सामान्य आणि बालिश पातळीपासून आढळतं आणि ते इतक्या वृद्धपणापर्यंत पसरलेलं दिसतं की, पाहणारा थक्क होऊन जातो. जर तो यावर विचार करणारा असेल तर, त्याच्या असंही लक्षात येईल की, याची खरी गरज आणि स्थान माणसाच्या जीवनात नक्की काय असेल ?

असंख्य माणसांना कला, साहित्य, संस्कृती, समाजव्यवस्था, प्रगतीची क्षेत्रं - अशा अनेक बाबतीत वेगळं करण्याची शक्यता नसते. खरंतर असा वेगळेपणा करण्याची गरजही नसते. पण लहानपणापसून मागं लागलेल्या या 'वेगळेपणाच्या चकव्या'नं मनुष्य इतका झपाटलेला असतो की, ते विचार करणाऱ्याच्याच लक्षात येईल. आपण पाहा, अगदी लहान मुलालासुद्धा दुसऱ्याच्या शर्टसारखा शर्ट चालत नाही. तो रंग चालत नाही, ते डिझाइन चालत नाही. लहान मुलीलाही इतरांसारखे फ्रॉक चालत नाहीत. साधेसाधे डबे, वस्तू, चपला - अशा असंख्य गोष्टी इतरांपेक्षा आपल्या वेगळ्या असाव्यात, असं वाटतं. वास्तविक, याचा त्यांच्या व्यक्तिमत्वाशीही फारसा संबंध नसतो आणि त्यांच्या शिक्षणाशीही.

पण या वेगळेपणाच्या चकव्यात मुलंच काय, मोठेही सापडलेले असतात. त्यामुळं, ते बाजारात हिंडून हिंडून, पायपीट करून इतरांकडं नसलेल्या वस्तू, पोषाख, खेळ - मुलांसाठी गोळा करण्यात मागं नसतात. इतकंच नव्हे तर, त्यांनाही या वेगळेपणाच्या चकव्यात नकळत प्रोत्साहन देऊन अडकवीत जातात. आधी म्हटलं तसं, असं हिंडून जरी लांबच्या किंवा परगावच्या ठिकाणाहून, ती वेगळी म्हणून आणलेली वस्तू असली तरी, अखेर त्या

दुकानातून तशा वस्तू घेऊन जाणारे कितीतरी लोक असतात. मग त्या वस्तू किती काळ आणि कुठंकुठं वेगळ्या राहणार ? मग पुन्हा आपल्याला नाराज व्हायला होतं.

हे तसं या पातळीवर त्यांतल्यात्यात निरुपद्रवी काम आहे. पण वाढत्या वयाबरोबर असा अकारण वेगळेपणा करण्याची सवय लागली तर, ती माणसाला अकारणच कुठंही भरकटत नेऊ शकते. आपण पाहा की, कितीतरी फॅशन्स या त्यात काही विशेष नसताना, अगदी ढोबळपणानं कुठं बाह्या लांबव, कुठं कमीच कर, कुठं पँटचा घोळच वाढव, कुठं ती अर्धीच कर, कुठं शर्टाचे खिसे काढून पायाला लाव - अशा अगणित प्रकारांनी हा वेगळेपणाचा चकवाच माणसाला भुलवीत असतो. त्याच्या चर्चा, वेळ, पैसा, जाहिराती- असे अनेक टळण्यासारखे अपव्यय त्याला करायला लावतो.

उपयोगासाठी किंवा काही कारण म्हणून माणसाला वेगळेपणा करावा लागतोही. पूर्वीच्या काळी सायकलशिवाय वाहन नव्हतं. विजार-शर्टशिवाय पोशाख नव्हता. त्यावेळी त्या विजारीचा पायघोळ सायकलच्या चेनमध्ये वा चाकात अडकू नये, म्हणून ती विजार दुमडून त्याला क्लिपा लावून मैलच्या मैल सायकल प्रवास करताना करावे लागणारे हे पोशाखातले बदल, हे असा वेगळेपणा नसून त्या परिस्थितीच्या गरजा होत्या. त्याही अर्थात, गरजाच असल्यामुळं माफकही होत्या. त्यात स्वतःच्या शक्तीची परीक्षा होती, वाढ होती, दम टिकत होता, पैसा वाचत होता. हा वेगळेपणा माणसाचं कर्तृत्व दाखवीत होता !

पण आपण आता पाहिलं असेल की, हा वेगळेपणाचा चकवाच लक्षात येत नसल्यामुळं आणि असं कर्तृत्वाचं कुठलं विधायक क्षेत्र सापडत नसल्यामुळं, आता अनेक माणसं हातावर गोंदून घेतील, अगम्य चित्र काढून घेतील, टॅटू चिकटवतील - पुढं भविष्यात, हा चकवा लक्षात नाही आला, तर कायकाय करतील, याची कल्पनाच केलेली बरी ! समोरून येणाऱ्या तरुण वर्गानं केलेला पोषाख, त्यावरच्या एबीसीडीपासून कुठल्याही भाषेतली मुळाक्षरं ते जपानी चित्रलिपी, डोक्याचा चकोट, चुकून राहिलेली की वाढवलेली हे न कळावं अशी दाढी - यांत या चकव्यानं आता, ओळखीचा माणूससुद्धा त्या अर्थानं ओळखणं, अवघड करून टाकलं आहे. दुःख याचं नाही तर, त्यानं खऱ्या अर्थानं वेगळेपण देऊ शकणाऱ्या कर्तृत्वाच्या कल्पनांचा आणि त्यासाठी

करायच्या कष्टांचा अभाव झाला, याचं आहे !

आपण खोलात जाऊन पाहिलं तर लक्षात येईल की, निसर्गानं दोन्हीही गोष्टी माणसाला बहाल केल्या आहेत. मनुष्य म्हणून दिलेल्या देणग्यांतलं साम्य आणि खऱ्या अर्थानं कर्तृत्वानं उत्तुंग आणि वेगळं होण्याच्या विलक्षण क्षमताही. तसं तर माणूस सोडता इतर सर्व निसर्गात असंच मूळ साम्य पण विलक्षण विविधता - वेगळेपण आहे. फुलासारखं फूल नाही, पानासारखं पान नाही, झाडासारखं झाड नाही ! कधीतरी लक्षात घ्यावं की, असं खऱ्या अर्थानं आकर्षक ठरणारं, जगाला आनंद देणारं वेगळेपण कशात आहे ? तर कळून येईल की हे वेगळेपण आनंद देणारं तर आहेच, ते खरंही आहे, निरपेक्ष आहे आणि अस्सल आहे, सहज आहे !

वेगळं म्हणून गायला गेलं की वेगळं गाता येत नाही, त्याला अनुकरणाची कळा येते. वेगळं म्हणून लिहायला गेलं की वेगळं लिहिता येत नाही, वेगळं राहायचं ठरवलं - वागायचं ठरवलं तर ते पुन्हा कुणासारखंतरीच होतं. कारण, आपल्यात अंगभूत असलेल्या गुणांच्या सहज विकासातून खरं वेगळेपण येतं. ते ज्यांना येतं, त्यांचं जगणं वेगळं असतं - गाणं वेगळं असतं - लिहिणं वेगळं असतं ! या साऱ्यामुळं, त्यांच्या जगण्यात लौकिक अर्थानं सारं तसंच असतं, साधंच असतं, पण ते खऱ्या अर्थानं वेगळं असतं. कारण ते मुद्दाम कुणापासून वेगळं जगावं म्हणून जगलेलंच नसतं ! खऱ्या वेगळेपणाची उत्तुंगता कळली तर, चकव्यासारखं फसवं - फोल वेगळेपण कधीच टाकून दिलं जाईल ! वेगळेपणाच्या या फसव्या चकव्यातून आपण जितके लवकर बाहेर पडू तितकं उत्तम ! कारण, त्यानं खऱ्या वेगळेपणाचा आरंभ होईल !

कारण अगदी खरं सांगायचं तर, खरं वेगळेपण हे कुठं बहिरंगाचं नसतंच. फूल फुलाच्या क्षमतेनं पूर्ण उमलतं - तेव्हा त्या फुलातला अकल्पित सुगंध सहज, दूरवर पसरतो, त्याचा वेगळेपणा ही जाणवून द्यायची, सांगायची गोष्ट उरत नाही. ते वेगळेपण सिद्ध करायची गोष्ट उरत नाही. दाद आणि दिलासा मिळवून जाणारी गोष्ट असते !

असं खरं वेगळेपण कळावं, निर्माण व्हावं ! कारण, जगातली गुणवत्ता आणि आनंद वाढतात, ते अशा खऱ्या वेगळेपणांमुळं ! ते अर्थातच दुर्मिळ असतात, त्यांची वाण असते पण त्यांची गरजही तितकीच विलक्षण असते !

**

१८. अनिश्चितता !

...आणि शेवटची ओव्हर सुरू होते. सहा चेंडू, नऊ धावा ! अटीतटीच्या सामन्याला एखाद्या युद्धाची कळा येते. पहिला चेंडू टाकायला जात असताना, अनेकांनी रोखून धरलेले श्वास चेंडू पडल्यावरच सुटतात, एकही धाव निघत नाही. तणाव वाढतो. जरी पाच चेंडू शिल्लक असले तरी, काय होईल हे सामान्य माणसाला सांगता येत नाही. त्याला त्या क्षणी एकच सांगता येतं, ते म्हणजे हे सगळं अनिश्चित आहे. असेच चेंडू वाया गेले, तर हातचा सामना घाम गाळला तरी निसटून जाईल आणि एखादा षट्कार आणि चौकार बसला तर, हाच अनिश्चित विजय दुसऱ्या क्षणी हातात येईल. नंतर मिरवला जाईल तो विश्वचषक ! हे सामान्य माणसाचं ठीक आहे. पण पंधरा-पंधरा, वीस-वीस वर्षं यांतले सारे चढउतार, अशक्य कोटीतले जय किंवा पराजय यांच्या अनुभवातून गेलेल्या दोन पिढ्यांतले दिग्गज खेळाडूही, काही केबिनमध्ये भाष्यकार म्हणून आणि काही बाहेर विशेष तज्ज्ञांच्या कक्षात बसलेले असतात. तेही श्वास रोखून. इतकी मैदानं, स्वतः खेळण्यातला अनुभव, समोरच्या स्थितीतल्या बारकाव्यांचं आकलन - सगळं जमेला असूनही त्यांनाही एकच गोष्ट दिसते, ती म्हणजे - अनिश्चितता !

सामन्याचं पुढं काय होतं, हे समजून घेण्याची फारशी गरज नाही. खरी गरज आहे, ती आयुष्यात सगळीकडं वावरत असलेली ही अनिश्चितता समजून घेण्याची ! तिला त्या अर्थानं कुठलं क्षेत्र वर्ज्य नाही. कुठली परिस्थिती वर्ज्य नाही. कुठलं वय वर्ज्य नाही. भक्कम बहुमतानं राज्यावर बसलेल्या राजाच्या मनात ती वावरू शकते. तशीच ती उद्याची भ्रांत असलेल्या गरीबाच्या मनातही वावरू शकते. थोडा कच्चा अभ्यास असलेल्या विद्यार्थ्याच्या मनात ती निकालाच्या आधी वावरते, हे आपण समजू शकू. पण अव्वल गुणवत्तेनं पास होण्याइतपत कुवत आणि अभ्यास असलेल्या विद्यार्थ्याच्या मनातही, ती अनिश्चितता, घर अगदी आपलं असावं, इतक्या मोकळेपणानं वावरताना दिसते. ही वस्तुस्थिती असली तरी, समजून घेतानासुद्धा

अवघडजाते.

एखाद्याचं खूप लांबच्या प्रवासाला जायचं अचानक ठरतं. रेल्वेशिवाय पर्याय नसतो. सीझन पाहाता गाडीत पाय ठेवायलासुद्धा जागा मिळणार नाही, अशा वेळी आपण त्या गाडीत शिरू शकू की नाही किंवा तो प्रवास पुरा करू शकू किंवा नाही यांतली अनिश्चितता आपल्याला एकवेळ कळू शकते. पण ज्यानं दोनदोन महिने आधी आरक्षण केलेलं आहे, त्याच्या मनात फलाटावर उभा असतानासुद्धा ही अनिश्चितता एका कोपऱ्यात घर करून बसलेली असते. कारण दोन महिन्यांपूर्वी आरक्षण करताना, घरातसुद्धा कडक उन्हानं घाम गळत होता. पण प्रवासाच्या आदल्या दिवसापासून, अवचितपणे आलेल्या वारा आणि वादळी पावसानं सगळीकडं दाणादाण होऊन, आत्तापर्यंत लांबच्या पल्ल्याच्या दोन गाड्या रद्द झाल्याची बातमी, मधून मधून महत्त्वाच्या बातम्यांत झळकत असते.

अनेकदा हे सारं थोड्या वेगळ्या दिशेला सुरू असतं. त्याचा या प्रवासाच्या दिशेशी थेट संबंध नसतोही. पण शेवटी ते अनियंत्रित वादळ आहे. त्याची ताकद प्रचंड आहे. दिशेचा अंदाज लागत नाही. असे अनेक विचार, डोक्यात वादळापेक्षा जास्त थैमान घालीत असतात. मनात येत असतं, की खिशात दोन महिन्यांपासून जपून ठेवलेल्या तिकिटावर योजलेला प्रवास होणार की पैशाचा रेल्वेकडून परतावा मिळणार ? त्यात या व्यवहारांची माहिती देऊ शकणारी कुणी जबाबदार व्यक्ती तिच्या केबिनमध्ये दिसत नाहीशी झाली, की सोबत असते ती फक्त आरक्षणाचं तिकीट आणि अनिश्चितता - यांची !

अनेक प्रयत्न करून, कुठं नोकरी लागत नाही, त्यावेळी पुढं काय होणार, ती वेळेत लागणार की नाही, कुठं लागणार याची अनिश्चितता ज्यांनी अनुभवली असेल, त्यांनाच चांगली माहिती असेल. पण जे तो टप्पा पार करून एखाद्या कंपनीत, त्यांना हव्या असलेल्या ठिकाणी, नोकरीचं काम करीत असतील, तरी काम करताकरता मध्येच कुणाला तरी अचानक काढून टाकल्याचं कळतं. कंपनी मोठी, पगार मोठा, पण ती बहुराष्ट्रीय आहे, त्यांतल्या एका राष्ट्रात सत्ताबदल झाल्याच्या बातम्या आहेत. तसं आजूबाजूला स्वतःपुरती तरी नोकरी, स्थिती, पगार चांगला आहे. पण तिथंही अनिश्चितता, डोक्यावर फॅनसारखी फिरत का राहाते - ते सांगणही अवघड जातं.

विसाव्या मजल्यावरच्या कँटीनमध्ये, भिंतीच्या कडेजवळची, खिडकी

शेजारची खुर्ची पकडून, शेजारच्या काचेतून खाली पाहात, कुणी डबा खात असतो. सकाळी ऑफिसमध्ये येताना मागमूसही नसलेल्या पावसाची भुरभूर खिडकीतून दिसते. कुठल्याही क्षणी रौद्र रूप धारण करणाऱ्या, महानगरातल्या त्या समुद्रकाठच्या पावसाचे झटके पूर्वी बसलेले असतात. अजून चार तासांनंतर तो काय करील, याची शंका येते. अर्ध्या तासाच्या या डब्याचा वेळ, या अनिश्चिततेवर विचार करण्यात कधी जातो, ते कळत नाही. पावसाचा मूड उग्र होत चालला आहे, दोन तासांत तो सगळीकडं पाणीच पाणी करील. हळूहळू बाहेरच्या लोकल धीम्या गतीनं जायला लागतात. तोवर कुणीतरी काही ट्रॅक पाण्याखाली गेल्याची बातमी सांगतं. यात विजेनं गोंधळ केला तर काय होईल, याची चित्रं डोळ्यांसमोर येतात. पूर्वी आपण दहादहा तास वाटेत कसे अडकलो होतो - असे विचार करताकरता, डब्यात हात जातो, तेव्हा लक्षात येतं की, भाजीच्या डब्यातही काही नाही, पोळीच्या डब्यातही काही उरलेलं नाही. दुसऱ्या क्षणी हाही विचार मनात येतो, की असं सगळं घडेलच असं कशावरून ? त्याचबरोबर असंही वाटतं, की यांतलं काहीच निश्चित नाही तरी, आपण या अनिश्चिततेच्या गुंत्यात सापडावं आणि आपल्या डब्यातलं अन्न संपल्याचीसुद्धा आपल्याला जाणीव होऊ नये ? या विचाराचासुद्धा त्रास होतो !

काही सन्मान्य अपवाद सोडता, सर्वांना, सर्व काळी ग्रासणारी ही आयुष्यातली - अनिश्चितता ! ती ऑफिसमधल्या साहेबांचा सकाळचा मूड संध्याकाळी असेल याची खात्री देत नाही. लग्न आपलं आपलं ठरवलं तरी ते तसंच होईल याची खात्री देत नाही. सगळं ठरवून अगदी नोंदणी झाली, तरी आपलं जमेल - टिकेल याची खात्री देत नाही. इतकंच नाही, तर दहावीस वर्षं संसार करूनही आपण अखेरपर्यंत असेच बरोबर राहू याची खात्री देत नाही. ती प्रत्येक गोष्टीवर शंकेचं-संदेहाचं प्रश्नचिन्ह उभं करीत असते ! बोलणारा मनुष्य खरंच मनातलं बोलतो आहे की नाही, याची खात्री देत नाही. आपण ज्यांची फी त्यांच्या मनाप्रमाणं मोजत आलो आहोत आणि आपल्याला खटला जिंकू देणार असं त्यांनी ठामपणे म्हटलं, तरी जिंकण्याची खात्री देत नाही. त्यातही ते पुन्हा वेळ पडली तर आपण अपीलात जाऊ, असं म्हणाले की अनिश्चितता वाटते. त्यातही आपले वकील विरोधी वकिलांबरोबर चहाला बोलतबोलत एकत्र गेलेले दिसले, की आणखीच अनिश्चितता वाटते !

नातेवाईक, प्रतिष्ठा, मान, न्याय, सरकार, व्यवसाय, कायदेकानू,

माणसांचा चांगुलपणा, वाईटपणा, प्रकृती, स्वभाव, गरजेच्या वस्तू, बाजार, दर - कुठं विचार करील तिथं ही अनिश्चितता माणसाला सावलीपेक्षा जास्त सोबत करते. सावली एकवेळ, उन आलं तर पडेल, पडली तरी आपल्या व्यवहारांत त्रास देणार नाही, अस्वस्थता उत्पन्न करणार नाही. पण ही अनिश्चिततेची सावली मात्र बारा महिने, तेरा काळ सोबत सोडीत नाही. एकेकाळी सरकारी कर आणि मृत्यू हे निश्चित असतात, एरवीचं सारं अनिश्चित आहे, असं म्हटलं जाई. पण आता करही कमी असतील की जास्त असतील, अशीही अनिश्चितता तर आहे. मृत्यूच्या बाबतीत ती घटना अजून तरी निश्चित असली, तरी कोणत्या वयाला आणि आज, उद्या की दहा वर्षांनी हे सर्व अनिश्चित आहे. त्यामुळं त्यांतली निश्चितताही आता डळमळीत होत चालली आहे.

मग आपण तिच्याबद्दल काय लक्षात घेऊ शकतो ? अनिश्चितता तर जगात राहीलच. पण तिच्यातून निर्माण होणारं काळजीचं, भयाचं ओझं हे मात्र ज्याचं त्याचं मन निर्माण करीत असतं. म्हणूनच ते प्रत्येकाला कमीजास्त प्रमाणात त्रास देतं. ते ओझं स्वाभाविक वाटत असलं, तरी असं ओझं घेऊन जगलंच पाहिजे, असं अजिबात नाही. जयपराजय, यशअपयश - अशा गोष्टी जर उद्या निश्चित असतील, तर त्या मिळण्यातलाच नव्हे तर प्रयत्नांतलासुद्धा आनंद निघून जाईल.

अनिश्चितता म्हणजे नुकसान, अपयश, दुःख, वियोग - असल्या नकारात्मक गोष्टी आपणच ठरवल्या आहेत. त्यानं जगण्यातला आनंद झाकोळून जातो. जर हे अनिश्चित असेल तर फायदा, यश, सुख - हेही अनिश्चित असेल आणि तेही तितक्याच प्रमाणात मिळणारं असेल, याची आपल्याला खात्री असावी आणि तसं ते मिळतं, हाही अनुभवच आहे !

चांगल्याचा, आनंदाचा, यशाचा, सुखाचा, सार्थकाचा अंतरंगातला सूर्य समोर ठेवून आयुष्याची वाटचाल करणाऱ्याला, अनिश्चिततेचा अंधार गृहीत असला, तरी प्रकाशातल्या वाटचालीतला अनुभव आणि विधायक गोष्टी, नक्की अधिक अनुभवाला येतात ! त्यामुळं अनिश्चिततेनं आयुष्य झाकोळून जात नाही. एखादा ढग कधीतरी येईलही, पण तो आपल्या मार्गानं निघूनही जातो आणि माणसाची आनंदाची वाटचालही थांबवू शकत नाही !

**

१९. वाळूतल्या रेघोट्या

कुठल्या ना कुठल्या निमित्तानं समुद्रकिनाऱ्यावर माणसं जातात. वाळूचे विस्तीर्ण किनारे पाहातात. लहानपणी आणि मोठेपणीही. आपल्याकडं पहिल्यापासून असे असंख्य किनारे - या शांततेसाठी, मोकळ्या हवेसाठी फिरण्याच्या जागा आहेत. वाहनं, वर्दळ, गजबज, गोंगाट - यांपासून दूर जाऊन, किनाऱ्यावरच्या वाळूत बसण्याचा अनुभव घेतलेले लोक असंख्य असतील. आता त्यांतल्या काही किनाऱ्यांना खाण्यापिण्याचे गाडे, मुलांच्या खेळण्यांच्या, खाण्याच्या वस्तू - अशा गोष्टी वाढल्या असल्या तरी, अजूनही कित्येक किनारे वाळूत निवांत बसता यावं, इतके शांत आहेत. तिथली वर्दळही त्यामानानं कमी आहे. मोठ्यांना त्यांच्या लहानपणी, आपल्या घरातल्या कुणा मोठ्यांबरोबर समुद्राकाठी जाऊन आल्याच्या आठवणी आजही येत असतील. आजही ते स्वतः, आजच्या पिढीतल्या लहान मुलांना घेऊन, असे समुद्राकाठी जात असतील, जात राहतीलही !

अशा किनाऱ्यांवर, विशेषतः मुलांचा उद्योग वाळूत खेळणं हा असतो. काही मुलं वाळूत मन मानेल तशा रेघोट्या ओढीत बसलेली असतात. वाळूत पाय रुतत असल्यामुळं तिथं पळणं, उड्या मारणं हासुद्धा खेळ चालू असतो. जर दोनतीन मुलं असतील, तर मग ती, त्यांच्या वाळूतल्या खेळांच्या वेगवेगळ्या कल्पना अमलात आणतात. कधी वाळूत त्रिकोण, चौकोन, कधी गोल, कधी चक्रव्यूह काढतात. वाळूचं सपाट मैदान तयार करतात. मग त्या सपाट मैदानाचं क्रीडांगण होतं. कधी चारही टोकांना गोल काढून, मधल्या चौकटी आखून एखादा कॅरमबोर्डसुद्धा होतो. कधी चारी रेषांत, मध्ये आडवी रेघ ओढून, व्हॉलिबॉलचं नेट तयार होतं. मग दोन गट पडतात. त्या दोन गटांत, छोट्याछोट्या खड्यांनी, शंखांनी, शिंपल्यांनी वेगवेगळे खेळ सुरू होतात. कधी इकडचा गट जिंकतो, आनंदानं उड्या मारतो. दुसरा गट निराश होतो. त्यांतले निर्णय चुकीचे आहेत म्हणून, भांडण काढतो. कधी त्यात त्यांच्यातलं कुणी किंवा कधी बरोबर आलेली मोठी माणसं, तडजोड घडवून

आणतात. प्रकरण मिटतं. खेळ पुन्हा सुरू होतो.

कल्पक असलेली मुलं मोठे खेळ खेळतात. त्यांत पहिल्यांदा वाळूखालून बोगदे तयार करणं. दोघा मुलांनी अंदाज घेऊन, खोल जाऊन वरची वाळू पडू न देता, खालच्या ओल्या वाळूपर्यंत जाऊन, हलकेच वाळू काढीत, असे बोगदे काढण्यातला आनंद घेतला जातो. ज्या क्षणी, त्या खोलवरून काढलेल्या बोगद्यात एकमेकांची बोटं एकत्र येऊन बोगदा पूर्ण होतो, तेव्हा त्यांना होणारा आनंद अवर्णनीय असतो ! तो पाहायला आईवडील, मोठी माणसं, आजूबाजूचे लोकसुद्धा कौतुकानं जमतात !

काही मुलांचं वाळूतली घरं, मनोरे तयार करण्याचं, एकापेक्षा दुसऱ्यानं मोठा आणि उंच मनोरा, घर तयार करण्याचं काम सुरू असतं. त्यांतल्या त्यात उंच घर, मनोरा तयार झाला की, करणारी मुलं टाळ्या वाजवतात. ज्यांना तेवढं जमलेलं नसतं, त्यांतली काही मुलं टाळ्या वाजवून, या मुलांच्या आनंदात सहभागी होतात. तर काही मुलं खट्टू होतात. काही खोडकर असतात, ती त्या मनोऱ्याला कुणाचं लक्ष नाही असं बघून, मागून अलगद धक्का देतात आणि तो पाडतात. मग कधी तो पडल्याचा आनंदही मुलं घेतात, तर काही मुलं चिडून जाऊन उरलासुरला मनोराही हातानं उधळून टाकतात. काही मुलांची वाळूतली घरं तयार होतात, बोगदे तयार होतात. मध्ये रेघोट्या मारून हे तुझं घर, हे माझं, हे त्याचं. मग कुणाचं अधिक छान झालं आहे, यावर त्यांच्या गप्पा होतात. तिकडं समुद्राला भरती असली, तर मनोरा, बोगदा, घरं - कुणाचीही आणि कितीही लहानमोठी असली, चांगली असली, नीट जमली नसली तरीही, समुद्रातून जवळ आलेल्या लाटेनं ती सारी सपाट होतात. वाळूत पुन्हा मिसळून जातात. खोलगट केलेल्या वाळूत थोडंफार पाणी भरून राहातं. थोडावेळ टिकतं आणि वाळूत मुरून जातं.

बाजूला बसलेल्या, बरोबर आलेल्या मोठ्या माणसांचे हे वाळूतले खेळ सुरू नसले तरी, तोंडं सुरू असतात. त्यात जुन्या आठवणी, पटल्या - न पटलेल्या गोष्टी चालतात. कधी, पुढं कायकाय करायचं यांच्या बेतांवर चर्चा होते. कुणाला फ्लॅट, कुणाला बंगला घ्यायचा असतो. त्याच्यावर विचार, मतं सुरू असतात. कुठल्यातरी मित्रमंडळींचे, नातेवाईकांचे विषय निघतात. दोघांना चांगल्या वाटलेल्या आठवणींचा आनंद मिळतो तर, एकाला आवडलेल्या आणि दुसऱ्याला न आवडलेल्या गोष्टींबद्दल मतभेद होतात. प्रत्येकजण आपलं

कसं बरोबर आहे, हे पटवण्याचा प्रयत्न करीत असतो. काहींच्या सासर-माहेरच्या, ऑफिसमधल्या व्यक्तींच्या वागण्यांवरून चर्चा सुरू असतात. या सगळ्यांत चांगले विषय चालतात, त्यावेळी नकळत बाजूच्या वाळूत, वेगवेगळ्या आकारांच्या हलक्या रेषा बोटांनी नकळत ओढल्या जात असतात. कधी कधी चर्चा तापत जातात, तशा याच रेषा वाळूत नकळत अधिक खोल, वेड्यावाकड्या ओढल्या जाऊ लागतात. शेवटी अंधार पडला म्हणून, विषय आहे तसेच टाकून, मुलांना हाका मारून परतीची वाट धरली जाते. त्याही बाबतीत, एखादी मोठी लाट येते. हलक्या असो, खोल असो, वाळूतल्या त्या रेषा पुसून लाट समुद्रात मिसळून जाते ! लहान मुलांना त्यांच्यापरीनं, तर मोठ्यांना त्यांच्यापरीनं,समुद्रकाठच्या वातावरणाचा फारसा लाभ न होता, झालेल्या सुखदुःखांचा विचार करीत माणसं घरी परततात !

वास्तविक, तिकडं क्षितिजापर्यंत पसरलेला समुद्र किती अथांग आहे, वरून तिथं टेकणारं आकाश किती विशाल आहे - अशा अनेक गोष्टी आपल्या मनावरची मळभटं दूर व्हावीत, म्हणून अनायास समोर आणि इतक्या जवळ मांडून ठेवलेल्या असतात ! आपण ज्या ठिकाणच्या किनाऱ्यावर बसलेले असू, तिथून समुद्रात बुडणारा तो जीवनदायी सूर्य, मावळताना आपला निरोप घेत असतो. एखाद्यानं मनापासून नमस्कार केला तरी, त्याकडं दुर्लक्ष होऊन त्यामागच्या भावाच्या आनंदाला मनुष्य पारखा व्हावा, तसा सूर्यानं केलेला निरोपाचा नमस्कार दुर्लक्षित राहतो. खरंतर, अशी संधी रोज येत नसते आणि त्यानं निरोप घेण्याऐवजी आपणच कृतज्ञतेनं त्याला निरोप तर द्यायचा असतोच, पण पुन्हा येऊन सूर्यानं आपलं जीवन सतेज, प्रकाशित करावं, अशी त्याला प्रार्थना करण्याची ती संधी असते ! आपण जर वेगळ्या किनाऱ्यावर बसलेले असू, तर याच समुद्रात, क्षितिजावरून अथांग पाण्यातून वर येणारा आणि आपल्याला सबंध दिवसाची प्रकाशमय सोबत देण्याची खात्री देणारा सूर्य, उगवतानाही पाहायला मिळतो. त्यावेळीही त्याचं स्वागत करण्याची आणि त्याला प्रार्थना करण्याची दुर्मिळ संधी येत असते !

पण, या साऱ्या वाळूतल्या रेघोट्या ओढणाऱ्या मुलांची आणि निष्फळ वादसंवादात अडकल्यामुळं मोठ्यांचीही, अशी दुर्मिळ संधी हुकते. तो समुद्र, त्यावर टेकलेलं विशाल आकाश आणि हा उगवता किंवा मावळता सूर्य - हा सारा आजचा आनंद आणि संधी 'आजच' असते. ती हुकते, त्यावेळेला

संधी आणि नुकसान कायमचंच असतं. कारण, ते सारं शाश्वत असेल,पुन्हाही येईल. पण आपलं 'आजचं' नुकसान भरून काढता येत नाही! हे सारं माहीत झालं, तशी संधी घेण्याचं महत्त्व कळलं तर, ते सारं जुळून येऊ शकतं. पण ते उद्या ! पुन्हा केव्हातरी, कदाचित कधीच नाही !

मुलांनी वाळूत रेघोट्यांनी जेजे केलं, तेच आपण आयुष्यात वेगवेगळ्या क्षेत्रांत करीत असतो. ते करण्यातली सुखदुःख भोगण्यात आयुष्य कधी निघून जातं, ते कळतही नाही. त्या गोष्टी कराव्या लागत नाहीत असं नसतं. पण काही कर्तव्यं, काही प्रारब्धं यांच्या त्या 'वाळूतल्या रेघोट्या' असतात, हे विसरायला झालं तर, आयुष्यभर सुखदुःख संपत नाहीत, ते खेळ आहेत हे लक्षात येत नाही ! मधेअधे येणाऱ्या लाटा, घरंदारं काय, राजेरजवाडे काय, सहज सपाट करून जाणारच असतात !

आनंदाच्या या संधी कुणालाही, कुठंही आणि कुठल्याही प्रकारे निसर्ग, ईश्वर निरंतर देत असतो ! त्या घेण्यासाठी ना फार खर्चवेच, ना कष्ट ! त्यासाठी आयुष्यातल्या अशा 'वाळूतल्या रेघोट्यांची' गरज, पण तो खेळ ओळखणारं, त्याला मनमोकळेपणे सामोरं जाणारं सावध मन लागतं ! मग त्यातूनच आनंदाच्या विश्वाचं द्वार उघडतं !

**

२०. गृहीत धरून जगताना..!

आपलं आयुष्य, अगदी दैनंदिन जीवनही अनेक गोष्टी गृहीत धरून-गृहीतकांवर चालतं. साध्या बोलीभाषेत आपण एखादी गोष्ट गृहीत धरून, मानून पुढचा व्यवहार करतो, तेच हे गृहीतक ! अशी गृहीतकं आपल्याला आयुष्यात मदत करतात, पण वेळी नुकसानही घडवून आणतात. बरं, ती अजिबात टाळावी तर तेही शक्य नसतं. म्हणून त्यावर थोडा विचार करूया.

गृहीतकं ही आपल्या मनात इतकी मुरलेली असतात की, ती वेगळी आठवून आपण कुठला व्यवहार करतो, अशातलाही भाग नाही. आपल्या व्यवहारांमागं अनेक गृहीतकं काम करीत असतात, हे विचार केला तर लक्षात येईल. त्यांच्याविषयी सावध नसल्यामुळं अनेकदा अनपेक्षित घटना, ठरलेली कामं न होणं, अपयश, समज-गैरसमज - अशा अनेक गोष्टींना ती कारणीभूत ठरतात. त्यामुळं हा विचार गरजेचा आहे.

ऑफिसमध्ये एखाद्याबरोबर अनेक वर्षं काम केलेलं असतं. स्वभाव माहिती असतात, विश्वास असतो. एकमेकांची कामं केलेली असतात. एखाद्या दिवशी आपण आजारपणामुळं घरी असतो. एखाद्या माणसाचा कामासाठी फोन येतो. त्याला माहिती असतं की, हे काम एरवी एकदोन दिवसांनी होईल. पण आपल्याला सांगितलं तर, आपण त्याची निकड लक्षात घेऊ आणि ते शक्यतो लगेच करू. आपण आज ऑफिसला जाणार नाही, हे कळल्यावर तो मनुष्य उद्या येतो, असंही सांगतो. पण ऑफिसमधले ते सहकारी काम करतील, हे गृहीत धरून आपण आत्मविश्वासानं सांगतो, 'तुम्ही काळजी करू नका. त्या अमक्यांना भेटा, मी नसलो तरी, मी सांगितलं आहे म्हणून सांगा, ते तुमचं काम अवश्य करतील.' तो मनुष्य उत्साहानं जातो. त्यांना भेटतो. पण त्यांचा प्रतिसाद तर लगेच मदत करण्याचा नसतोच. उलट 'उद्या या' या पद्धतीचा असतो. तो परत गेल्याचं कळतं. आपण एवढ्या खात्रीनं होईल म्हणून सांगितलेलं काम, सहकाऱ्यांनी केलं नाही, याचा थोडा रागही डोक्यातून जात नाही. त्यांची चूक आहे, असं पुन्हा पुन्हा वाटत राहातं.

मूळ चूक आपल्याकडंच असते. ती घडायला कारणीभूत असतं, ते 'त्यांचे आपले एवढे संबंध आहेत, तर ते हे काम नक्की करतील' हे 'गृहीतक' ! कालच नव्हे तर, कालपर्यंत जरी माणूस तसा वागला तरी, आज तो आपल्याशी, इतरांशी तसाच वागेल, असं आपण गृहीत धरतो ! ते खरं ठरलं नाही म्हणून त्रास होतो. हे एवढंच नाही तर, कालपर्यंत जरी माणूस आपल्याशी जसा वागला, तसाच तो आज वागेल, असंही गृहीत धरण्यात अर्थ नसतो. कदाचित, त्याची आजची भूमिका वेगळी असू शकते. त्याची कारणं तशी संधी असली किंवा पारदर्शकता असली तर, आपल्याला काहीवेळा कळतात. पण अनेकदा ते घडत नाही आणि समजगैरसमज मनात मूळ धरतात, ते एका खोल रुतलेल्या काट्यासारखे. कधी विरघळले, कधी प्रसंगानं निघाले तर, पुढं तो त्रास कमी होऊ शकतो. पण ते घडलं नाही तर, आतच राहिलेला काटा नुसतं कुरूपच निर्माण करीत नाही तर, कायम सलत राहणारं दुःखही आपल्यामागं लावून देतो !

याच उदाहरणात थोडं पुढं गेलं तर, असंही घडू शकतं की आपण सांगूनही त्या सहकाऱ्यानं आपल्या माणसाचं काम केलं नाही, याची त्याला जाणीव असते ! कधीतरी तो ती जाणीव, क्षमा मागून चांगल्या शब्दांत व्यक्तही करतो. त्यानं तशी वेगळी भूमिका का घेतली, याचीही आपल्या लक्षात न आलेली कारणं, तो आपल्याला समजावून सांगतो. त्यांत पूर्वी त्या व्यक्तीचा त्याला चांगला अनुभव आलेला नसतो, कुठं कधी त्याची अरेरावी, स्वभाव, झालेली फसवणूक - अशा काही गोष्टी त्याच्या लक्षात असतात. कधीकधी काही कारणं तशी साधी असतात. पण प्रत्येकाच्या स्वभावाप्रमाणं ती मनावर घेतली जातात. असंही कळतं की, ते सहकारी तिथं असताना, काम करायला तयार असतानासुद्धा, त्यांना डावलून ती व्यक्ती दरवेळी आपल्याकडं येते, एवढंसंही कुठं त्यांच्या मनात राहून गेलेलं असतं ! अशी विघातक गृहीतकं टाळण्यासाठी, ते तुमचं काम करतील असं आत्मविश्वासानं म्हणण्याऐवजी, कुठलं गृहीतक मनाशी न धरता, 'त्यांना भेटून विनंती करा, वाटलं तर मी फोन करतो, काम होतंय का पहा !'-असं मोकळेपणानं सांगितलं तर, पुढचा बराचसा त्रास वाचेल !

माणसं जर आणखीच बेसावध असतील, गृहीतकांच्या या दुसऱ्या गफलती घडवण्याऱ्या बाजूची त्यांना कल्पना नसेल तर, अशी माणसं ठामपणे

हे काम होईल, ते घडेल, तुम्ही अमक्यांना भेटा, ते काय सहज होईल - असं म्हणताना आणि तशा समजुतीत वावरताना आपल्याला दिसतील. असली गृहीतकं ही अर्थातच, अनेकदा भ्रामकच असल्यामुळं खरी ठरत नाहीत. त्या माणसाची निराशा होतेच, पण त्यांचा आपल्या शब्दांवरचा विश्वासही उडायला ती कारणीभूत ठरतात. गृहीतकांच्या बाबतीतल्या या दोन्ही बाजूंचं खरेपण आपण आपल्या, इतरांच्या आयुष्यातल्या घटनांवरून जरूर तपासून घेऊ शकतो!

मग गृहीतकांशिवाय जगलं तर चालेल का ? तर तेही तसं पूर्णपणे शक्य नाही. आधी म्हटलं तसा, आपला बराचसा व्यवहार एकप्रकारे गृहीतकांवर चाललेला असतो. म्हणजे असं की, जगताना काही अनुभव येतात. त्यानुसार विचारांचा आकार तयार होतो. तो स्मरणात राहतो. त्यावरून स्वाभाविकच, आजच्या किंवा भविष्यातल्या गोष्टी आपण ठरवतो. हे लक्षात घेण्याची गरज आहे की, त्यांतले काही भाग तांत्रिक असतात. तशा स्वरूपाची गृहीतकं आज किंवा भविष्यातही उपयोगी पडू शकतात. एक अधिक एक किंवा पाच गुणिले चार हे शिकल्यावर, मेंदूनं साठवलेलं उत्तर पुढं बदलत नाही, त्यानुसार सोडवत गेलेली किचकट गणितांची उत्तरंही बरोबर येतात, अपेक्षेप्रमाणं असतात.

अधिक पाहिलं तर, माणसाचा इतर संबंधातला व्यवहार, मंडईतल्या नेहमीच्या भाजीवाल्याकडून येणाऱ्या भाजीच्या बिलाचा अनुभव, त्यातलं गणित गृहीत धरल्याप्रमाणं बरोबर येतंच, पण पूर्वीप्रमाणेच आजच्या भाजीचा दर्जा तसाच असेल, असं गृहीत धरणं कदाचित चूक ठरू शकतं. कमी दर्जाची भाजी मिसळली जाऊ शकते, दुसरी एखादी भाजी आपल्याला नको असली तरी, शिल्लक आहे म्हणून, तिची भलावण करून आपल्या पदरात टाकली जाऊ शकते. एरवीचा त्यांच्याशी असलेला व्यवहार गृहीत धरण्यावर बरोबर चालला असला तरी, त्यांची मर्यादा लक्षात घेऊन, त्यांच्या अडीअडचणी आणि आपली सावधानता यांचा मेळ घालावा लागतो.

घर बांधायला निघाल्यावर ते अमुक दिवसांनी पण पूर्ण होणार, वर्षाअखेर परीक्षा होणार, अभ्यास केला की पास होणार, चालायला लागल्यावर आपण ठरलेल्या ठिकाणी पोचणार, विशिष्ट पैसे मिळाले की पुरणार - अशा असंख्य गृहीतकांवरच आपला व्यवहार रोज करता येतो. ती गृहीत न

धरली तर, व्यवहारही अवघड होईल. जगण्याला, व्यवहाराला गृहीतकांची गरज आहे, तशीच त्यांच्या मर्यादा ओळखण्याचीही आहे !

आकाशात काळे ढग आले. आता पाऊस पडणार, हे जरी काही पूर्वीच्या अनुभवांवरून गृहीत धरलं असलं तरी, पुढची जी पळापळ - कामांतले घाईगर्दीचे बदल आपण करतो, ते तसे करावे लागतीलच, असं नसतं. कारण, गृहीतकांच्या पलीकडे निसर्गही वागू शकतो आणि माणूसही ! हे लक्षात असेल तर, मनुष्य दोन्ही गोष्टींच्या तयारीत राहील पण, गोंधळून चुका करणार नाही, धावपळ उडवणार नाही, अस्वस्थ होणार नाही. कारण, जोराचा वारा सुटून काही वेळात ते सारे ढग निघून जातात. पाऊसही पडत नाही. तसंच, आज माणूस चांगला आहे, उद्या असेल पण असेलच असं नाही, हे जसं खरं, तसंच तो आज वाईट आहे म्हणून उद्या वाईट असेल असंही नाही ! तीच गोष्ट कामं, व्यवहार, संबंध, नातेवाईक, आयुष्यातल्या घटना - अशा असंख्य बाबतीत असते.

आपल्याला जगताना गृहीत धरण्याची गरज आणि त्यांच्या मर्यादा यांची जर सतत सावध जाणीव असेल तर, आपण स्वस्थ राहू शकू. कुठलीही गोष्ट शांतपणे घेऊ शकू !

**

२१. रेंगाळणारे प्रवासी..!

प्रवास करणं नवीन नाही. लहान मुलांनाही ते कळतं. लहानपणी या प्रवासाच्या कल्पना ढोबळ स्वरूपाच्या असतात. आपण आपल्या गावाहून कुठल्यातरी दुसऱ्या गावाला जाणं, एवढीच ती कल्पना असते. फक्त फरक होतो, तो त्यांच्यादृष्टीनं कधी नातेवाईक, कधी मित्रमंडळी, कधी देवस्थान तर कधी एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जाणं. दुसरी एक कल्पना त्यांना असते, ती म्हणजे आपल्या प्रवासासाठी वापरली जाणारी वाहनं, त्यांचे प्रकार. त्यांना पायी जाण्यापासून सार्वजनिक वाहनं, कधी रेल्वे, कधी विमान ! त्यात्या वाहनाच्या गतीप्रमाणं आपण सावकाश जातो, कधी जलद जातो.

पण आपण अशी काही दृश्यं पाहिली आहेत का ? किराणा दुकानात काही माणसं जातात, त्यांना काही वस्तू घ्यायच्या असतात. तिथं गेल्यावर ज्या काही दोनचार वस्तू असतील, त्या ती माणसं दुकानदारांना सांगतात. हे सगळं होत असताना, त्या वस्तू मिळेपर्यंत त्यांचं दुकानात इकडंतिकडं सहजच लक्ष जातं. तिथं अजून अनेक वस्तू त्यांना दिसतात. काही माहितीच्या, काही नवीन. मूळ वस्तू घ्यायचं काम दहा मिनिटांत झालेलं असतं. पण, त्या माहितीच्या वस्तू समोर दिसल्यावर, त्यांना त्याविषयीची पूर्वीची आठवण होते. कुठली, कशी, कधी, किती घेतली, तिचा उपयोग तेव्हा कसा झाला - यांवर त्यांच्या डोक्यात विचार सुरू असतात. नंतर नवीन वस्तूंचा विचार सुरू होतो. त्या नवीनच असल्यामुळं त्या कधी निघाल्या, त्यांचा उपयोग, त्यांच्या किंमती - हे माहीत नसल्यामुळं, त्या वस्तूंविषयी तिथल्या माणसांकडं चौकशी सुरू होते. काही वस्तूंचा उपयोग होईल की नाही, घ्यावी की न घ्यावी - अशा विचारात या गिऱ्हाईकांचा वेळ जातो. बहुतेक वेळा एखादी वस्तू घेतली जाते, उरलेल्या घेतल्याही जात नाहीत. मग हळूहळू घड्याळाची आठवण होते. बिल देऊन बाहेर पडेपर्यंत आता अर्धातास उलटून गेलेला असतो. ते लक्षात येतं. तरीसुद्धा, दुकानाच्या पायऱ्या उतरताना, न घेतलेल्या नवीन वस्तूंकडं ते नकळत मागं वळून बघतात. साहजिकच, पायऱ्याही सावकाश उतरल्या जातात !

आपण असंही पाहिलं असेल की, अनेकांची हीच अवस्था कापडदुकानात झालेली असते. पंचवीस साड्या पहा की वेगवेगळे ड्रेस, ड्रेसमटीरिअल..! काय एकदोन घ्यायचे ते ठरले, तिकडं बिल करायला वस्तू गेल्या, तरी इकडं अजून काही नमुने पाहात, अशी मंडळी रेंगाळत असतात. बिगबझार, मॉलमध्ये यापेक्षा वेगळी परिस्थिती नसते. तिथं तर, मूळ ठरलेल्या वस्तूंपेक्षा, रेंगाळत रेंगाळत पाहात चाललेल्या वस्तूंची संख्याच अनेकदा जास्त होते. त्यांतलं काही विशेष खरेदी होतं, असंही नाही. खरेदी झालंच, तर वेळ दिला, दिसलं, रेंगाळत राहिलं म्हणून !

विचार करावा की, हे काही कुठल्या दुकानापुरतं, खरेदीपुरतं असतं असं नाही. कित्येक ऑफिसमध्ये निर्णयासाठी फायली रेंगाळत असतात. त्या संपवायच्याही असतात. त्या विचारानं एखादी फाईल पुढं ओढली जाते. चाळून, विचार करून काही निर्णयावर येऊन, पुन्हा सरकवून ठेवली जाते. हे एकदोनदा होतं. मग मध्येच दुसरी कुठलीतरी फाईल, विषय अधिक महत्त्वाचा वाटतो. मग ती फाईल पुढं घेतली जाते. पुन्हा ती चाळून विचार करून बाजूला ठेवली जाते. तसा निर्णयाला येण्याइतपत विचार झालेला असतो. पण ही फाईलसुद्धा अशीच रेंगाळते.

आपण विचार करू की, याची खरोखरच गरज असते का ? अनेकदा ती नसते ! उलट आधी म्हटलं तसं, जर एखादी वस्तू जरूरी वाटली, नवीन दिसली तर ती घेणं गरजेचं असतं. तो निर्णय अमलात आणण्यानं उलट तो विषय संपतो. वस्तूचा उपयोग, वापर सुरू होतो. कपडालत्ता, रंग, प्रकार यांची निवड झाली, तो घेतला, की ते काम पुढं दहापंधरा मिनिटांत संपणारं असतं. कदाचित, एखादी गोष्ट नंतर घ्यायचीही ठरवता येते. पण तेही काम त्या पाचदहा मिनिटांत होऊ शकत असतं ! तीच गोष्ट अशा फाईलच्या बाबतीतही असते. निर्णय झाला असला तर, त्यावर तो नोंदवून, ती फाईल हातावेगळी होऊ शकते. त्या विषयासंबंधित लोक - कामंही पुढं मार्गी लागतात. जिथं त्रुटी आहे, कागदपत्रांची गरज आहे, तिथंही तशा त्रुटी नोंदवून, कागद मागवून घेऊन, ते काम पुरं होऊ शकतं. त्या मार्गानंसुद्धा असं रेंगाळणं टाळता येतं !

असा विचार आपण करीत गेलो तर जरूर लक्षात येईल की, कधी शाळा-महाविद्यालय प्रवेशांचे विषय असोत, विद्याशाखेची निवड असो, प्लॉट-घरं यांची निवड आणि खरेदी, विवाहांच्या बाबतीत वधू-वर, कार्यालय-

आचारी, पदार्थ-अशा बाबतींतही अनेकांचे निर्णय, महिनामहिना रेंगाळत असतात. त्यानं काही साध्य होतं असं म्हणावं तर, तसंही दिसत नाही. उलट, जेवढे दिवस मध्ये जातात, तेवढे पर्याय, माणसं, त्यांची मतं, ओघानंच मग मतभेद, अकारण समजगैरसमज, मानअपमान - अशा नकारात्मक गोष्टींना वाव मिळतो. त्यात कधी कुणाची आपल्याला डावलल्याची भावना वाढते. यांत जे घडतं, ते खरंतर अनेकदा या रेंगाळण्यामुळं होतं. यांतल्या प्रत्येक बाबतीत, निर्णयासाठी वेळ देण्याची गरज जरूर असते. रेंगाळलं तरी, नाही रेंगाळलं तरी! मध्ये जाणाऱ्या आणि बरेचदा अकारण असलेल्या या वेळामुळं, घडणाऱ्या गोष्टींना तर विलंब होतोच. पण, संबंधित लोकांचा वेळ, संभाषणं, कधी मिळालेल्या जादा वेळामुळं पर्याय, वादविवाद, खर्च, मनःशक्ती - अशा अनेक गोष्टींचा अपव्यय होतो !

मूळ शिक्षण झाल्यानंतर पुढं कुठं, किती शिकावं, नोकरीच्या संधींपैकी कुठली संधी स्वीकारावी - अशा आयुष्यातल्या अनेक बाबतीत, लोक रेंगाळताना आपल्याला दिसतील. घाईगडबडीचे दुष्परिणाम उघड असतात, ते तर टाळावेतच. पण, रेंगाळण्याचे दुष्परिणाम त्यांच्यापेक्षा जास्त असतात. अकारण कुठल्या बाबतीत घाई करू नये, हे रास्तच आहे ! त्यामुळं, आर्थिक नुकसान, अपघात, फसवणूक - अशा गोष्टी घडू शकतात. पण, यांतल्या कुठल्याही बाबतीत त्यालात्याला द्यायचा वेळ, हा त्या कामाशी सुसंगत असावा लागतो. कुठलीही गाडी चालवताना, तिच्या प्रकाराप्रमाणं गाडी चालवण्याच्या गतीचे अनिष्ट, इष्ट आणि अति असे प्रकार, गतीचा काटा नेहमी दाखवीत असतो. अनिष्ट म्हणजे, खूप कमी वेगानं गाडी चालवणं, हे गाडीलाही मानवत नाही. तसंच, अतिवेगानं चालवणं हेही गाडीलाच काय, आपल्यालाही धोक्यात आणतं. तेच गाडीच्या प्रकाराप्रमाणं इष्ट असलेल्या मध्यम गतीनं चालवणं, गाडीही चांगली ठेवतं, धोके टळून ठरल्या ठिकाणी पोचणंही वेळेत घडतं !

हे जसं गाडीच्या प्रकाराप्रमाणं ठरतं, तसं आयुष्यात रेंगाळणं, आपल्याला वेळच्यावेळी योग्य ठिकाणी पोचण्यात उशीर, त्यामुळं गैरसोय, त्रास - अशा अनेक बाबतींत नुकसानकारक ठरतं. ते टाळलं, कामांना द्यायचा वेळ जर योग्य दिला, तर अशा लोकांच्या आयुष्याच्या गाड्या, इच्छित ठिकाणी योग्य वेळी पोचतात ! सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं आपण प्रवासी आहोतच, पण आयुष्याच्या एका दीर्घ वाटेवरचे ! हे लक्षात ठेवावं. नाहीतर, रेंगाळणाऱ्या

लोकांच्या आयुष्याच्या गाड्या, एखाद्या लेट - उशीर करीत जाणाऱ्या रेल्वेसारख्या, आयुष्यातल्या साध्यासुध्या गोष्टींपासून, महत्त्वाच्या घटनांच्या टप्प्यांवर लेटच होत जातात !

कारण, प्रत्येकाच्या आयुष्यासाठी वेगळं घड्याळ नसतं ! तसा वेळ मर्यादित आणि अनिश्चित असतो. त्यात जर आपण अशी आयुष्याची गाडी, साध्यासाध्या खरेदीसारख्या गोष्टींपासून, महत्त्वाच्या घटनांतल्या निर्णयांपर्यंत रेंगाळत चालवली तर, दिलेला वेळ मर्यादित असल्यामुळं, तो तर वाया जातोच, पण आयुष्यात खऱ्या महत्त्वाच्या असलेल्या, अनेक गोष्टी करायच्या राहून जातात. मग उत्तरं येत असूनही, वेळ संपली म्हणून, हातांतला पेपर काढून घ्यावा आणि अपयश यावं, तसा आपल्या मोलाच्या आयुष्याचा पेपर, काळ आपल्या हातून काढून घेतो !

तसे आपण सारेच 'जगातले प्रवासी' आहोत, पण 'रेंगाळणारे प्रवासी' नसावं, हे चांगलं !

**

२२. अनुकूल-प्रतिकूल !

माणूस कामं हातात घेताना अनेक गोष्टी पाहातो. त्यांतली महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या कामांसाठीत्याला असलेली अनुकूलता किंवा प्रतिकूलता. हे स्वाभाविक वाटतं, की अनुकूलता असली, तर ती कामं हातात घेणं योग्य असतं. ती यशस्वीही होतात. अर्थातच प्रतिकूलता असल्यास ही कामं नडतात, होत नाहीत, अपयश येतं. ही सर्वसामान्य कल्पना. पण ज्यांना अधिक विचार करायचा आहे, आयुष्यात अनेक विधायक कामं करायची आहेत, जगाला काही देऊन जायचं आहे - त्यांनी या 'अनुकूल-प्रतिकूलते'चा एक वेगळा विचार केलेला असतो. त्यामुळं त्यांचं ध्येय ते साध्य करून जातात. असंख्य मोलाची कामंही उभी राहतात. तसा तो दृष्टिकोन कुणालाही, कधीही, कुठंही उपयोगी पडणाराच आहे, म्हणून त्यावर विचार करू.

एखाद्या महत्त्वाच्या कामासाठी अचानक दीर्घ पल्ल्याचा प्रवास करायचा असतो. तो न झेपणारी कुणी वृद्ध, आजारी व्यक्ती बरोबर असते. एवढ्या पल्ल्यापर्यंत जाणारी सरकारी, खासगी गाडी नसते, असली तरी त्यातून प्रवास करणं शक्य नसतं. विमानाची सोय नसते. एकमेव पर्याय रेल्वेचाच असतो.

आपल्या मुक्कामापर्यंत जाणारी नसली, तरी जवळपासच्या स्टेशनपर्यंत जाणारी रेल्वेही असते. तिला जोडून दुसऱ्या रेल्वेनं या लांब पल्ल्याच्या गावी पोचणं शक्य असतं. पण आपलं हे सारं ठरेपर्यंत दुपारचे तीन वाजतात. रोज जाणारी ही रेल्वे दोनची असते. स्टेशनवर फोन करून पाहिलं, तर ती गाडी नियोजित वेळी निघूनही गेलेली असते. जाणं निकडीचं आहे, पण परिस्थिती प्रतिकूल आहे, असं वाटून माणसं अडकून बसतात.

पण कुणीतरी हे अनुकूल-प्रतिकूलचं गणित जाणणारी अनुभवी व्यक्ती तिथं असते. ती सुचवते, की पुन्हा आपण स्टेशनवर एक फोन करून बघू. ते फोन करतात. 'आम्हाला अमुक गावी जायचं आहे. त्याला काही पर्याय आज आहे का ?' स्टेशनमास्तर क्षणभर विचार करतात आणि सांगतात,'आज

मंगळवार आहे, त्यामुळं ते शक्य आहे. तुम्हाला अपेक्षित असलेल्या गावाच्याही पुढं जाणारी थेट एक्स्प्रेस पाचला आहे. ती आठवड्यातून फक्त दोनदा मंगळवार-शुक्रवार येते. ती इथं थांबते. तिला इथं पाच सीटचा कोटाही आहे. तुम्ही लगेच आलात तर ती गाडी मिळू शकते!'

प्रतिकूलतेत नेहमी अनुकूलतेसाठी दारं ठोठवावी लागतात. तळमळीनं कुठलं ना कुठलं नक्की उघडतं. अडलेली गाडी मार्गस्थ होते ! हे ठाऊक असलेल्यांनी यात नेमकं तेच केलं. त्यामुळं माणसं ठरलेल्या ठिकाणी वेळेआधी पोचली, काम झालं.

अनुकूलतेत कामं होतात, हे सामान्यतः खरंच आहे. पण सगळ्याच बाबतीत, सगळ्यांनाच सर्व अनुकूलता असतातच असं नाही आणि त्या असल्या म्हणजेच कामं होतात, प्रगती होते, यश येतं असंही नाही. आपण राज्याच्या, देशाच्या पातळीवरच्या स्पर्धापरीक्षांचे निकाल पाहिले असतील.

प्रसिद्ध शहरं, महानगरं यांतली काही नावं त्यात असतात, हे आपण समजू शकतो. पण अनेकदा निम्मी नावं अशा गावातली असतात, की जी गावं आपण नावानंही ओळखत नाही आणि नकाशावरही पटकन सापडत नाहीत. अशा प्रतिकूल गावी असल्या राष्ट्रीय पातळीवरच्या शिक्षणासाठी लागणारी अनुकूलता किती असेल याची आपण कल्पना करू शकतो.ती नसतानाही अशा गावांतल्या मुलांची नावं या यादीत झळकतात, अशा प्रसंगी अनुकूलतेचं आणि प्रतिकूलतेचं गणित काही वेगळं आहे, हे लक्षात यायला हरकत नाही !

शहरातल्या घरी स्थैर्य, प्रोत्साहन अशा अनुकूलता असलेल्या विद्यार्थ्यांना किंवा स्पर्धकांना त्याप्रमाणात यश मिळत नाही. उलट, सामान्य परिस्थितीत घरी अशिक्षित किंवा अर्धशिक्षित पालक, आर्थिक अनुकूलता बेताची, मार्गदर्शनाचा-प्रोत्साहनाचा अभाव - अशा प्रतिकूलता असलेल्या विद्यार्थ्यांना,स्पर्धकांना अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळताना दिसतं.

तेव्हा लक्षात येतं की, यशाचं आपण गृहीत धरलेलं नातं साऱ्या वातावरणाच्या अनुकूलतेपेक्षा प्रतिकूलतेशी जास्त जवळचं आहे ! याचा अर्थ अनुकूलता नसावी, असा नक्कीच नाही. अनुकूलता यशाला पूरक असते. पण प्रतिकूलता यशाच्या आड येतेच असं नाही, याची ओळख असावी !

कारण अनुकूलतेत यशासाठी लागणाऱ्या कष्टांना वातावरण, साधनं, मदत, मार्गदर्शन - या गोष्टी मिळत असल्या, तरी त्यामुळंच दुसऱ्या बाजूला

यश सोपं असल्याची भावना, बेसावधता, त्यामुळं आवश्यक कष्टांकडं दुर्लक्ष, अवलंबून राहाण्याची सवय, अनुकूलतांमुळं आपण हे कधीही सहज गाठू शकू, असं वाटण्यानं जाणारं प्रयत्नांतलं सातत्य - असे अनेक घटकही नकळत दाखल झालेले असतात.

प्रतिकूल परिस्थितीत मात्र प्रत्येक क्षण, दिवस मोलाचा असतो. अवलंबून राहाण्यासारखं कुणीच नसतं. त्यामुळं स्वतःला सतत सावध राहावं लागतं. पैसा-मार्गदर्शक-मदतनीस-लागणारी साधनं - अशा प्रत्येक गोष्टीसाठी सतत धडपड करावी लागते. कुणाकडून अशी मदत झाली, तर निकरानं, सातत्यानं अभ्यास करून, त्याचं ऋण फेडण्याची निकड लागते. यशाच्या प्राप्तीसाठी कष्ट करण्याची एक दुर्दम्य इच्छा सोडता, अनुकूलतांचे सर्व दोर, प्रतिकूल परिस्थितीत कापलेले असतात. त्यामुळं प्रतिकूलतेत लढाई निकराचीही होते आणि त्यामुळं ती अनेकदा यशस्वीही होते !

आयुष्याच्या इतर अनेक क्षेत्रांतही अनुकूलतेची गाडी येईल, म्हणून थांब्याथांब्यावर तासन्‌तास नव्हे, तर ध्येयानुसार वर्षानुवर्षं वाट पाहाणारे लोक आपल्याला भेटतील. विशिष्ट क्षेत्रांत नोकरी, अनुकूल स्थळ - अशासाठी थांबणारे लोक वाटेत आलेल्या अनेक संधी सोडतात.

विशिष्ट गावी बदली झाली, की मग आपली योग्यता दाखवून देणारं काम आपण करू, म्हणून आहे त्या गावी दिलेलं कामही उत्तम न करणारे लोक, संगीतात विशिष्ट गुरूंकडे किंवा विशिष्ट वाद्य शिकायची अनुकूलता येईल त्यावेळेलाच शिकू, म्हणून अडून बसलेले लोक, विशिष्ट वातावरणात-गावी-ठिकाणी आपली साधना उत्तम होणार म्हणून, सध्या आहे त्या जागी जमू शकणारं साधनही न करणारे लोक - असे अनेक लोक असलेल्या अनुकूलतेचाही लाभ घेऊ शकत नाहीत.

मग ते त्याच थांब्यावर खोळंबून राहातात. प्रतिकूलतेत काम करण्याचा सराव असलेले लोक मात्र अडून न बसता, रस्ता पकडून देवानं दिलेल्या पायातली अनुकूलता ओळखून, तोवर वाटेतले कित्येक थांबे ओलांडून पुढल्या गावी गेलेले असतात.

यशाची अवचित सुटणारी गाडी, या वाटेत खोळंबून बसलेल्या लोकांच्या स्टॉपवर न थांबता, कष्टानं पुढं गेलेल्या त्या लोकांच्या गावी हमखास थांबते आणि त्यापुढं त्यांना घेऊन जाते. असलेल्या पदार्थात कोंड्याचा मांडा

करणारे लोक प्रतिकूलतेतही पोट भरतात, विश्रांती घेतात आणि कामाला लागतात. तेल, मीठ, मोहऱ्या, मसाले यांची वाट पाहात बसणारे, स्वतः उपाशी राहातात आणि इतरांनाही उपाशी ठेवतात. प्रतिकूलतेतल्या तडजोडीचं, यशाचं आणि अनुकूलतेतल्या अपयशाचं,दुःखाचं गणित - हे असं काही वेगळंच आहे.

अनुकूलतेत, असलेल्या अनुकूलतांपेक्षा, दुर्दैवानं असलेल्या प्रतिकूलतांवर जास्त विचार होऊन, मनुष्याचं काम अडखळतं, थांबतं. प्रतिकूलतेत ती जाणवत असते, गृहीत असते. त्यामुळं तिच्यावर फार विचार न होता, असलेल्या थोड्याशा अनुकूलतेवरही पुढं कसं जावं, याचा विचार होतो. मार्ग निघतो. वाटचाल होते.

प्रतिकूलतेत मदतीसाठी प्रत्येक दरवाजा ठोठावण्याची नम्रता आणि प्रयत्न असतात. पेपर अवघड असला तरी वर्गातल्या सर्वांना सारखाच वाटला जातो. प्रतिकूलतेतही काम करण्याची वृत्ती असलेल्याचं लक्ष, त्यांतल्या जमणाऱ्या प्रश्नांकडं असतं. ते सोडवून पास होण्याची किमान तरतूद करण्याकडं असतं. उरलेलं काम त्यामुळं सोपं होतं.

अनुकूलतेचीच सवय असलेल्याला मात्र, सगळेच प्रश्न अपेक्षेप्रमाणं सोपे नाहीत, असं वाटून ते अवघड होऊन बसतात. त्यामुळं नेहमी अनुकूलतेची, उत्तम गुणांची सवय प्रतिकूलतेत काम करण्याच्या आड येते. प्रश्न अवघड असले, तरी त्यांतले सोपे असलेले प्रश्न आधी सोडवून घ्यावे, हा विचार मनात येत नाही. तो विचार मनात आला, तर अनेकदा पासिंगची किमान तरतूद करता येते. नंतर उरलेल्या वेळेत इतरही प्रश्न सोपे आहेत, हे लक्षात येतं. ते सोडवून खरंतर पुढच्या वर्षाची वाटचाल करणं शक्य असतं. पण, अनुकूलतेची सवय नडते, त्यामुळं पुढच्या वर्षाकडं वाटचाल करण्याऐवजी, गॅप घेऊन पुढच्या वेळी चांगले गुण मिळवून, पुढं जाऊ अशाही घातक निर्णयाकडं जायला होतं.

आपल्या मनाच्या दृष्टिकोनावर आयुष्याची आनंददायी, यशस्वी वाटचाल खूप अवलंबून आहे. आपलं गाव एक मैलावर आहे. अंधारात हातात असलेली विजेरी-बॅटरी दहा फुटापर्यंतची वाट प्रकाशित करते. जागेवर बसून विचार केला, तर त्या बॅटरीनं एक मैलपर्यंतची वाट दिसणं अशक्य आहे, या दृष्टिकोनाचा माणूस आहे तिथंच थांबतो. पण आहे त्या प्रकाशात दहा फूट तरी

चालू, या दृष्टिकोनाचा माणूस चालू लागतो. पुढचे दहा फूट, त्याच बॅटरीच्या प्रकाशात दिसतात आणि असं करत तो मनुष्य एक मैलापर्यंतच्या गावी पोचतो!

तशा अर्थानं परिस्थितीचा नीट विचारकरणं गरजेचं आहे. परिस्थिती प्रत्येकाच्या वाट्याला आहे. परिस्थितीतले फरक हे असणारच. पण हे लक्षात घ्यावं की, परिस्थिती फक्त 'असते'! आपल्याला अशी दृष्टी असेल, तर ती 'अनुकूल बनते-प्रतिकूलही' !

निवड आपली आहे. तरीही यशासाठी, आनंदासाठी लागणारी निवड उघड आहे !

**

२३. स्वतंत्र अस्तित्व..?

मूल संध्याकाळी शाळेतून घरी येतं. त्यावेळी आपल्याकडं पाहुणे आलेले असतात. त्यांच्यातलं त्याच्याबरोबरीचं पहिली दुसरीतलं मूल घरातल्या खेळण्याच्या लाकडी घोड्यावर बसून खेळत असतं. आत आल्यावर डबा-दप्तर ठेवलं की, मुलाचं त्याकडं लक्ष जातं. ते लगेच त्या खेळण्यातल्या घोड्यावर बसलेल्या मुलाच्या हातांतला घोडा हिसकावून घेतं. घरातले त्याचे आईवडील आपल्या मुलाला बाजूला करायचा प्रयत्न करतात, कधी डोळ्यानं दटावतात, 'खेळू दे की त्याला', असं म्हणतात. सहसा मूल ऐकत नाही. ते त्या घोड्याजवळच हटून बसतं. ते म्हणत असतं, 'हा घोडा माझा आहे.' मूल हट्टी असलं आणि आलेल्यांनी, त्यांच्या मुलाला तो घोडा सोडून द्यायला सांगितला, तरी तेही तसंच बसून राहातं ! मग बहुधा दोघाही मुलांना रागावलं जातं. चिडचिड, रडारड होते.

एरवी रोजही हे घरातलं मूल काही आल्याआल्या लगेच ते खेळणं खेळतं, असं नाही. त्याचं ते खेळणं हे रिकामं राहिलं तरी एरवी त्याला चालतं. पण, ते 'त्याचं स्वतंत्र खेळणं' असतं आणि त्याला ते तसंच हवं असतं ! शाळेतही अनेकदा, ही विशिष्ट बाकड्यावर, विशिष्ट ठिकाणी बसण्याची प्रवृत्ती, शिक्षकांना अडचणीची होऊन, एकतर त्यासाठी शाळेला काही नियम करावे लागतात, सक्ती करावी लागते. कारण त्यांच्या त्या जागा स्वतंत्र आणि ठरलेल्या असाव्या, असं त्यांना वाटतं.

बालपणी उपडं वळणारं लहान मूल केव्हा एकदा रांगायला लागेल आणि आपण स्वतंत्र होऊ, याची आई वाट पाहाते. ते रांगायला लागतं, त्याचा आनंद होतो. तोवर ते रांगल्यामुळं वस्तूंची ओढाओढी करतं. त्या विस्कटतं, कागद फाडतं. रांगतारांगता वस्तूंना डोकं आपटून भोकाड पसरतं. तरी आईला पुढं वाटतं, हे एकदा पायांवर उभं राहून स्वतंत्रपणे चालायला लागलं की, याच्यामागं हिंडावं लागणार नाही. त्याचा त्रास कमी होईल, उलट ते आपल्याला वस्तू न्यायला-आणायला मदत करील. त्यांतलं ते काही करतंही,

पण आता उंच आणि स्वतंत्र झाल्यामुळं, ते इतर उलाढालही करतं. टीव्ही लावतं, कपाटावरचा गेम काढतं, घरातून बाहेर पडून रस्त्यावर जातं. त्यालाही खेळात स्वातंत्र्य हवं असतं. त्याची तीनचाकी सायकल घेऊन, त्याला आता मोठ्यांसारखं रस्त्यावरून 'स्वतंत्रपणे' जायचं असतं.

एका मर्यादेपर्यंत त्याचं स्वतंत्र होणं, मोठं होणं आनंदाचं वाटतं. पण दुसऱ्या बाजूला, आता त्याचा त्रास सुरू होतो. पुढं तोल सांभाळायला आल्यावर दुचाकी सायकल येते. त्याच्या दुचाकी सायकलच्या बरोबरीनं आपण रस्त्यावरून पळावं किंवा छोटी दुचाकी त्याच्या बरोबरीनं चालवावी, असं त्याला वाटतं. सायकल हातात आली की, 'माझं मी येतो, तुमचं तुम्ही गाडीवरनं या' असं सांगणं सुरू होतं, जे ऐकण्याला आता फार पर्याय उरत नाहीत. शिकतानासुद्धा त्याला त्याच्यापद्धतीनं त्याच्या बरोबरीच्या मुलामुलींनी निवडलेल्या शाळेत, क्लासला जायचं असतं. हे करीत असताना, मुलाला शिक्षणापेक्षा, आपण आता त्या निमित्तानं आठदहा तास स्वतंत्रपणे बाहेर राहू शकतो, याचा नकळत आनंद असतो. त्याला वाटतं की, एकदा हे शिक्षण संपलं आणि आपल्याला नोकरी लागली की, आपण 'खरे स्वतंत्र' होऊ, आईवडिलांच्या बंधनांपासून मोकळे होऊ.

नोकरीला लागतानाचा आनंद पैशापेक्षाही आता आपल्याला आर्थिक स्वातंत्र्य देईल, त्याच गावात न राहण्याचं, आपल्याला हवं तसं वाहन घेण्याचं, बाहेर फिरण्याचं, मनाप्रमाणं मित्रमंडळी जोडण्याचं - अशी 'अनेक स्वातंत्र्यं' मिळतील, याचा आनंद असतो. तोही थोडाफार मिळतो. पण आपण काय काम करायचं, ते आपले वरचे कुणीतरी साहेब ठरवतात, आपल्या मनाप्रमाणं आपल्याला हवं ते काम करता येत नाही. आपल्याला हव्या त्या पद्धतीप्रमाणं करता येत नाही. ते करण्याच्या अनेक नव्या किंवा चांगल्या असलेल्या कल्पना अमलात आणण्याचं स्वातंत्र्य नाही - अशा अनेक गोष्टी लक्षात येतात. त्यातून घरी आईवडिलांकडं राहावं लागत असेल तर, त्यांची जाण्यायेण्यावर, काय केलं ते सांगण्यावर, खर्चवेचावर - अशी अनेक बंधनं आपल्या स्वतंत्रपणावर येतात, अस्वस्थता राहते.'अस्वस्थता नेहमी एकाकी असते.' त्यामुळं, ती कमी व्हायला, ओघानंच आपण आपल्या मनासारखा जोडीदार निवडावा, असं वाटतं.

असं केलं तर, मग आपल्यावर इतकी बंधनं येणार नाहीत किंवा

साध्या भाषेत म्हणायचं तर, आज आपण जे दोन विरुद्ध एक आहोत ते दोन विरुद्ध दोन होऊन, तुल्यबल तरी होऊ. मग अस्वस्थताही कमी येईल आणि आपलं स्वातंत्र्यही वाढेल, निर्णय घेता येतील. मोठ्यांच्या सांगण्यावर बंधनं येतील. आपल्या मनाप्रमाणं वागण्याचं स्वातंत्र्य आपल्याला अधिक मिळेल. लग्न तर होऊन जातं. काही महिन्यांनी लक्षात येतं की, आपण दोन विरुद्ध दोन होणार होतो, ते आता तीन विरुद्ध एक झालो आहोत ! मग कधी त्यावर खाजगीत चर्चा, खरंतर वादविवाद होतात. दोघांचंही म्हणणं अनेकदा एकच असतं. हा म्हणतो, तुम्ही तीनही एक आहात, मला एकटं पाडता. तर ती म्हणते, तुम्हीच तीन एक आहात, मला एकाकी पडायला होतं. शेवटी नेहमीच्याच पर्यायावर येतं,आपण दोघं त्यापेक्षा स्वतंत्र राहू, म्हणजे दोघांनाही हा त्रास होणार नाही. आपल्या घरी आपण स्वतंत्रपणे ठरवू तसं जगू शकू. तिथं काही दिवसांनी कुठल्याही निर्णयाच्या बाबतीत, एकतर 'मी काय म्हणत होतो किंवा मी काय म्हणत होते' असं तरी सुरू होतं, नाहीतर 'मला काय करायचं ते मी करीन, तुला काय करायचं ते तू कर' असं सुरू होतं !

हे तसं कोणाच्या विशिष्ट जीवनाबद्दल नाही. विशिष्ट त्रास, दुःख, अस्वास्थ्य का, यांबद्दल आहे ! आपण पाहिलं असेल की, बसमध्येसुद्धा तीन सीटऐवजी दोन सीटची बाकडी आधी भरतात. त्यावर बसल्यावरसुद्धा शक्यतो ऐसपैस बसून, इतर कुणी आल्यास त्यांना बाजूच्या सीट मोकळ्या आहेत अशी खूण करून, आपल्या सीटवर बाजूला सामान ठेवून, ती सीट शक्यतो आपल्यापुरती 'स्वतंत्र' राहावी, याच्या प्रयत्नात मनुष्य नकळत असतो. ऑफिसमध्ये आपण तसे किती वेळ असतो, पण तिथं बसण्याची आपली खुर्ची, तिची दिशा, कामाचा विभाग - हे तसंच स्वतंत्र असावं, असं वाटतं. देवळात कीर्तनाला-प्रवचनाला बसले तरी, त्यात्या श्रोत्यांचे बसायचे खांब ठरलेले असतात. ना ते खांब त्यांचे असतात, ना ते श्रोते प्रवचन करीत ! तरीही यांना यायला उशीर झाला, दरम्यान कुणी तिथं बसलं, तर उरलेल्या मोकळ्या जागी बसावं. पण मनातून त्यांना त्यांचं स्वतंत्र अस्तित्वच जणू पुसल्यासारखं वाटतं. त्यासाठी, त्यांच्या नेहमीच्या खांबाजवळच्या लोकांना उठवून दुसरीकडं बसायला सांगणारे महाभाग कमी नाहीत. जिथं प्रतिष्ठा, पैसा, सत्ता, पदं आहेत, तिथं तर ही 'स्वतंत्र अस्तित्वाची' वृत्ती ही 'लढाईच' होऊन बसते !

कृपया समजून घ्यावं की, निसर्गाला विविधता, डोंगरदऱ्या, पशुपक्षी, झाडं, माणूस - अशी स्वतंत्रता मंजूर असते. ती आढळतेही. तिचा त्रासही नसतो, ती उलट पूरक असते. लक्षात येईल ते हे की, निसर्गाला स्वतंत्रता ही वैविध्य म्हणून आनंददायी असली तरी, 'अस्तित्व' 'स्वतंत्र' करण्याचे कुठले अनैसर्गिक प्रयत्न चालत नाहीत! कारण, 'अस्तित्वाचे आविष्कार स्वतंत्र असले तरी, अस्तित्व एकसंध आहे, एकच आहे !' अस्तित्वात, जाणिवेत स्वतंत्रता, वेगळेपणा, श्रेष्ठकनिष्ठ असं काही नाही ! अस्तित्वाला स्वतंत्र, वेगळं, श्रेष्ठ ठरवण्याचे सारे खेळ मनाचे असतात. तो विस्तारलेला अवाजवी अहंकार असतो, त्यामुळंच ते सारे सुखाचा भास वाढवीत नेतात आणि दुःखात टाकतात!

नदीच्या अस्तित्वातही हिमालयापासून सागरापर्यंत वाहात राहण्याचं, वाटेत असंख्य कार्यं करण्याचं, पण 'तेवढंच' स्वातंत्र्य आहे. पण अस्तित्वाचे काठ सोडून जाण्याचं नाही, उलट निसर्गक्रमानं महासागरात उरलंसुरलं अस्तित्व विरघळवून टाकण्याचं 'स्वातंत्र्य' आहे ! त्यामुळं, महासागराएवढं विशाल होण्याचा चिरंतन आनंदही आहे ! मात्र त्यासाठी, स्वातंत्र्याच्या सीमा, कार्य, अस्तित्वातलं ऐक्य, समानता जाणून जगावं लागतं ! मग आनंद रोजचाच आहे आणि जगाचा निरोप घेतानाही आहे !

**

२४. उपाय आणि अपाय..!

मानवीजीवनाची ठेवण, विशेषतः त्यातलं मन, शेकडो वर्षं तसंच आहे. परिस्थितीतले बदल, नव्या गरजा यांत काळानुसार नवे प्रश्न निर्माण होत असतात. त्यांची उत्तरंही शोधावी लागतात. पण सापडलेल्या उत्तरांच्या बाबतीत आपलं मन सावधान नसलं, तर मात्र कधी उत्तरांतून नवीन प्रश्न निर्माण होतात. त्याची उत्तरं शोधण्यात आपण अडकत जातो !

इथं विचार करायचा प्रश्न हा की, या सगळ्यात आपला मूळ प्रश्न कोणता होता, तो सुटला का, हेच लक्षात येईनासं होतं. त्यातही मिळणाऱ्या उत्तरांतून आणखी नव्या प्रश्नांत आपण अडकत चाललो आहोत, हेही अनेकदा लक्षात येत नाहीसं होतं. आजाराच्या प्रश्नावर औषधाचा उपाय सापडावा, पण त्या औषधानं नवीन आजार निर्माण व्हावा आणि कधी तो मूळ आजारापेक्षा जास्त त्रासदायक ठरावा, तशी काहीशी ही अवस्था असते. ज्यांना हे भान येतं, ते काही काळ शांत राहून, आपण शोधलेल्या उपायांवर, त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांवर, त्यामुळं होणाऱ्या त्रासांवर विचार करतात, मार्ग काढतात. हे वेळीच घडलं, तर मग 'उपायांचे अपाय' ते टाळू शकतात !

आपण पाहिलं असेल, वर्गात मुलं एकत्र येतात, बेसावध राहिलो तर त्यांचे दिवसच्या दिवस दंगा करण्यात, वर्ग डोक्यावर घेण्यात जातात. पालकांना एकट्या मुलाचा अभ्यास आणि तोही घरात, घेणं अवघड आहे, हा मूळ प्रश्न असतो. तो सोडवण्यासाठी शाळा-वर्ग यात मुलं एकत्र यावीत, त्यांना कुणा अनुभवी व्यक्तीचं मार्गदर्शन मिळावं, शिस्त, सहकार्य, व्यायाम, ओळखी - अशा अनेक मार्गांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित व्हावं, हा त्या मूळ प्रश्नावरचा खरा उपाय !पण सुरुवातीला म्हटली, तशी परिस्थिती उद्‌भवली, तर उपाय करताना आपण वेगळ्याच प्रश्नात येऊन अडकलो आहोत, हे पालकांना, शिक्षकांना थोडं शांत राहून लक्षात घ्यावं लागतं. मार्ग काढावे लागतात. तर हे उपाय 'उपाय' ठरतात. नाहीतर, त्यातून नवे प्रश्न कसे निर्माण होतात, याची आपल्याला कल्पना असेल. साध्या वार्षिक सभांपासून ते जागतिक

परिषदांपर्यंतसुद्धा, मार्ग निघण्याऐवजी, आटोक्याबाहेर जाणारे गोंधळ थांबवण्यासाठी, सभा तहकूब कराव्या लागतात. संभाव्य अपाय टाळावे लागतात. मग प्रश्न मार्गी लागतात, उपाय होतात.

आज सर्वत्र दिसणारी अधीरता, त्यामुळं निर्माण होणारे त्रास, त्रागा, गैरसमज - हा एक अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. त्या बाबतीतही आजच्या आपल्या वेगवान जीवनशैलीत, असंच कुठंतरी थोडं थांबून, एकदा आपल्या मूळ कामाची आठवण करण्याची गरज आहे. अधीरता, त्यामुळं अस्वस्थता हा खरा मूळ प्रश्न नाही. तर मूळ प्रश्न सोडवताना, त्यावर उपाय करताना-निर्माण होऊन वाढलेला हा एक अपाय आहे, हे आपल्या लक्षात येईल !

पूर्वी गावं छोटी. तीही लांबलांब. जाण्यायेण्याचे मार्गही अनेक गावात नाहीत. बराच व्यवहार पायवाटांनी, जंगलातून वाटा शोधत. कुणाकडं तरी घोड्यासारखं एखादं वहान किंवा मोजक्या बैलगाड्या. कुणाचा आजार, कुठले जन्ममृत्यू, सुखदुःखाच्या घटना - संबंधातल्या माणसांना कळवायला दिवसच्या दिवस जात. सासर-माहेरची घटना सांगायलासुद्धा, सांगावा देणारं कुणी गडीमाणूस पायपीट करून जाई, तेव्हा दोनतीन दिवसांनी त्यांना ते कळे. हीच गोष्ट अनेक बाबतीत होती. स्वयंपाक होऊन जेवणाची गाठ पडायला बारा वाजत. रात्री प्रकाशाची सोय नाही म्हणून, रात्रीची जेवणं लवकर आणि कामं आवरून नऊ-दहा वाजता शांत झोप, ती पहाटे कोंबड्याच्या आरवण्यानं प्रसन्न जाग.

दळणवळणाची साधनं नाहीत, संपर्काची माध्यमं नाहीत, दाराशी वहानं नाहीत, चार ओळीची चिठ्ठी लिहिली तरी गावी जाणारा माणूस आपल्या मुलीच्या सासरी जाईल तेव्हा, ती चिठ्ठी तिला पोचणार. या सगळ्यांत अनेक गोष्टी, घटना, सुखदुःखाच्या बातम्या सावकाश कळत. पास झाल्याचा आनंद किंवा दुर्घटनेचं दुःख - होत असलं तरी, त्यात उशीरा कळल्याचा खेद, त्रास, त्रागा असलं काही नसे. उलट त्या घटनेला मधे काळ गेल्यानं, मनाचा तोल राही.

पण यात होत असलेला विलंब, नसलेली दळणवळणाची साधनं, संपर्काला नसलेली माध्यमं, बैलगाडीसारखी संथ वहानं - अशा गोष्टी आपल्याला गैरसोयीच्या, मागासलेपणाच्या वाटू लागल्या. आपण या साऱ्या गोष्टींवरचे उपाय शोधले. जंगलं तोडून रस्ते तयार केले, टपालसेवा आणल्या,

टेलिफोन यंत्रणा टाकल्या, दुचाकीपासून वहानं शोधली - प्रत्येक गोष्टीला होत असलेल्या विलंबाच्या आजारावर, गैरसोयींवर औषधं शोधली, उपाय शोधले. संथ जीवनाला गती आणली.

दिवसभरानं पोचणारा माणूस आता वहानानं एका तासात पोचू लागला. सुखदुःखाचे प्रसंग घडल्यापासून, तासाभरात अनेक नातेवाईकांना लगेच कळू लागले. इतर जगाच्या मानानं गतीचे - प्रगतीचे हेही उपाय कमी पडताहेत, असं वाटू लागलं. मग वहानांची गती वाढवण्याचे अकल्पित प्रयत्न सुरू झाले. फोन जलद आणि थेट सुरू झाले. जत्रा, सर्कस, टुरिंग टॉकिज, थिएटर असा मनोरंजनातल्या गतीचा प्रवास, उपाय शोधतशोधत, टीव्हीमार्गे घरात आणि मोबाईलमार्गे हातात येऊन पोचला. जरुरी कामानंतर मनोरंजन, हा मूळ प्रश्न कधी मागं पडला, ते कळलं नाही. पुरेशा मनोरंजनानंतर जरुरी काम - असाही काळ या गतीच्या उपायचक्रात येत गेला. विलंब, गैरसोय ही एक प्रकारची त्रुटी, उणीव, आजार असला, तरी गतीच्या उपायांनी आता आपल्याला अतिवेगवान करीत, शाळेतल्या किंवा एखाद्या सभेतल्या अनियंत्रित गोंगाटासारखं, अशांती आणि अधीरतेत आणून सोडलं आहे !

'एवढं सगळं घडलं, पण आम्हाला एक शब्द कळवला नाही, तुम्हाला आमची आठवण नाही, किंमत नाही, वेळेला मात्र आम्ही लागतो' अशा अविचारी, तीव्र प्रतिक्रिया आणि जवळच्या माणसांचे गैरसमज सुरू झाले. त्याच गोष्टी धीरानं घेण्याऐवजी आरोप सुरू झाले. शुभेच्छा, सुखदुःखं जरा सावकाशीनं, पण प्रत्यक्ष भेटून सांगणाऱ्या माणसांपेक्षा, दुसऱ्याक्षणी येणारा फोन, प्रतिक्रिया महत्त्वाची ठरायला लागली. प्रत्यक्ष येणाऱ्या माणसांची किंमत कमी झाली. अकराला लागणारा निकाल बारापर्यंत कळला तरी चालेल, एवढा धीर आता मुलांना तर नाहीच, पण पालकांनाही नाही. अकरा वाजून एक मिनिट झालं, तरी धीर सुटतो. सर्व्हर, यंत्रणा, कारभार सगळ्यांवर टीका होते. वास्तविक, निकाल ठरलेल्या क्षणीच तिथं दिसायला लागलेला असतो. पण अतिगतीची सवय झाल्यामुळं,अगणित लोक जर त्या यंत्रणेवर इतक्या अधीरतेनं धावून गेले, तर ती यंत्रणा तरी काय करील, एवढा साधा सारासार विचार करणंही आता मनाला अवघड जाऊ लागलं आहे !

आठवड्यानं पोस्टानं घरी आलेला निकाल पाहाणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा आनंद आता दुर्मिळ झाला आहे. चुलीवर पाचसहा तासांनी

होणाऱ्या दर्जेदार स्वयंपाकातल्या विलंबावर उपाय म्हणून, जलदगतीनं तो उरकणारी साधनं निघाली. पण त्यांना लागणारा वेळही जास्त वाटू लागला, म्हणून तयार-इंस्टंट पदार्थ निघाले. पण ते खाण्याइतपत गार होण्यासाठी लागणाऱ्या वेळानंसुद्धा अस्वस्थता निर्माण व्हायला लागली. करणाऱ्यावर चिडचिड सुरू झाली. सरळ आणि वेगानंच चाललेल्या गाड्यांनाही धोका उत्पन्न करील, अशा पद्धतीनं कितीही वेगानं आणि कुठल्याही बाजूनं गाडी पुढं काढली, तरी आपल्याला वेळच होतो आहे, असं वाटू लागलं. वेटरला ऑर्डर दिली, त्यानं तत्परतेनं सारं आणलं तरी, तुमच्याकडं फार वेळ होतो, म्हणून फटकारलं जाऊ लागलं. पाचपाच मिस्ड कॉल्स देताना दुसरं माणूस काही कामात असेल, हा विचार तर सोडाच, पण त्याच्याबद्दल राग आणि गैरसमज व्हायला लागले...!

विलंबांमुळं होणाऱ्या गैरसोयींवर गतीचे उपाय करण्याची जरूर होतीच. ते होतच आहेत. पण त्यात तारतम्य आणि शांतीची गरज - यांकडं दुर्लक्ष होऊ नये. नाहीतर, हेच उपाय मूळच्या आजारापेक्षा गंभीर असलेली-अधीरता आणि तिच्यामुळं निर्माण होणारे पुढचे मनस्ताप, त्रास, आजार यांना आमंत्रण देईल ! हे लक्षात घेऊन, आपण असे धोके टाळू शकलो, तर उपाय 'उपाय'च राहतील, त्यातून 'अपाय' होणार नाहीत!

**

२५. तेवढंही अवघड नाही..!

..आणि नोकरीसाठी निवडीचं आणि नेमणुकीच्या अटींचं पत्र हातांत पडतं. शिक्षणात चोवीस - पंचवीस वर्षं निघून गेलेली असतात. नोकरीच्या प्रयत्नांत आणखी एकदोन वर्षं जातात. चांगल्याचांगल्या नोकऱ्यांची स्वप्नंही पाहिलेली असतात. चांगल्या पगारासाठी खाजगी क्षेत्रं, थोड्या स्थैर्यासाठी सरकारी-निमसरकारी क्षेत्रं अशा दोन्ही रुळांवर धडपड, अडखळणं सुरू असतं. अपयशानं अस्वस्थता वाढत असते.

बरोबरचीच काय, मागे असलेली मुलंसुद्धा नोकरीला लागून त्याअर्थानं पुढं निघून जातात. म्हणून वेगवेगळ्या निकालांची वाट पाहाणं आणि निराश होणं, हा जणू दिनक्रमच होऊन बसतो.. आणि ज्याची वाट पाहात होतो, ते नोकरी देणारं पत्र, खोलीतल्या अंधारात प्रकाशाचा एकदम कवडसा यावा, तसं येऊन पडतं !

नोकरी चांगली. पगार चांगला. इतर नियम, अटी, फायदे सारं चांगलं असतं. घरातले सर्वही आनंदित होतात. फक्त नेमणुकीचं ठिकाण 'गोंदिया' वाचल्यावर, आनंदानं चांगलं जेवण सुरू असताना खडा लागावा, तसे एकदम सर्वांचे चेहरे बदलतात. वास्तविक, अर्ज करताना याची कल्पना असते. पण आता मात्र पश्चिम महाराष्ट्रात लहानपण, शिक्षण, नातेवाईक, मित्रमंडळी असं सगळं आयुष्य गेल्यामुळं, नेमणुकीच्या गावामुळं ते सारं फारच अवघड आहे, असं वाटायला लागतं.

मोठ्यांच्या वाट्यालाही कधी या भागाच्या बाहेर जायची, राहायची वेळ आयुष्यात न आल्यामुळं, त्यांच्याकडूनही थोडे निराशाजनक सूर यायला सुरुवात होते. आपल्या ओळखीचं कुणी तिथं नाही. नातेवाईक नाहीत. हवामान खूप वेगळं आहे. जेवणखाणाच्या पद्धती खूप वेगळ्या असतात. खाणावळीची कधी सवय नाही. अशा ठिकाणी राहिलं, हवापाण्यानं तब्येत बिघडली तर बघणारं कोण नाही. तिथली बोलीभाषा वेगळी. इतक्या लांबची माणसं कशी वागतील, कुणास ठाऊक ? त्याचा नोकरीतल्या कामांवर विपरीत

परिणाम झाला तर, करिअरचा प्रश्न येईल... असं ते सगळंच 'अवघड' आहे, असा एकंदरित सर्वांचा सूर लागायला सुरुवात होते.

एकदोन रात्री अस्वस्थतेत जातात. मुलाचा दोन्ही बाजूंनी विचार होत असतो. आपण इतके दिवस शिक्षण असूनही बेकार राहून काढले. त्यावेळेला कुठली संधी आली तरी घेईन, अशी मनाची तयारी होती. आलेली संधी नक्कीच चांगली आहे, हे एका बाजूला वाटत असतं. पण दुसऱ्या बाजूला दोनतीन दिवसांच्या चर्चेत अवघडपणाचे इतके मुद्दे निघालेले असतात, तेही सारखे डोळ्यांसमोर येत असतात. दहा दिवसांत हजर व्हायचं असतं. त्याचाही एका बाजूला मनावर ताण असतो.

सकाळी असंच तारवटून उशीरा उठल्यावर मित्राचा उत्साहानं फोन येतो, 'मधल्या परीक्षेचे निकाल चार दिवसांपूर्वीच लागले. कळलं का काही ? मला आज पत्र आलं. तेव्हा कळलं, आपलं तर काम झालं बुवा ! तुम्ही तर हुशार आहे, तुम्हाला अजून नाही का काही आलं ?'

'हो तीन दिवसांपूर्वीच कळलं. पण पोस्टिंग गोंदिया म्हटल्यावर सगळं अवघडच आहे. म्हणून गप्प बसलो. फोनही नाही केला. तुम्हाला जवळपास कुठं पुणं मुंबई मिळालं का ?'

'छे हो, चंद्रपूर आहे. जवळ काय आणि लांब काय, आपल्याला नोकरी तर चांगली मिळते आहे. जवळच्या बेकारीपेक्षा लांबची नोकरी अधिक चांगली नाही का ?'

बेकारीच्या अंधकारात आलेल्या कवडशात अजूनही प्रकाश दिसायला लागतो. मग मित्राला आपल्या अडचणी सांगून होतात. तो म्हणतो, 'माझंही गाव तसं म्हटलं तर लांबच आहे, तुमच्यासारखंच आहे. पण त्या गावात नेमणूक होते, इतपत ते मोठं आहे, गावात इतर लोक राहात नाहीत का ? हे पोस्टिंग म्हणजे कुठं अरण्यात झाडावर आहे का डोंगराच्या टोकावर आहे ? तिथं राहणारे तर जेवतात, खातात, जगतात. गाड्या, वाहनं, हॉटेल, लॉज, खाणावळी, उद्योग, सरकारी कार्यालयं, इतर ऑफिसेस्, माणसं, नातेवाईक, सणसमारंभ - अनेक गोष्टी तिथंही आहेतच की. आपल्याला काय कुठलं नवीन गाव वसवायला सांगितलेलं नाही, असलेल्या गावात, असलेल्या सुखसोयींत फक्त आपलं काम करायला सांगितलं आहे. आपण तर जाणार बुवा !'

आधी अवघड वाटणारे कितीतरी प्रश्न, आता तितके अवघड नाहीत,

हे लक्षात येतं ! दिशा लांबची असली तरी, तीच असल्यानं दोन दिवसांत दोघंही मित्र एकाच रेल्वेनं पश्चिमेकडून आता पूर्वेकडं निघतात ! जवळजवळ दोन दिवसांचा प्रवास करून आपापल्या गावी पोचतात. तिथल्या संभाव्य अडीअडचणी, त्यांचे मार्ग, मिळालेल्या संधीचं चीज करायचे प्रयत्न आपण कायकाय करू शकू, याचे वेगवेगळे उत्साहजनक पर्याय यांची चर्चा होते.

आपापल्या गावी हजर होऊन नोकरीचं पाहिलेलं स्वप्न पुरं होतं. तिथंली माणसं कशी वागतील, याची शंका पहिल्याच दिवशी नाहीशी होते. त्यांना कामासाठी माणसाच्या मदतीची जरूर असते. लांबचा असल्यामुळं येईल की नाही याची चिंता असते, त्यामुळं ते उलट उत्साहानं त्यांचं स्वागत करतात. तिथले वरिष्ठही राहण्या-जेवण्यापासून कामापर्यंत कसलीही काळजी करू नका, अडचण वाटल्यास केव्हाही भेटा, असं उलट आग्रहानं आणि प्रेमानं सांगतात !

भावी गोष्टींचा अवघडपणा हा एखाद्या रस्त्यातलाच अडथळा नसतो, तर आयुष्यातल्या अनेक प्रकारच्या वाटचालींत लागणारं ते एक टर्मिनस किंवा रेल्वेचं जंक्शनच असतं. अनेक ठिकाणांहून निघालेल्या गाड्या 'हे खूप अवघड आहे' नावाच्या या जंक्शनवर येऊन अडकलेल्या असतात. संधींचं, काळाचं, प्रगतीचं नुकसान होत असतं.

अनेकजण अवघडपणावर ठाम असतात. त्रास, खंत, निराशा, दुःख - सहन करतात, पण हे आपल्याला वाटतं तेवढं अवघड नसतं, याचा मनमोकळेपणानं विचार करायलाही तयार होत नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्याबरोबरच घरातल्या इतरांनाही सोसावा लागतो. काहींना हे तेवढं अवघड नाही, हे लक्षात येतं. ते थोडा अवघडपणा सोसून पुढं सरळ, सोप्या आयुष्याकडं निघून जातात, यशस्वी होतात. हे जागी थांबलेले मात्र अकारणच त्यांच्याशी तुलना करून, त्यांची असूया, मत्सर धरून स्वतःचं नुकसान आणखीन वाढवून घेतात.

म्हणून याचा विचार करणं चांगल्या जीवनासाठी खरोखरच गरजेचं आहे. तसं पाहिलं तर, आयुष्यात जन्मापासून मृत्यूपर्यंत अवघडपणा नाही कुठं? फक्त त्याचबरोबर सोपेपणाही नाही कुठं - हे विचारण्यासारखे प्रश्न आहेत. लहानपणी सतत घरात भावंडांबरोबर खेळणाऱ्या मुलांना शाळेत जाणं किती अवघड वाटतं. त्यासाठी नुसतं रडंच काय, आजारपण आणणारीही मुलं आपल्याला दिसतात. शाळेत एकट्यानं थांबायचं, सवयीचे आई-बाबा-

भावंडंकुणी नाहीत, बरोबरच्या मुलांतलं कुणी ओळखीचं नाही. त्यांनी त्रास दिला तर आपण काय करायचं, बाई शिक्षा करतील का - असा सारा अवघडपणा तिथं अनेकांचं शिक्षण थांबवू शकतो, लांबवू शकतो.

तीच शाळा सहवासानं उपयोगी पडली, सोपी झाली की ती सोडून महाविद्यालयात जाणं, तिथलं वातावरण अवघड वाटतं. त्याला तोंड द्यावं लागू नये म्हणून बहिस्थ शिक्षणाचा मार्गसुद्धा चालला जातो. खरंतर तिथंही अनेक गोष्टी कल्पनेपेक्षा चांगल्या सोप्या असतात. संधी, विकासाला वाव असतो. पण अवघडपणाच्या या थांब्यावर गाडी एकदा अडकली की, ती तशीच अनेक टप्प्यांवर अशाच त्यात्या टर्मिनसना खोळंबून राहते.

विवाह, व्यवसाय, नोकरी, बदल्या, पाहुणे, आजारपणं, वृद्धत्व, परावलंबित्व - अशी कित्येक जंक्शन येतात. त्यांतल्या संधी, सोपेपणा, मार्गदर्शन, प्रयत्न, प्रयोग, विकासाचा निर्धार - अशा अनेक बाबी त्या टप्प्यावरचा अवघडपणा कमी करून प्रवास सोपा, सरळ करीत असतात. पण त्याची कल्पना नसली किंवा कल्पना असूनही तयारी नसली तर, मग त्यात्या बाबतींत आयुष्य खोळंबून राहतात. वास्तविक अगदी साध्या उदाहरणात पाहिलं तरी, आपण गावाहून आल्यावर रिक्शात बसतो. घरी जाईपर्यंत वाटेत रस्ते अक्षरशः बंद करून टाकणाऱ्या मिरवणुका असतात, याची आपल्याला आणि त्या रिक्शाचालकांनाही कल्पना असते. पण हे साधे रिक्शाचालकही आपल्याला न्यायला नकार देत नाहीत, फारतर पाचदहा रुपये जास्त लागतील असं सांगतात. कारण, अडचण समोर असूनही त्यांना ती 'तेवढी अवघड वाटत नाही.' बोळ, गल्ली अशा आपल्याला एरवी माहीतही नसलेल्या मार्गांतून वाट काढीत ते आपल्याला घरी अचूक नेऊन पोचवतात. एवढ्यावरूनही आपण शिकू शकू !

एवढ्या अवघड नसतानाही अशा गोष्टी अवघड होतात, त्याचं कारण मनात आहे ! होणाऱ्या गोष्टी अनपेक्षित, अपरिचित असतात. त्या सवयीच्या नसतात. त्या गोष्टींबद्दल अज्ञान असतं. त्यांतल्या अडचणी 'संभाव्य' आहेत, त्या येतीलच असं नाही, याची जाणीव होत नाही. अनेक अवघड वाटणाऱ्या गोष्टी सरावानं, शिकण्यानं पूर्वी सोप्या झालेल्या असतात, याचा अनुभव आपल्याला आलेला असतो. पण अशावेळी हा स्वानुभवही विसरतो !

मनाला हेही विसरायला होतं की, कर्तव्यं अवघड असली तरी ती

करणाऱ्याला माणूसच काय, देवही मदतीला येत असतो ! हे मन विसरलं असलं तर, त्याला त्याची जाणीव करून द्यावी लागते. इतकंच नाही तर, पूर्वी अशा अवघड वाटणाऱ्या वेळा येऊन गेल्या, तेव्हाही त्या गोष्टींतला अवघडपणा दुर्लक्षित करून निर्धारानं चालताना, त्याच गोष्टी कितीकदा सोप्या झालेल्या असतात, त्याच्या विसरलेल्या अनुभवांची मनाला आठवण करून द्यावी लागते!

मग, मन उभारी घेतं आणि पुन्हा एकदा नव्यानं अनुभव येतो की, आत्ताचं कामही 'तेवढं अवघड नाही' !

**

२६. तळमळीला आशीर्वाद...यशाचा !

माणसाचं जीवन प्रगत आणि समाधानाचं होण्यासाठीचे प्रयत्न अज्ञात काळापासून सुरू आहेत. सामान्य माणसंही या दिशेनं हजारो वर्षं प्रयत्न करीत आहेत. त्यात विशेषतः मानवी क्षमतांची पुरती ओळख करून घेऊन, त्या क्षमता उपयोगात आणण्याचे आणि कुठल्याही माणसाचं जीवन स्वस्थ आणि आनंदी व्हावं, यासाठी अश्मयुगापासून आजच्या विज्ञानयुगाअखेर असंख्य लोकोत्तर व्यक्ती, समाजसुधारक, महात्मे, सत्पुरुष - हेही आपल्यापरीनं याचा शोध घेत आहेत.

त्यातल्या पहिल्यावहिल्या प्रयत्नांचं स्वरूप वेगळं होतं. निवाऱ्यासाठी ढोली, गुहा शोधणं, रात्रीची विश्रांती मिळावी म्हणून गुहेच्या तोंडाशी जाळ करून हिंस्र श्वापदं दूर ठेवणं, जगण्यासाठी पाळंमुळं, कंद, फळं शोधणं, आधी कच्ची मग हळूहळू भाजून खाणं, स्वतःच्या संरक्षणासाठी अणकुचीदार दगड, धोंडे बाळगणं, मारणं, पुढं हळूहळू गदा-भाले-धनुष्यबाण वापरणं - असा हा प्रवास आपल्याला परिचित आहे.

त्यात प्रगती दिसत असली तरी, मुळात प्राण्यांच्या ठिकाणी असलेल्या प्रवृत्तींचेच ते अधिक प्रगत आविष्कार आहेत, हे लक्षात येणं अवघड नाही. सिंह शत्रूवर थेट झेप घेतो. वानर लांबूनच पळ काढतो किंवा फळ नाहीतर फांदी फेकून मारतो, हे आपल्याला माहीत आहे.

पण माणूस त्याअर्थानं प्रगत आहे, म्हणून तो कुणाला मारीत नाही असं नाही. उलट, त्याच प्रवृत्तीनं तेच काम तो 'प्रगतपणे' तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं करतो. त्यामुळं कुठंही समोर न येता, तो बसल्या जागी शेकडो मैलावरच्या शत्रूंचा बळी घेतो. सिंह एकवेळ एका प्राण्याचा संहार करील, पण 'प्रगत' माणूस एकाच वेळेला लाख जिवांचा बळी घेतो. इतर लाखोंवर दहशत निर्माण करतो, ती वेगळीच.

स्वसंरक्षणासाठी उंदीर बिळात लपतो, सिंह अज्ञात गुहेत निघून जातो, माणूस घरात नाहीतर अभेद्य बंकरमध्ये लपून बसतो. आपल्याला प्रगतीच्या

दृष्टीनं हे विचित्र वाटत नाही का ?

क्षमतेचाच विचार केला तर, आपण अनेक प्राणी, पशू, पक्षी यांच्यापेक्षा दुबळे आहोत. पण आपला मेंदू निसर्गानं म्हणा, ईश्वरानं म्हणा, इतका गुंतागुंतीचा आणि प्रगल्भ केला आहे की, त्याच्या जोरावर आपण पशुपक्ष्यांचंच काय इतर माणसांचं स्वातंत्र्यही बळकावून बसलो आहोत.

जे हा विचार प्रामाणिकपणे करतील त्यांना हे पटू शकेल की, एवढ्या प्रचंड क्षमतेच्या माणसाचं जीवन अधिक सुखी, आनंदी, कृतज्ञ असायला हवं. प्रत्यक्षात मात्र, हा दुबळा माणूस प्रबळ प्राण्यांपेक्षाही धूर्त आणि विनाशक ठरत चालला आहे.

अधिक विलक्षण यंत्रणा लाभलेला माणूस स्वतः शांत राहून इतरांना आनंदी करणारा असायला हवा. पण, त्याउलट तो भय, काळजी, असुरक्षितता, न्यूनगंड, अहंगड, चढाओढ, मत्सर, बेफिकिरी, कृतघ्नता, असूया, कुरघोड्या, पाताळयंत्रीपणा, दुटप्पीपणा, विश्वासघात, दंभ, बुवाबाजी, फसवणुकी, यंत्र-संगणक-नेट यांनी न सुटणाऱ्या गुतागुंतीच्या गुन्हेगारी - अशांनी अधिकच दुःखी आणि ग्रस्त आहे.

त्याचं मोठं कारण अदृश्य आणि अतर्क्य मन हे आहे. ते शक्तिरूप आहे. त्याच्यातली अशुद्धी, सदोषता या साऱ्या दुःखांना कारणीभूत आहे.

क्षणभर हाही विचार करावा की, याच माणसाच्या ठिकाणी दया, सहानुभूती, क्षमा, करुणा, आत्मीयता, निस्वार्थीपण, तत्परता, त्याग, औदार्य, कळवळा, भक्तिभाव, अर्पणबुद्धी, नम्रता, ऋजुता, विशालता - असे असंख्य आनंद देणारे, स्वतःचं आणि एकूण मानवी जीवन आनंदमय करणारे गुण आहेत - पण ते हातापायांपासून मेंदूपर्यंतच्या कुठल्या अवयवांत नाहीत, तर ते मनात आहेत ! तेच मनाचे प्रकाशित, विधायक भाग आहेत. ते अभ्यासानं, निर्धारानं अधिक प्रकाशित करायचे, हे माणसानं ठरवलं तर त्याचं मन पूर्ण प्रकाशित आणि विधायक होऊ शकतं.

मग दोघांना आयुष्यभर पुरून उरेल अशा इस्टेटींवरून कोर्टात आयुष्य दवडली जाणार नाहीत. चैनींची ओढ वाटणार नाही. अविचाराची, दहशतीची कृत्यं करावीशी वाटणार नाहीत. भेदाभेद करावेसे वाटणार नाहीत. फायद्यासाठी कुणाला वेठीला धरावसं वाटणार नाही. घराघरांत हेवेदावे- स्वामित्वाच्या फोल कल्पना रोज त्रस्त करणार नाहीत.

हक्क गौण होतील. आधी कर्तव्याची जाण येऊन ती होतील. निसर्गाच्या, विश्वशक्तीच्या, त्यागी महापुरुषांच्या आपल्यावरच्या अगणित उपकारांच्या स्मरणात जे जीवन व्यतीत होईल, ते विधायक आनंददायी आणि मनुष्यजीवनाचं चीज करणारं ठरेल ! पशुपक्ष्यांसह साऱ्या निसर्गाचं संतुलन ठेवणारं ठरेल !

अशा साऱ्या आनंदी जीवनाच्या क्षमता असतानाही, व्यक्तिगत काय, कौटुंबिक काय, सामाजिक काय - जीवनं आधी म्हटली तशी, दुःख आणि चिंतांनी ग्रस्त असतील तर, मनाचे अंधारमय भाग जाणीवपूर्वक प्रकाशित करण्याकडं आपलं दुर्लक्ष झालं असेल. त्याचबरोबर प्रत्येकाच्या ठिकाणी असलेल्या प्रकाशित भागाचा वापर करून, विधायक गोष्टींत स्थैर्य राखणं आणि त्यांचा विकास करण्याकडंही आपलं लक्ष गेलं नसेल, हे उघड आहे. आपल्याला अधिक जागृत आनंदी जीवन जगायचं असेल तर, या दोन्ही बाजूंनी आपल्या आयुष्यात घडणाऱ्या प्रसंगांत प्रयत्न करणं, हे 'माणूस' म्हणून आपलं कर्तव्यच आहे !

मन ही एक विलक्षण गुंतागुंतीची, न दिसणारी पण सामान्यांच्याही अनुभवाला येणारी गोष्ट आहे. सर्वांत जास्त गुंतागुंतीची यंत्रणा असलेला आणि साऱ्या शरीराचं नियंत्रण करण्याची क्षमता असलेला मेंदूसुद्धा दोनचार टक्के का होईना, दृश्य आहे. पण त्यालाच काय, माणसाच्या साऱ्या कल्पना, विचार अशा अतर्क्य गोष्टींना व्यापून टाकणारं मन मात्र अदृश्य आहे !

माणसाला स्वतःला आणि जगाला दुःखाच्या खाईत लोटू शकतं ते मन. त्याचवेळी त्यालाच स्वतःचा विसर पडेल, अशा आनंदाच्या शिखरावर नेऊन ठेवू शकणारं तेही मनच. माणसाला हे दोन्हीही साधून देणारं मन अदृश्य असावं, ही निसर्गाची - परमेश्वराची विलक्षण कमाल आहे. माणसाच्या अनुभवाला येणारं - माणसाजवळ, इतर प्राण्यांपेक्षा अत्यंत विकसित आणि विधायक - विघातक गोष्टी करू शकणारं मनाशिवाय विलक्षण असं दुसरं काय आहे ?

मनाचा अत्यंत अवनत आणि अत्यंत उन्नत आविष्कार - हे सारे दृश्य आहेत, पण ते घडवून आणणारं मन मात्र अदृश्यच आहे. माणसासह साऱ्या जडचेतन सृष्टीचा आविष्कार माणसाला दिसावा, पण तो घडवून आणणारा

कर्ता - भगवंत मात्र नुसताच जाणवावा, पण दिसू नये - असंच मनाचं विलक्षण स्वरूप नाही का ?

साऱ्या सृष्टीच्या आविष्कारांतले बारकावे लक्षात घेत घेत अज्ञात भगवंताचं स्वरूप जाणून घ्यावं, त्याच्या रचनेचा, हेतूंचा, दिशांचा अंदाज घेत जाऊन, प्रत्यक्ष भगवंत गाठता येतो. त्याची विभूती असलेलं हे मन ओळखण्याचा मार्गसुद्धा तशाच पद्धतीचा आहे. मनाच्या बाबतीतसुद्धा, ते अदृश्य असलं तरी त्यानं आपल्या आयुष्यात, जगात घडवून आणलेल्या गोष्टी मात्र दृश्य आहेत. त्या विधायक आहेत, कधी विघातकही आहेत. पण त्या तशा का आहेत आणि मनाच्या कुठल्या वैशिष्ट्यांमुळं त्या तशा घडतात, याची कारणं शोधीत गेलं तर, अदृश्य भगवंतासारखंच हे अदृश्य मन गवसू शकतं, पालटता येतं, अनुकूल करून घेता येतं. काही बाबतींत तर त्याचा अभ्यास करीत जावं, तसं ते नाहीसंही होत जातं.

सृष्टीतल्या भगवंताचा आविष्कार एकवेळ दृश्य असेल, बाहेर असेल, लांब असेल, पण माणसाचं सारं आयुष्य - त्याचा विनाश आणि विकास साधू शकणारं मन मात्र, आत आहे, जवळ आहे, अदृश्य असलं तरी, त्याची प्रत्येक सूक्ष्म हालचाल, आपल्या स्वतःलाच सहज जाणवणारी आहे, त्याअर्थानं प्रत्यक्ष प्रत्ययाला येणारी आहे !

म्हणून मन ओळखायला, विधायक करायला त्या मार्गानं जीवन बदलायला, आपल्या मनाची प्रत्येक हालचाल, आपल्याला मदत करायला तयार आहे. आपण आपल्या माणूसपणाविषयी दक्ष असू, त्याचं सार्थक होण्याविषयी सावधान असू, तर मनाचा सारा गुंतागुंतीचा वाटणारा व्यवहार उलगडू शकणारा आहे ! आपल्याला तळमळ असेल, तर त्याच मनाचे कोणते आविष्कार आपल्याला विनाशाकडं नेतात आणि कोणते विकासाकडं - देवत्वाकडं नेतात, हे सारं उलगडण्यासारखं आहे.

जंगल कितीही घनदाट असलं, अंधार कितीही निबिड असला,सागर कितीही अथांग असला तरी - तळमळीच्या अग्नीला कुठल्याही जंगलात वाट मिळण्याची अडचण नसते, निबिड अंधारातही निर्धाराची पणती, ध्येयाचा मार्ग प्रकाशित करायला समर्थ असते, दुर्दम्य इच्छेची निरंतर चालणारी वल्ही, माणसाची नाव अथांग समुद्राच्या पैलतीराला पोचवतात !

त्यासाठी मनाचं स्वास्थ्य, सुसंवाद आणि मदत लागते. अस्वास्थ्य

निर्माण करणारं मन नाहीसं करून, मन सुसंवादी राहील अशा मार्गांचा शोध घेऊन, ते मार्ग चालून - मन अनुकूल करून घेऊन, मनुष्य स्वास्थ्यपूर्ण जीवन जगू शकतो, अंतकाळापर्यंत !

अशा तऱ्हेनं स्वस्थ जीवन जगून, स्वानंदाच्या स्वगृही परतणारे अनेक महामानव, सत्पुरुष आणि त्याअर्थानं तळमळीची सामान्य माणसंही प्रत्येक शतकात होऊन गेली आणि होत राहतीलही ! खऱ्या तळमळीच्या भाग्यवंतांना यशाचा आशीर्वाद असतो ! अशा भाग्यवंतांत आपण असावं, असं कुणाला वाटणार नाही ?

त्यासाठी आपल्या मनाचा उलगडा, अभ्यास आणि प्रयत्न निरंतर करीत राहावं लागणार, हे उघड आहे ! त्या दिशेनं केलेला हा आणखी एक प्रयत्न, जिज्ञासू वाचकांच्या चरणी शुभेच्छापूर्वक अर्पण !!

**

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. कृपापदावली भाग : १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. कृपापदावली भाग : २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. साधनपदावली भाग १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. सारविस्तार भाग : १ : चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) : डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

स्वास्थ्यसंवाद

आपल्या मनाच्या संकुचिततेमुळं, आग्रहांमुळं,
मोकळेपणाच्या अभावामुळं,
मनोव्यापाराच्या गुंतागुंतीची कल्पना नसल्यामुळं –
ज्या अनेक प्रकारच्या अस्वास्थ्याला
अनेकांना वर्षानुवर्षं सामोरं जावं लागतं,
ते थोडंतरी हलकं व्हावं म्हणून
ही छोटीशी वैचारिक मदत...